CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
धाराशिव | बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक ३०१ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# महायुती तुटली... महाविकास आघाडी बिघडली

**अनेक पक्षातील नाराजांचा पक्ष कार्यालयातच राडा; उमेदवारी नाकारल्याचा उद्रेक बंडखोरीमध्ये दिसणार; ३ जानेवारीला चित्र होणार स्पष्ट**

**भाजपा-उबाठा अन् शिवसेना-उबाठा फक्त हीच युती व्हायची राहिली अन्यथा उर्वरित पक्षांची कोणाची कोणाबरोबरही युती, आघाडी!**

**२९ पैकी १८ महापालिकेत भाजपा-सेना युती तुटली; उमेदवारी न मिळाल्याने पेट्रोल ओतून घेतले तर कुठे नेत्यांचे बॅनर फाडले, कार्यालय फोडले**

**तभा वृत्तसेवा | सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**
**महापालिका निवडणुकीत पुरोगामी महाराष्ट्राचे राजकारण बिहारच्या राजकारणापेक्षाही वाईट वळणावर जात आहे. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांमध्ये नाराजांनी तोडफोड, राडा केला आहे. केंद्र व राज्यात सत्तेत असलेली महायुती या निवडणुकीत मात्र बहुतांश महापालिकेत तुटली. विधानसभा, नगरपरिषदांच्या निवडणुकीत दारुण पराभव आणि पक्षफुटीमुळे हैराण असलेली महाविकास आघाडी देखील अनेक महापालिकांमध्ये बिघडली आहे. ऐनवेळी उमेदवारी न मिळाल्यामुळे सर्वच राजकीय पक्षातील नाराजांचा उद्रेक पहावयास मिळत असून सर्वच राजकीय पक्षांना बंडखोरीचा धोका निर्माण झाला आहे. इगो दुखावलेले पक्ष, नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते गनिमी काव्याने मोठ्या प्रमाणात पाडापाडीचे राजकारण करतील तर वादाचेही प्रसंग होवून तणावाचे वातावरण होण्याची शक्यता आहे.**




राज्यात सुरु असलेल्या २९ महापालिकांच्या निवडणुकीत जवळपास १८ महापालिकांमध्ये भाजपा-शिवसेनेची युती तुटली आहे. महायुतीतील तिसरा मित्रपक्ष राष्ट्रवादीला सुरुवातीपासूनच दूर ठेवण्यात आले आहे. काही महापालिकांमध्ये शरद पवार आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्र आली आहे. उबाठा-मनसे एकत्र आल्यानंतर काँग्रेसने अनेक ठिकाणी उबाठाची साथ सोडली आहे. काही महापालिकांमध्ये काँग्रेस-उबाठा-शप राष्ट्रवादी-मनसे-वंचित अशी आघाडी मैदानात आहे. काही महापालिकांमध्ये शिंदे शिवसेना आणि अजित राष्ट्रवादी एकत्रितपणे निवडणूक लढवत आहे.

नेत्यांच्या निवडणुका म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत सर्वच पक्षाच्या नेत्यांनी सावधगिरीने युती-आघाड्या करत आपापली पोळी भाजून घेतली. कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र सर्वच पक्ष सोयीचे राजकारण करुन युती-आघाड्या करीत असल्याने हवालदिल झालेला कार्यकर्ता प्रचंड नाराज झाल्याने उद्रेक पहावयास मिळत आहे. पक्ष फोडाफोडी आणि शेवटच्या क्षणापर्यंत सुरु असलेले पक्ष प्रवेश यामुळे निष्ठावंतांवर अन्याय झाल्याने कार्यकर्ता पक्षावर आणि नेत्यांवर भडकल्याचे चित्र आहे. पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांना उमेदवारी न मिळाल्याने रडू कोसळले आहे. काही ठिकाणी इच्छुक महिलांना भोवळ येण्याचेही प्रकार घडले आहेत. काही ठिकाणी तर कार्यकर्त्यांनी शहराध्यक्षांच्या घरावर धडकत राडा घातला आहे. अनेक पक्षात नाराजांनी राजीनामा सत्र सुरु केले आहे. काहींनी तर अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. काहींनी थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे. उमेदवारीचे तिकिट कोट्यवधी रुपयांना विकले जात असल्याचा आरोपही संतापलेल्या काही कार्यकर्त्यांनी केला आहे. काहींनी आपल्याच पक्षाच्या नेत्यांचे बॅनर फाडले आहे. महायुतीमधील मित्रपक्षांमध्ये युती न होवू शकल्यामुळे नेत्यांनीही आता एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी डागल्या आहेत.

वास्तविक पाहता सुप्रिम कोर्टाच्या आदेशामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीच्या आत होणार, हे स्पष्ट होते. मग तरीदेखील महायुती अथवा महाविकास आघाडीमधील नेत्यांनी युती अथवा आघाडीसाठी का बोलणी केली नाही? कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत असे म्हणणाऱ्या राजकीय पक्षांनी सुरुवातीलाच स्वबळाची घोषणा करून आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना न्याय का दिला नाही? असा सवाल विचारला जात आहे. एकूणच काय तर सर्वच राजकीय पक्षांमधील कार्यकर्त्यांचा आपल्याच पक्ष आणि नेतृत्वावरील विश्वास उडाल्याचे दिसत आहे. पक्ष हा कार्यकर्त्यांमुळे असतो आणि कार्यकर्त्यांशिवाय नेत्यांना कोणी नेते म्हणणार नाही. राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते यांच्यातील हा सर्व लाजिरवाणा प्रकार पाहून लोकांचे राजकारण आणि राजकारण्यांबाबतचे मत आणखीन वाईटच होणार आहे. याचा परिणाम मतदानावर झाल्यास आश्चर्य नको.




### कुठे चाललाय महाराष्ट्र माझा...

पुरोगामी महाराष्ट्राच्या राजकारणाला गेल्या काही वर्षात ग्रहण लागल्याचे चित्र आहे. पक्षाची ताकत वाढविण्याच्या नावाखाली राजकीय पक्षांकडून सुरु असलेल्या प्रकाराचा आता लोकांनाही तिटकारा येवू लागला आहे. राजकारण्यांचा नैतिकता, तत्वे याबरोबर दुरान्वयेदेखील संबंध आहे की नाही, अशी चर्चा आता लोक करू लागले आहे. लोकशाहीत तिथे लोक देशाचा गाभा असतात तिथे त्यांनाच गृहित धरण्याचा प्रकार राजकीय पक्षाकडून होत आहे. लोक मतदान करतात ते पक्षाची नैतिकता, तत्वे पाहून पण निवडणुकानंतर कोणता पक्ष कोणत्याही पक्षाबरोबर जात आहे. यावरून ते लोकांना, मतदारांना गृहित धरत आहेत. तूमचा अधिकार मतदानाचा आहे तूम्ही फक्त मतदान करा. एकदा का आम्ही निवडून आलो की मतदारांचा संबंध संपला. हम करेसो कायदा अशा प्रकारे राजकीय पक्ष वागत आहेत. या सर्व प्रकारामुळे तर निवडणुकीत पाण्यासारखा पैसा खर्च होतो आहे. राजकीय पक्षांची मनमानी, निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ पाहता लोकांच्या तोंडातून एकच वाक्य निघत आहे ते असे की, कुठे चाललाय महाराष्ट्र माझा...

### बंडोबांना थंड करण्यासाठी २ दिवस... अंतिम चित्र ३ जानेवारीला

सर्वच राजकीय पक्षात मोठ्या प्रमाणावर बंडखोरी झालेली आहे. विशेष म्हणजे बहुतांश महापालिकेत प्रमुख राजकीय पक्ष स्वबळावर अथवा समविचारी पक्षांशी युती-आघाडी करून निवडणूका लढवत आहेत. परंतु इलेक्टिव्ह मेरिट हा गोंडस शब्द उमेदवारीसाठी परफेक्ट मानला जातो. साम-दाम-दंड असणाऱ्यांना उमेदवारी देण्याकडे राजकीय पक्षांचा ओढा असतो. पुण्यात तर अजित राष्ट्रवादीने नामांकित गुंडाच्या परिवारातील सदस्यांनाच उमेवारी दिल्याने गुंडांना राजकीय नेत्यांचाच राजाश्रय असतो हे सर्वश्रुत झाले आहे. बुधवार, ३१ डिसेंबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. १ आणि २ जानेवारी रोजी उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहेत. त्यामुळे छाननीनंतर शिल्लक उमेदवारांमधून जे बंडखोर उमेदवार असतील अशांची मनधरणी करण्यासाठी पक्षांना २ दिवस मिळणार आहेत. बंडोबा थंड झाले नाही तर मात्र अनेक पक्षांना याचा फटका बसू शकतो. पण शेवटी निवडणुकीत जो जिंकून येतो तो आमचा हा सर्वच पक्षांचा अजेंडा असतो. ३ जानेवारीला अंतिम यादी प्रसिध्द होणार आहे.

## विचारपुष्प



मनुष्याची आपलेपणाची जाणीव ही फार तर त्याच्या कुटुंबाविषयी अथवा त्याच्या जातीपर्यंत विस्तारित होते. तिच्या कक्षा रुंदावत जेव्हा संपूर्ण सृष्टीशी एकाकार होतात तेव्हा मनुष्य ईश्वररूप होतो. रामकृष्ण परमहंसांच्या शब्दात मिठाची बाहुली समुद्राची खोली मोजायला उतरते आणि स्वतःच समुद्र होऊन जाते. त्यामुळे भारतीय चिंतन 'अस्तित्वासाठी संघर्ष' या सिद्धांताशी सहमत नाही.

**- पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# अर्जाची मुदत संपली, गुंतागुंत कायम

**महायुती-आघाडीत गोंधळ; वरिष्ठ नेत्यांचे मौन, कार्यकर्ते संभ्रमात**

**मुंबई, ३० डिसेंबर**
राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या रणधुमाळीत अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी उमेदवारी वाटपावरून सर्व पक्षांत गोंधळ उडाला. सत्ताधारी महायुती असो की विरोधातील महाविकास आघाडी पक्षात गुंतागुंत कायम होती. वरिष्ठ नेत्यांनी मौन बाळगल्याने कार्यकर्ते संभ्रमात होते. मुंबई, ठाणे महापालिकेत भाजपा-शिवसेना एकत्र लढत असली तरी राष्ट्रवादी काँग्रेसने स्वबळावर ९४ जागांवर उमेदवार जाहीर केले. याशिवाय नांदेड, मीरा-भाईंदर, धुळे, उल्हासनगर आणि सांगली येथे शिवसेना-भाजपाने स्वतंत्रपणे संपूर्ण जागा लढवण्याचा निर्णय घेतल्याचे स्थानिक नेत्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे सर्वच पक्षांनी आयारामांना उमेदवारी देण्याला प्राधान्य दिल्याने पक्षातील इच्छुकांनी संताप व्यक्त केला. भ्रमनिरास झाला : संजय शिरसाट मंत्री संजय शिरसाट म्हणाले, संभाजीनगरमध्ये शेवटच्या



टप्प्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसमोर जागावाटप ठरले होते. मात्र प्रत्यक्ष जागा देण्याची वेळ आली, तेव्हा शिवसेनेच्याच जागा सोडाव्यात, असा प्रस्ताव भाजपकडून देण्यात आला. त्यामुळे आम्ही आमच्या वाटेने जाण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे शिवसेना नेते नाना भानगिरे यांनी सांगितले की, आम्ही महापालिकेच्या सर्व १६५ जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे. रामदास आठवले नाराज केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अर्थात् आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले म्हणाले, नागपूर, अमरावती आणि संभाजीनगरसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये आम्हाला जागा नाकारण्यात आल्या. नालासोपारा, कल्याण-डोंबिवलीमध्ये जागा दिली नाही, भिवंडीत एका जागेवर आमची बोळवण करण्यात आली. त्यामुळे मुंबईत आम्ही ३९ जागांवर स्वबळावर लढणार आहे. भाजपाला स्वतःचा पक्ष वाढवण्याचा अधिकार असला, तरी त्यांनी मित्रपक्षाचाही विचार करायला हवा.

### पुढच्या दोन दिवसांत चित्र स्पष्ट : उदय सामंत

महायुतीतील पक्षांमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत चित्र स्पष्ट न झाल्यामुळे कार्यकर्ते संभ्रमात होते. अशातच पुणे येथे शिवसेना नेते व मंत्री उदय सामंत यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, राज्यातील अनेक महापालिकांमध्ये आम्ही महायुतीत लढत आहोत. पुढच्या दोन दिवसांत चित्र स्पष्ट होईल. छत्रपती संभाजीनगरला एकमत न झाल्यामुळे पुण्यासारखे चित्र आहे, मात्र आम्ही दोन दिवसांत संभ्रम दूर करू. महायुती म्हणून निवडणुकीनंतर तिन्ही पक्ष एकत्र येणार आहे, त्यामुळे कार्यकर्त्यांनी गैरसमज करून घेऊ नये.

# भय अन् भ्रष्टाचार बंगालची ओळख

## अमित शाह यांचा ममता सरकारवर घणाघात




**कोलकाता, ३० डिसेंबर**
भय, भ्रष्टाचार आणि कुशासन हीच पश्चिम बंगालची ओळख बनली आहे. घुसखोरांचा विकास आणि गरिबांची पिळवणूक हेच तृणमूल काँग्रेसचे धोरण आहे आणि बंगालची जनता आता भ्रष्ट सरकारला वैतागली आहे, असा घणाघात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी ममता सरकारवर केला.

१५ वर्षांत तृणमूलने लुटपाट आणि घुसखोरांना आश्रय देण्याशिवाय काहीही केलेले नाही, अशी टीका त्यांनी येथे आयोजित पत्रपरिषदेत केली. दोन दिवसीय बंगाल दौऱ्यावर ते आले होते.

अमि शाह यांनी पत्रकारांच्या प्रश्नांचे उत्तर देताना सांगितले की, २०२६ मध्ये भाजपाचे सरकार आल्यास राज्यातील घुसखोरांना शोधून देशाबाहेर काढले जाईल, विकासाला गती दिली जाईल आणि बंगालचा सांस्कृतिक वारसा पुनरुज्जीवित केला जाईल. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात बंगालमध्ये भाजपाचे सरकार स्थापन होईल. भय आणि भ्रष्टाचारापासून बंगालच्या जनतेला मुक्त करण्याला आमचे प्राधान्य असेल. बंगालच्या सीमेवरून होणारी घुसखोरी हा केवळ राज्याचाच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेशी संबंधित विषय आहे.

१५ एप्रिल २०२६ नंतर जेव्हा बंगालमध्ये भाजपाचे सरकार येईल, तेव्हा आम्ही बंग गौरव, बंग संस्कृती आणि त्याच्या पुनर्जागरणाची सुरुवात करू. विवेकानंद, बंकिम बाबू, गुरुदेव टागोर आणि श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्वप्नातील बंगाल घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे. आजच्याच दिवशी १,९४३ मध्ये बंगालचे सुपुत्र आणि महान स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांनी पोर्ट ब्लेअरमध्ये पहिल्यांदा स्वतंत्र भारताचा झेंडा फडकवला होता. *(वृत्तसंस्था)*

## नामांकित खेळाडूंशी संवाद साधणार पंतप्रधान



**नवी दिल्ली :** विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, बॅडमिंटन दिग्गज पुलेला गोपीचंद आणि टेनिसपटू लिएंडर पेस यांच्यासह अनेक अव्वल खेळाडू ९ ते १२ जानेवारी दरम्यान भारत मंडपम येथे होणाऱ्या डेव्हलप इंडिया युथ लीडरशिप डायलॉग २०२६ मध्ये सहभागी होतील. डेव्हलप इंडिया युथ लीडरशिप डायलॉग हा युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाचा एक प्रमुख उपक्रम आहे, ज्याचा उद्देश भारतातील तरुणांना विकसित भारताच्या दृष्टिकोनाला आकार देण्यात अर्थपूर्ण भूमिका बजावण्यास सक्षम करणे आहे. मंत्रालयाच्या मते, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील ५ दशलक्षाहून अधिक तरुणांचे मूल्यांकन केल्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील 'डेव्हलप इंडिया युथ लीडरशिप' संवादात सहभागी होण्यासाठी एकूण २,००० तरुणांची निवड करण्यात आली आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त १२ जानेवारी रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय युवा दिन हा या कार्यक्रमाचा एक प्रमुख आकर्षण असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी या दिवशी निवडक तरुण नेत्यांसोबत संवाद साधतील. तरुण सहभागींच्या एका गटाला पंतप्रधानांसमोर त्यांचे विचार सादर करण्याची विकसित भारतच्या दृष्टिकोनाबद्दल मार्गदर्शन, मिळेल.

## महापालिका निवडणूक; भाजपाने खाते उघडले

**मुंबई :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरु असून भाजपाने विजयाचा श्रीगणेशा केला असून कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीत भाजपाच्या उमेदवार रेखा चौधरी बिनविरोध निवडून येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मंगळवार, ३० डिसेंबर रोजी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी रेखा चौधरी यांचा बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला आहे. योग्यवेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून यांच्या विजयाची अधिकृत घोषणा होणार असल्याचे वृत्त आहे.

## रेलवन ॲपवरून जनरल तिकिटात सवलत

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने रेलवन ॲपद्वारे अनारक्षित (जनरल) तिकीट बुक केल्यास तिकिटाच्या दरात तीन टक्के सवलत देण्याची घोषणा केली आहे. रेल्वे मंत्रालयाच्या मते, ही ऑफर १४ जानेवारी २०२६ ते १४ जुलै २०२६ पर्यंत म्हणजेच सहा महिन्यांसाठी लागू राहील. रेल्वेने सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टिमला पत्र पाठवून सॉफ्टवेअरमध्ये बदल करण्यास सांगितले आहे. विशेष बाब म्हणजे, ही सवलत केवळ आर-वॉलेटपुरती मर्यादित राहणार नाही, तर कोणत्याही डिजिटल पेमेंट मोडने (उदा., क्रेडिट/डेबिट कार्ड किंवा नेट बँकिंग) पेमेंट केल्यास मिळेल.



## माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे निधन

### बांगलादेशात तीन दिवसांचा शोक

**ढाका, ३० डिसेंबर**
बांगलादेशच्या राजकारणातील एक कणखर नेतृत्व आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपीच्या नेत्या खालिदा झिया यांचे राजधानी ढाका येथे मंगळवारी पहाटे दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारने तीन दिवसांचा शोक आणि एक दिवसाची सार्वजनिक सुटी जाहीर केली. खालिदा यांच्या पार्थिवावर बुधवारी शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात येईल. बीएनपी पक्षाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, गेल्या अनेक दिवसांपासून झिया यांची प्रकृती चिंताजनक होती. ढाका येथील एव्हरकेअर रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने बांगलादेशच्या राजकारणातील एका अध्यायाचा अंत झाला.



## शिक्षक भरतीचे काम आता परीक्षा परिषदेकडे

**पुणे :** शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत मोठा बदल केला आहे. शिक्षक भरती परीक्षांचे आयोजन आणि निवड प्रक्रिया एकाच संस्थेकडे राहण्याच्या दृष्टीने आता महाराष्ट्र राज्य परीक्षा परीक्षा परिषदेकडे आता शिक्षक भरतीचीही जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक भरतीची प्रक्रिया पवित्र प्रणालीच्या माध्यमातून राबवली जाते.

# तंबाखूजन्य पदार्थ चारपट महाग होणार

### १८ रुपयांची सिगारेट मिळणार ७२ रुपयांना

**नवी दिल्ली, ३० डिसेंबर**
भारतातील धूम्रपान करणाऱ्यांच्या खिशावर लवकरच मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. संसदेने केंद्रीय उत्पादन शुल्क (सुधारणा) विधेयक- २०२५ ला मंजुरी दिली आहे. यामुळे सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादनांवरील करांमध्ये मोठी वाढ करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सार्वजनिक आरोग्य लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचा सरकारचा दावा आहे. उद्योग आणि ग्राहक आता नवीन किमती आणि त्यांच्या परिणामांवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी सादर केलेले हे विधेयक सिगारेट, सिगार, हुक्का तंबाखू आणि चघळणाऱ्या तंबाखूवरील उत्पादन शुल्क दरांमध्ये लक्षणीय सुधारणा करते. सुधारित कायद्यात वेगवेगळ्या ग्रेड आणि लांबीच्या वेगवेगळ्या सिगारेटवरील कर अनेक पटीने वाढवला जातो. याचा थेट परिणाम किरकोळ किमतींवर होण्याची शक्यता आहे. पूर्वी, प्रति एक हजार सिगारेट्सवर उत्पादन शुल्क २०० ते ७३५ रुपयांपर्यंत होते. दुरुस्तीनंतर, १८ रुपयांच्या सिगारेटची सध्याची किंमत सुमारे ७२ रुपयांपर्यंत वाढू शकते. केवळ सिगारेटच नाही तर इतर तंबाखू उत्पादनांवरही मोठ्या प्रमाणात कर लावण्यात आला आहे. चघळणाऱ्या तंबाखूवरील उत्पादन शुल्क २५ टक्क्यांवरून १०० टक्के करण्यात आला आहे. हुक्का तंबाखूवरील शुल्क २५ टक्क्यांवरून ४० टक्के करण्यात येईल. धूम्रपान मिश्रणावर सर्वाधिक परिणाम होईल. याचा कर ६० टक्क्यांवरून ३०० टक्के करण्यात आला आहे. भारतात तंबाखूवरील कर आधीच जास्त असले तरी, उत्पन्नाच्या तुलनेत सिगारेट परवडणाऱ्या आहेत.



सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

'सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका सांगे भविष्याची दिशा'

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य
- संकष्टी चतुर्थी, गावोगावचे चंद्रोदय
- आरोग्य विषय व बारा ज्योतिर्लिंग माहितीसह भरगच्च मजकूर

आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.







नोंदणीसाठी संपर्क : 8888847267

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# माघ यात्रेला भाविकांना पुरेशा सोई-सुविधा

## गहिनीनाथ महाराज औसेकर; श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्ती संवर्धनाबाबत बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. ३० डिसेंबर-**

माघ एकादशी दि. २९ जानेवारी, २०२६ रोजी असून, या यात्रेला येणा-या भाविकांना पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आहेत. या बरोबरच श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्ती संवर्धनाबाबत जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक प्रस्तावित करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

मंदिर समितीची सभा श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेस शकुंतला नडगिरे डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख, हभप प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक संदेश भोसले, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, पुरातत्व विभागाचे सहा. संचालक डॉ. विलास वाहणे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे एस. विनोदकुमार, जतन-संवर्धन कामाचे ठेकेदार, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे उपस्थित होते.

या सभेमध्ये श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराच्या जतन व संवर्धन कामाचा आढावा घेण्यात आला. सर्व कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याच्या सुचना पुरातत्व विभागास देण्यात आल्या. याशिवाय, श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेच्या मुर्ती संवर्धनाबाबत



आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना भारतीय पुरातन विभागाने दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने देखील पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक प्रस्तावित करण्यात आली असून, या बैठकीस स्थानिक लोकप्रतिनिधी, मंदिर समिती सदस्य, सल्लागार परिषद सदस्य, स्थानिक महाराज मंडळी यांना आमंत्रित करण्यात येणार आहे. यामध्ये पुरातत्व विभागाने दिलेल्या अहवालानुसार श्रींच्या मूर्ती संवर्धनाचा निर्णय घेण्यात येणार आहे. याशिवाय, मंदिर समितीच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना सेवानिवृत्तीनंतर श्री विठ्ठलाची नित्यपुजा उपलब्ध करून देणे, उपदान लागू करणे, श्रीक्षेत्र आळंदी येथे जागा खरेदी करणे, भेट स्वरूपातील दाग-दागिन्यांचे मुल्यांकन करणे, जमिनी ज्वाईंटव्हेंचर म्हणून तीन वर्षासाठी भाडे तत्वावर देणे इत्यादी निर्णय घेऊन, टोकन दर्शन प्रणालीचा आढावा घेण्यात आला असून, त्याची दैनंदिन संख्या १२०० वरून १८०० करण्यात आली.

याशिवाय गहिनीनाथ महाराज औसेकर यांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार मिळाल्याबद्दल व पृथ्वीराज राऊत यांनी मागील चार महिने चांगल्या पध्दतीने व्यवस्थापक पदाचा कार्यभार सांभाळल्या बद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. मंदिर समितीचे कर्मचारी अंबादास गजाकोष व श्री बसवगोपाल नीलमाणिक मठाच्या दासोहरण चक्रवर्ती अन्नदानेश्वर महाराज उर्फ आप्पाजी यांना नुकतीच देवाज्ञा झाली. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**समितीच्या विद्युत व्यवस्थेच्या खर्चामध्ये होणार बचत**

श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथील फ विंगच्या इमारतीमध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सीएसआर फंडातून विद्युत व्यवस्थेसाठी १२५ केव्हीचा सोलर प्लांट उभारण्यात येत आहे. त्याचा शुभारंभ मंदिर करण्यात आला. त्यामुळे विद्युत व्यवस्थेच्या खर्चामध्ये १ ते १.५ लक्ष रुपयाची बचत होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

---

## महत्वाचे...



### अध्यापक विद्यालय पंढरपूरची डीएलएड अभ्यासक्रम अंतर्गत क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० डिसेंबर-**

येथील अध्यापक विद्यालय पंढरपूर मधील सर्व विद्यार्थ्यांनी नुकतीच क्षेत्र भेटीसाठी ऐतिहासिक वास्तू म्हणून सिद्धेश्वर मंदिर, माचनूर आदी ठिकाणी भेटी देऊन तेथील सर्व माहिती जाणून घेतली. दुसरी भेट पी.एम.श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिद्धापूर या ठिकाणी भेट देऊन त्या शाळेमधील असलेल्या भौतिक सोयी सुविधा,शाळेची गुणवत्ता, शाळेचा परिसर, शाळेतील विविध प्रयोगशाळा, शाळेतील विविध रजिस्टर यांचा अभ्यास मुलांनी करुन माहिती जाणून घेतली. या प्रसंगी मंगळवेढा पंचायत समिती शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी बिभीषण रणदिवे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानावरती चालला जाणारा तसेच कमी कामगारांवरती चालणारा साखर कारखाना म्हणून ज्या कारखान्याची ओळख आहे तो म्हणजे मंगळवेढा परिसरातील युटोपियन सहकारी साखर कारखाना, अशा कारखान्याला भेट दिली. तेथील सर्व तंत्रज्ञान माहिती मुलांनी जाणून घेतली. या दौऱ्यात सर्व मुलांनी मंगळवेढा येथील प्रसिद्ध असे रिद्धीसिद्धी गणपती मंदिर या ठिकाणी सुद्धा भेट देऊन तेथील कलाकृतींचा आनंद घेतला. क्षेत्रभेट दौऱ्यामध्ये मंदिराच्या ठिकाणी त्या मंदिराचे पुजारी तसेच ज्या शाळेमध्ये भेट देण्यासाठी गेलो त्या शाळेतील मुख्याध्यापक सर्व शिक्षक तसेच कारखान्याचे वरिष्ठ अधिकारी रविराज पाटील यांनी आमच्या विद्यार्थ्यांना माहिती दिली. क्षेत्रभेट उपक्रमासाठी संस्थेचे सचिव सु .र. पटवर्धन, संस्थेचे सदस्य एस.पी. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले तर कॉलेजचे प्राचार्य डॉ.एच.आर. वाघमारे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. तसेच या क्षेत्रभेट कार्यासाठी संतोष गंगथडे, श्रीनिवास हरिदास, पाटील, एच.डी.जाधव, मनोज पाडवी, अतुल शिखरे, अभिजीत अवताडे तसेच संजय गोसावी यांनी सहकार्य केले.

### अ. भा. विद्यार्थी परिषद कुर्डूवाडी शाखा शहर अध्यक्ष सुशील शिंदे



**कुर्डूवाडी, दि. ३० डिसेंबर-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद कुर्दुवाडी शाखेची नवीन शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली. शहर अध्यक्ष म्हणून प्रा. सुशील शिंदे आणि शहर मंत्री म्हणून सोनिया गोरे यांची एकमताने जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणी घोषणावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी आगामी काळात विद्यार्थीहितासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य अधिक जोमाने, नियनित व संघटित पद्धतीने चालू राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या नव्या कार्यकारिणीच्या घोषणेमुळे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद कुर्डूवाडी शहराच्या कार्याला नव्याने गती मिळाली असून विद्यार्थी प्रश्न, शैक्षणिक गुणवता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या कार्यात विदयार्थी परिषद अधिक सक्रियपणे कार्य करणार आहे. यावेळी परिषदेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य व सोलापूर विभाग संयोजक ओम इंगळे उपस्थिती होते.

### सांगोल्यात प्राण्यांचा छळ, सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सांगोला, दि. ३० डिसेंबर-**

सांगोल्यात सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी जनावर आठवडा बाजार येथे प्राण्यांचा छळ केल्याप्रकरणी ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युवराज शिवाजी गेजगे (वय-५०), बाळासाहेब ईश्वर गेजगे (वय-५५), समाधान संभाजी गेजगे (वय-२२), लालु हत्तेकर सर्व रा.अकोला, ता.सांगोला, लक्ष्मण वाण्याप्पा गरांडे (वय-५०), रा.गोणेवाडी, ता.मंगळवेढा, धोंडीराम नामदेव पारसे (वय-५९), रा.सावे, ता.सांगोला यांनी संगनमत करुन त्यांचे ताब्यातील एकूण ३६ खिलारी जातीचे खोंड व २ जर्शी गायी सांगोला जनावर आठवडा बाजार येथे सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी रात्री सव्वा बाराच्या सुमारास लोखंडी अँगलला दोरीने बांधलेले तसेच त्यांना चारा व पाण्याची तसेच औषधाची कोणतीही सुविधा नसताना त्यांना अमानुषपणे, निर्दयीपणे बांधुन ठेवले होते. याबाबत पोना.अंकुश नलवडे यांनी सांगोला पोलीस ठाणे येथे प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम नुसार फिर्याद दिली आहे. पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

### इंडियन दलित सेनेतर्फे उद्या कार्यकर्त्यांचा मेळावा

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

इंडियन दलित सेनेतर्फे सेनेचा नववा वर्धापन दिन तसेच भीमा कोरेगाव २०८ व्या विजय दिनानिमित्त गुरुवार, दि. १ जानेवारी रोजी दलित कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला आहे, अशी माहिती सेनेचे संस्थापक अध्यक्ष देविदास दुपारगुडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि. १ जानेवारी रोजी सोलापूर येथील समाजकल्याण केंद्र, रंगभवन चौक येथे दुपारी २ वाजता हा मेळावा घेण्यात आला आहे. इंडियन दलित सेनेचे संस्थापक अध्यक्ष देविदास दुपारगुडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्याचे उद्घाटक माजी आमदार बाबुराव माने हे राहणार आहेत. मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी विचारवंत डॉ. संघप्रकाश दुडे, डॉ. अंजना गायकवाड हे उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष विद्या लोलगे, जनविकास क्रांती सेनेचे राज्य उपाध्यक्ष अंगद जाधव, माजी नगरसेविका मेनका चव्हाण, जिल्हा वंचित बहुजन आघाडीचे महासचिव अनिरुध्द वाघमारे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे. या मेळाव्यास सोलापूर शहर जिल्ह्यातील डॉ. आंबेडकर चळवळीतील व इंडियन दलित सेनेच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन इंडियन दलित सेनेतर्फे करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेत शहर अध्यक्ष सुहास बिराजदार, अर्चना केंगार, स्वदीप वाघमारे, प्रभाकर गायकवाड आदी उपस्थित होते.

---

### राऊत बंधूंच्या स्मरणार्थ उद्या रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**

स्व. सुशील व शीतल राऊत यांच्या स्मरणार्थ १ जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रक्तदात्यांनी सहभाग घेऊन सर्वश्रेष्ठ दान रक्तदान करावे असे आवाहन जय शिवराय प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर गुरुवार दि. १ जानेवारी रोजी सकाळी ८ ते सायं. ७ वाजेपर्यंत क्रीडा भवन, शनी मंदिराजवळ येथे होणार आहे. तरी रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करावे, असे आवाहन आयोजक स्व.सुशील-शीतल राऊत मित्र परिवार व जय शिवराय प्रतिष्ठान, बार्शी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### मोडनिंब ग्रामपंचायतीची ग्रामसभा तहकूब

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३० डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात सर्वात मोठ्या असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट असलेल्या मोडनिंब (ता. माढा) ग्रामपंचायतीची ग्रामसभा नागरिक उपस्थित नसल्याने पुढे ढकलण्यात आली. मंगळवार दि. ३० रोजी दुपारी दोन वाजता ग्राम पंचायतीच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित केलेल्या सभेला कोरम पूर्ण करण्याइतके ग्रामस्थ उपस्थित राहत नाहीत.मात्र मोडनिंबकरानी गावात काय चालले आहे. समस्या कोणत्या व समस्या किती? यासह इतर आणि अडीअडचणी सोडवण्यासाठी ग्रामसभेला उपस्थित राहून यावर चर्चा होणे, अपेक्षित होते. मात्र ग्रामसभेसाठी असणारा कोरम पूर्ण न झाल्याने, त्यासोबतच सरपंच,ग्रामपंचायत सदस्यांनी देखील ग्रामसभेला दांडी मारल्याने ग्रामसेवक व ग्रामपंचायत प्रशासनाला ग्रामसभा तहकूब करावी लागली. ग्रामसभेस नागरिकांचा आवश्यक कोरम पूर्ण न झाल्याने पुढची तारीख घ्यावी लागली.

मोडनिंबची लोकसंख्या वीस हजारांच्या वर झाली आहे. गावच्या प्रश्नांसंदर्भात, समस्यांबाबत ग्राम सभेत झालेले ठराव हे गावच्या विकासासंदर्भात महत्वाचे ठरतात. प्रकृतीच्या कारणास्तव सरपंच उपस्थित राहू शकले नाहीत.असे सांगितले. ग्रामसभेसाठी आवश्यक गणपूर्तीअभावी ग्रामसभा तहकूब करण्यात आली. गणपूर्तीअभावी पुढची तारीख घ्यावी लागली.



### ग्राहकांसाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम करण्याची गरज : हरिदास

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० डिसेंबर-**

ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकांना मिळालेले हक्क,अधिकाराचा लाभ घेण्यासाठी प्रशासन यंत्रणा कार्यक्षम करण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाधक्ष शशिकांत हरिदास यांनी राष्ट्रीय ग्राहक दिन समारंभात बोलताना केली.

संपूर्ण देशभर २४ डिसेंबर हा दिवस शासकीय, अशासकीय कार्यालयात ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सोलापूर येथील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय समारंभात हरिदास बोलत होते.

अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा भारती सोलवंडे, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी निलेश देठे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल,जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास,महिला विभाग प्रमुख माधुरी परदेशी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक लवकरच घ्यावी अशी मागणी परिषद सदस्य दीपक इरकल यांनी केली. समारंभासाठी दतात्रय कुलकर्णी, शशिकांत नरुटे, संतोष उपाध्ये, ॲड.विजय कुलकर्णी उपस्थित होते. राजन घाडगे यांनी सूत्रसंचालन केले.

---

### पांगरीत बार्शीच्या नूतन नगरसेवक व कृउबा समितीच्या संचालकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**

तालुक्याचे माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या उपस्थितीत बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, उपसभापती बाबासाहेब गायकवाड, नगरपालिकेच्या नुतन नगराध्यक्षा तेजस्विनी कथले व बाजार समिती सर्व संचालक तसेच सर्व नगरसेवक यांचा सत्कार पांगरी येथे करण्यात आला. त्याचबरोबर

घनकचरा व्यवस्थापन निधी ४६ लाख ८४ हजार ४२६ रुपये मंजूर कामाचे उद्घाटन माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. राज्य शासनाच्या महसूल विभागात ग्रामसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल अभिजित माळी, प्राजक्ता बाळासाहेब मोरे तसेच वकृत्व क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल प्रणीता शहाजी धस हिचा सत्कार माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राजकीय क्षेत्रातील प्रमुख मान्यवर तसेच ग्रामपंचायत व विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी सदस्य तसेच पांगरी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तरुणीचा विनयभंग; जीवे मारण्याच्या धमक्यांमुळे तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. ३० डिसेंबर-**

सोशल मीडियावरून झालेल्या ओळखीचा फायदा घेत एका तरुणाने तरुणीचा छळ केल्याचा धक्कादायक प्रकार बार्शी तालुक्यातील वैराग येथे समोर आला आहे. वारंवार मिळणाऱ्या जीवे मारण्याच्या धमक्या आणि होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून अखेर पीडित तरुणीने वैराग पोलीस ठाण्यात धाव घेत संबंधित तरुणाविरुद्ध फिर्याद दिली आहे.

पीडित तरुणी आणि आरोपी तरुण यांची वर्षभरापूर्वी सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि ते एकमेकांच्या संपर्कात राहिले. मात्र, काही काळाने त्यांच्यामध्ये 'जातीची भिंत' आडवी आल्याने तरुणीने संबंधित तरुणापासून दूर जाण्याचा प्रयत्न सुरू केला. तरुणीने संपर्क तोडण्याचा प्रयत्न केल्यामुळे संतप्त झालेल्या तरुणाने तिचा पाठलाग करणे आणि त्रास देणे सुरू केले. त्याने वारंवार तरुणीची गाठ घेऊन तिच्या आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच अनधिकृतरीत्या मोबाईलवर संपर्क साधून तिला बोलण्यासाठी दबाव टाकला. तरुणीने बोलण्यास नकार दिल्यावर तिला विविध प्रकारे धमकावण्यात आले.

**साताऱ्यातही केला पाठलाग**

घटनेचे गांभीर्य तेव्हा वाढले जेव्हा १ जून २०२५ रोजी तरुणी आपल्या कुटुंबासोबत एका लग्नकार्याला जात होती. यावेळी आरोपीने दुचाकीवरून येत तिचा पाठलाग केला आणि भररस्त्यात तिच्या आई-वडिलांना ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे घाबरलेल्या कुटुंबियांनी तरुणीला सुरक्षिततेसाठी सातारा जिल्ह्यातील नातेवाईकांकडे पाठवून दिले. मात्र, तिथेही आरोपीने तिचा पिच्छा सोडला नाही. तरुणी साताऱ्यात किराणा माल आणण्यासाठी दुकानात गेली असताना, आरोपीने तिथेही पोहोचून तिला दुचाकीवरून येऊन धमकावले. आरोपीने तिचा हात धरून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला, शिवीगाळ केली आणि तिला शारीरिक त्रास दिला.

हा सर्व प्रकार सहनशक्तीच्या पलीकडे गेल्यावर, पीडित तरुणीने आपल्या कुटुंबियांच्या मदतीने वैराग पोलीस ठाणे गाठले. तिने घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला असून, आरोपी तरुणाविरुद्ध रीतसर तक्रार दाखल केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपीचा शोध सुरू आहे.

---

### सोलापूर जनता बँक अक्कलकोट शाखेचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० डिसेंबर-**

सोलापूर जनता सहकारी बँक अक्कलकोट शाखेचा ग्राहक स्नेह मेळावा पार पढला.

पहिल्यांदा भारतमाता प्रतिमेचं पुजन व दीपप्रज्वलन करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांचे परिचय संतोष वगाले यांनी करुन दिले.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रमुख जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदिपसिंग रजपूत व ता. संघचालक रविंद्र जोशी संपर्क संचालक जगदिश भुतडा सहाय्यक व्यवस्थापक रामदास सिध्दुल, माजी शाखाधिकारी विजयकुमार माळगे, प्रशासन अधिकारी नागेश गुणके, सुवर्णा साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत होते.सोलापूर जनता बँक हि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी १९६३ साली सुरु केली. बँकेला ६० वर्षे पूर्ण होत आहेत.या साठ वर्षात खातेदार, हितचिंतकांचा अढळ विश्वास बँकेने संपादन केले आहे. त्यानिमित्त ग्राहक स्नेह मेळावा आयोजित करण्यात आले होते.

बँकेचे विविध कर्ज योजना, ग्राहकांना दिल्या जाणा-या विविध सुविधा, व हिरक महोत्सव वर्षानिमित्त हिरक कर्ज योजना इ. ची माहिती शाखाधिकारी संकेत धारुरकर यांनी करुन दिली. संपर्क संचालक यांनी जनता बँकेच्या स्थापनेमागचा उद्देश, बँकेची सद्यस्थिती, व आगामी योजना इ. बद्दलची माहिती दिली. ग्राहकांच्या मनोगतात अभिजीत लोके सरांनी बँकेची तत्पर सेवा, ग्राहकांसोबत कर्मचा-यांचे सुसंवाद, ग्राहक सर्वतोपरी हि भावना संचालक व कर्मचा-यांची असल्याने बँकेची उत्तरोत्तर प्रगती होत असल्याचे सांगितले.



कनिष्ठ अधिकारी वर्षाराणी जंगम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शरणप्पा भासगी,सायबण्णा सोनकांबळे, ऋषिकेश कोथिंबीरे,संदिप कटकधोंड यश कडगंची,महेश हळगोदे,राजेंद्र पवार, निलेश माळी यांनी परिश्रम घेतले.

---

## शेतातील रस्ता बंद करून ऊसाची वाहने अडविल्यास फौजदारी गुन्हा होणार

### तहसीलदार बुटे यांनी घेतला निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

दिवसेंदिवस शेतीचा रस्ता अडविण्याच्या प्रकारात वाढ होत आहेत. त्यामुळे पोलीस व महसूल विभागामधील तक्रारी वाढत आहेत. ऊस तोडणी झाल्यानंतर ऊस वाहतूक करणारी रस्ता बंद करून वाहने अडविल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची तारांबळ होत आहे. ऊसाचे वजन घटल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे.

मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयात शेकडो शेतकर्यांनी रस्ता मागणीसाठी अर्ज केला असल्याने नूतन तहसीलदार विष्णू बोटे यांनी शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेतला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या रस्ता अडविल्यास त्या शेतकऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा निर्णय तहसीलदार बुटे यांनी घेतला आहे. त्यामुळे ऊस तोडणी झाल्यानंतर वाहने अडविणाऱ्या शेतकऱ्यांवर वचक बसणार आहे. शिवाय शेतकऱ्यांना वहिवाटीसाठी रस्ता मिळणार आहे.



शेतकऱ्यांमधील वादामुळे शेती रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रस्ताव प्रलंबित आहेत. यामुळे शेतकरी व प्रशासनाचेही वेळ वाया जात आहे. शेतकऱ्यांमध्ये समन्वय साधून रस्त्याचा प्रश्न सोडवणार आहे. ऊस तोडणी झाल्यानंतर रस्ता बंद करून वाहने अडविल्यास संबंधित शेतकऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे.

**- विष्णू बुटे,** तहसीलदार, अप्पर तहसील, मंद्रूप



मंद्रूपचे नूतन तहसीलदार विष्णु बुटे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी चांगला निर्णय घेतला आहे. शेतात ऊस वाहतूक करणारी वाहने अडविल्यास त्यांच्यावर फौजदारी करण्याचा निर्णय कौतुकास्पद आहे. यामुळे शेतकरी सामंजस्यातून वाद मिटवून घेतील. प्रशासन व शेतकऱ्यांचा वेळ वाया जाणार नाही.

**- भीमाशंकर बबलेश्वर,** सरपंच, भंडारकवठे



अमित शाह यांच्या दारात उभे राहणाऱ्यांना शिवसेना म्हणू नका. शिवसेना म्हणून मिरवणारे लोक भाजपाने फेकलेल्या जागांवर लढत आहेत, हे केवळ हास्यास्पद नाही तर धक्कादायक आणि लाजिरवाणे आहे.
**संजय राऊत**, उबाठा शिवसेना खासदार


तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार, ३१ डिसेंबर २०२५





जर तुम्ही तुमच्या मुलींना पद्मावतीचा जौहर (शौर्य) शिकवला नाही, तर मुली परधर्मात आपला पती शोधतील. मुलींना संस्कृतीविषयी सांगितले नाही, तर त्यांना भरकटवणे सोपे होईल. याच कारणामुळे आज धर्म परिवर्तन आणि लव्ह जिहादची प्रकरणे वाढत आहेत.
**हर्षा रिचारिया**, इन्फ्लुएन्सर

# उत्तराखंडात बस दरीत कोसळली

## ● भीषण अपघातात १० प्रवासी ठार, १२ जखमी ● जखमींना हवाई रुग्णवाहिकेने हलवले

◆ **नैनीताल, ३० डिसेंबर**

उत्तराखंडमधील नैनीताल जिल्ह्यातील अल्मोडा येथे मंगळवारी सकाळी ८ वाजताच्या सुमारास प्रवाशांनी भरलेली खाजगी बस १६० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात १० प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर १२ पेक्षा जास्त लोकांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना हवाई रुग्णवाहिकेने ऋषिकेश येथील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. अल्मोडा येथून रामनगरला जात असताना भिकियासैंण-रामनगर मार्गावरील शीलापाणी गावाजवळ हा अपघात झाला.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, अल्मोडा येथून एक खाजगी बस २५ प्रवाशांना घेऊन रामनगरच्या दिशेने निघाली होती. शीलापाणी गावाजवळील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस १६० फूट दरीत कोसळली. घटनेची माहिती मिळताच राज्य आपत्ती प्राधिकरणाचे पथक आणि पोलिस काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचले. ग्रामस्थांच्या मदतीने बचावकार्य राबवून अपघातग्रस्तांना बसमधून बाहेर काढले. घटनास्थळी १० प्रवाशांचा मृत्यू झाला.



दरीत कोसळलेली बस आणि घटनास्थळी बचावमोहीम राबविताना पोलिस व स्थानिक

डोंगराळ भाग असल्याने मदत आणि बचाव कार्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. १० जखमींना सुरुवातीला भिकियासैंण येथील सरकारी रुग्णालयात, तर दोन जणांना रामनगर येथील राम दत्त जोशी शासकीय संयुक्त रुग्णालयात हलवले होते. अपघातग्रस्त बस रामनगरच्या कुमाऊं मोटर ऑनर्स युनियन (केएमओयू) लिमिटेड संस्थेची आहे. तिला अकरा वाजता रामनगरला पोहोचायचे होते. या घटनेत चालकही गंभीर जखमी झाला आहे. १० मृतांपैकी ७ अल्मोडातील, तर तिघांची ओळख अद्याप पटलेली नाही. अपघातात जखमी झालेले सर्व १२ प्रवासी अल्मोडा जिल्ह्यातील रहिवासी आहेत. (वृत्तसंस्था)

### मृतकांना आर्थिक मदत जाहीर

**उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी 'एक्स'वर म्हटले की, अल्मोडा येथील अपघात अतिशय दुर्दैवी आहे. मी मृतकांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो. सरकारकडून मृतकांच्या वारसांना दोन लाख, तर जखमींना ५० हजारांची मदत दिली जाईल. जखमींना त्वरित आणि योग्य वैद्यकीय सेवा उपलब्ध देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिला आहे.**



हैदराबाद येथील पद्मनाभ स्वामी मंदिरात वैकुंठ एकादशी उत्सवानिमित्त मंगळवारी काढलेल्या धार्मिक मिरवणुकीदरम्यान पालखी वाहून नेताना भाविक

# सौदी अरबचा येमेनवर हवाई हल्ला

## हुथी बंडखोरांच्या अड्ड्यांवर बॉम्बहल्ला



**१५ ठार**
**३० जखमी**

◆ **रियाद, ३० डिसेंबर**

सौदी अरबच्या वायुदलाने हुथी बंडखोरांच्या अड्ड्यांना लक्ष्य करीत सोमवारी रात्री येमेनच्या मुकाल्ला शहरावर बॉम्बहल्ला केला. यात १५ पेक्षा अधिक हुथी बंडखोर ठार आणि ३० पेक्षा अधिक जखमी झाले. सौदी अरबमधून येमेनमध्ये शस्त्रांची तस्करी झाल्याची माहिती मिळाल्यानंतर हल्ले करण्यात आले.

सौदी अरबच्या लष्कराने प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, यूएईच्या फुजैराह बंदरातून येमेनच्या मुकाल्ला बंदरावर मोठ्या प्रमाणात शस्त्रांची खेप पोहोचविण्यात आली होती. उपग्रह छायाचित्राच्या आधारे याची खात्री पटवल्यावर लष्कराने हुथींच्या अड्ड्यांना लक्ष्य करीत अचूक हल्ले चढविले. नागरिकांचे नुकसान टाळण्यासाठी रात्रीच्या वेळी बॉम्बचा मारा करण्यात आला. या हल्ल्यात हुथींचे शस्त्रसाठे उद्ध्वस्त करण्यात आले.

### चार दिवसांत दुसरा हल्ला

**सौदी अरबने यापूर्वी शुक्रवारी हुथींच्या गटावर हवाई हल्ले केले होते. चार दिवसांतील हा दुसरा हल्ला आहे. बॉम्बहल्ले झालेले मुकाल्ला शहर येमेनच्या हद्रामौत प्रांतात आहे. ते एडेनपासून सुमारे ४८० किलोमीटर ईशान्येस आहे. हुथीने अलीकडेच या भागावर ताबा मिळवला आहे.**

बॉम्बहल्ल्यात हुथींचे १५ पेक्षा अधिक सदस्य ठार झाले, तर ३० पेक्षा अधिक जखमी आहे. यूएईमधील फुटीरतावादी गट सदर्न ट्रान्झिशनल कौन्सिल अर्थात् एसटीसीने शस्त्राचा पुरवठा केल्याचे आमच्या चौकशीत उघड झाले आहे. शस्त्रास्त्रांचा पुरवठा थांबवणे आणि फुटीरतावादी शक्तींना कमकुवत करून येमेनमध्ये शांतता राखणे हा या हल्ल्याचा उद्देश आहे, असे सौदी अरबने स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# धुक्यामुळे विमानांचे वेळापत्रक कोलमडले

## ● दिल्लीत ११८ उड्डाणे रद्द ● १३० विमानांचे मार्ग बदलले



◆ **नवी दिल्ली, ३० डिसेंबर**

दाट धुके आणि कमी दृश्यमानतेमुळे राजधानी दिल्ली विमानतळावर मंगळवारी विमानसेवांचे वेळापत्रक कोलमडले. ऐनवेळी ११८ उड्डाणे रद्द करण्यात आली आणि १३० विमानांचे मार्ग बदलण्यात आले, तर ९० पेक्षा अधिक विमानांचे उड्डाणे उशिरा आली.

इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासनाच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, उत्तर भारतात दाट धुके आणि कमी दृश्यमानतेमुळे विमान वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला आहे. विमानतळावरील एकूण ११८ उड्डाणे रद्द करण्यात आली आणि १३० उड्डाणे इतर मार्गाने वळवण्यात आली. याशिवाय ९० पेक्षा जास्त विमानांनी उशिरा उड्डाणे केले. कमी दृश्यमानतेमध्ये तांत्रिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या विमानानांच अडथळा येत आहे. नागरी उड्डयन मंत्रालयाने प्रवाशांना विमानतळावर जाण्यापूर्वी उड्डाणाची स्थिती तपासण्याचे आवाहन केले आहे.

उड्डाण विलंब झाल्यास प्रवाशांना नाश्ता, जेवण पुरवण्याचा निर्देश विमान कंपन्यांना देण्यात आला. याशिवाय उड्डाण रद्द झाल्यास पर्यायी विमानाची व्यवस्था करावी अथवा तिकीटांची २४ तासांत पूर्ण परतफेड करावी, अशा सूचनाही मंत्रालयाकडून देण्यात आल्या. (वृत्तसंस्था)

### प्रवाशांच्या मदतीसाठी पथके तैनात

धुक्यामुळे विमान प्रभावित होण्याची शक्यता असल्यास कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय प्रवाशांनी सहा महिन्यांपर्यंत त्याच तिकिटावर प्रवास करता येईल. प्रवास करायचा नसल्यास कोणत्याही कपातीशिवाय तिकिटांची पूर्ण परतफेड मिळणार असल्याचे एअर इंडियाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. प्रवाशांना मदत करण्यासाठी देशातील प्रमुख विमानतळावर कर्मचाऱ्यांची पथके तैनात करण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# सनी लिओनीचा मथुरेतील शो रद्द

### संतांनी केला होता विरोध

◆ **मथुरा, ३० डिसेंबर**

मथुरा येथे साधू-संतांच्या विरोधामुळे नवीन वर्षाच्या निमित्ताने होणारा अभिनेत्री सनी लिओनीचा कार्यक्रम रद्द करण्यात आला.

या कार्यक्रमावरून संत समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली होती. संतांचे म्हणणे होते की, ब्रजभूमीत अशा प्रकारचे कार्यक्रम धार्मिक परंपरांच्या विरोधात आहेत. अश्लीलता आणि बीभत्सता पसरवणारे कार्यक्रम स्वीकारले जाऊ शकत नाहीत. यामुळे भाविकांच्या श्रद्धेला धक्का पोहोचेल.

मथुरा येथील द ट्रंक हॉटेलमध्ये १ जानेवारी रोजी रात्री सनी लिओनीचा डीजे परफॉर्मन्स होता. तिच्या आगमनाची संपूर्ण योजना तयार झाली होती. कार्यक्रमासाठी प्रेक्षक म्हणून ३०० लोक येण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. त्याचे प्रवेश शुल्क निश्चित करण्यात आले होते. तिकिटाची किंमत २० हजार ते दोन लाख रुपयांपर्यंत होती.

असे सांगण्यात आले की, चार श्रेणींच्या तिकिटांची किंमत दोन लाख, एक लाख, हाय टेरेस सिटिंगची ६० हजार आणि कपल स्टँडिंगची किंमत २० हजार रुपये निश्चित करण्यात आली होती. तथापि, तिकिटांबाबत आयोजकांनी कोणतीही माहिती दिली नव्हती.

कार्यक्रम रद्द झाल्यानंतर हॉटेलचे मालक मितुल पाठक यांनी सांगितले, सनी लिओनी डीजेवर परफॉर्मन्स करते. देशभरात ती अशा अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी झाली आहे. आम्ही सर्व नियमांचे पालन करत होतो. पण, संतांची संमती नसल्याने आम्हाला निर्णय मागे घ्यावा लागला. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशवर हल्ला झाल्यास प्रत्युत्तर देणार

### पाकिस्तानी खासदाराची भारताला धमकी

◆ **इस्लामाबाद, ३० डिसेंबर**

भारताने बांगलादेशवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर पाकिस्तानी सैन्य आणि जनता प्रत्युत्तर देईल. भारत बांगलादेशवर दबाव आणून तिथे संघर्षाची परिस्थिती निर्माण करीत आहे. बांगलादेशाच्या विरोधातील कारस्थाने भारताने बंद करावे, अशी धमकी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचा पक्ष पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाज अर्थात् पीएमएल-एनचे खासदार कामरान सईद उस्मानी यांनी दिली.



उस्मानी एका कार्यक्रमात म्हणाले, भारताने बांगलादेशवर दबाव आणणे बंद करावे अन्यथा पाकिस्तान ढाक्यासोबत सर्व शक्तिनिशी उभा राहील. मी राजकारणी नव्हे, तर बांगलादेशच्या मातीला, इतिहासाला, त्यागाला आणि धैर्याला सलाम करणारा व्यक्ती म्हणून बोलत आहे. कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी आज बांगलादेश आणि पाकिस्तान एकत्र उभे आहेत. या प्रदेशातील सर्वांत मोठी समस्या म्हणजे जेव्हा एखादा मुस्लिम तरुण उठतो आणि एक प्रभावशाली आवाज बनतो तेव्हा त्याला दडपले जाते.

भारत फितना-ए-खवारीजच्या नावाखाली मुस्लिमांना एकमेकांविरुद्ध लढवत आहे. मुस्लिम तरुणांना त्यांचे कारस्थान समजले आहे. आता पाकिस्तान आणि बांगलादेशमधील प्रत्येक मुलगा उस्मान हादी आहे. बांगलादेशच्या लोकांनी भारतीय स्वातंत्र्य पूर्णपणे नाकारले आहे. कोणताही देश बांगलादेशवर दबाव आणण्याचा किंवा त्याच्या स्वायत्ततेवर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत असेल तर, पाकिस्तानचे सैन्य प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### रश्मिकाचे शुभमंगल २६ फेब्रुवारीला



**हैदराबाद** : दाक्षिणात्य तसेच हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारी अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांच्या नात्याची चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे. आता त्यांनी यावर शिक्कामोर्तब केले असून, त्यांच्या लग्नाची तारीखही समोर आली आहे. २६ फेब्रुवारी रोजी विजय-रश्मिका विवाह बंधनात अडकणार आहे. या शाही विवाहासाठी राजस्थानातील उदयपूरची निवड करण्यात आली आहे. उदयपूरमधील आलिशान आणि ऐतिहासिक राजवाड्यात हा विवाह सोहळा पार पडणार आहे. अर्थात् लग्न धडाक्यात होणार असले तरी यासंदर्भातील पाहुण्यांची यादी अतिशय मर्यादित राहणार आहे. कारण दोघांनाही आपले लग्न मोठा आणि गर्दीचा सोहळा व्हावा, असे वाटत नाही. त्यामुळे निवडक नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीत हा विवाह संपन्न होणार आहे.

### तिसरा सर्वाधिक कमाईदार 'धुरंधर'



**मुंबई** : रणवीर सिंहचा चित्रपट 'धुरंधर' बॉक्स ऑफिसवर सातत्याने दाद मिळवत मोठी कमाई करत मोठे विक्रम प्रस्थापित करत आहे. फक्त २५ दिवसांत १,११३ कोटींची कमाई करून हा इतिहासातील तिसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे. कमाईच्या बाबतीत, या चित्रपटाने शाहरुख खानच्या 'पठाण'चा विक्रम मोडला आहे, ज्याचे एकूण कलेक्शन १०५० कोटी आहे. आता हा चित्रपट लवकरच 'जवान'चाही विक्रम मोडू शकतो. 'धुरंधर' चित्रपट प्रदर्शनाच्या चौथ्या आठवड्यातही विक्रमी कमाई करत आहे. हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला होता. या कालावधीत प्रदर्शित झालेला कोणताही चित्रपट याच्या आसपासही पोहोचू शकलेला नाही. आता धर्मेन्द्र यांचा अखेरचा चित्रपट 'इक्कीस' १ जानेवारीला प्रदर्शित होतो आहे. त्याला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो, याकडे सिनेसृष्टीचे लक्ष लागले आहे.

### 'बॅटल ऑफ गलवान'वर चीनमध्ये नाराजी




**बीजिंग** : चीनमध्ये सलमान खानच्या आगामी चित्रपट 'बॅटल ऑफ गलवान'वरून टीका सुरू झाली आहे. या चित्रपटातील दृश्यांना वास्तवापासून वेगळे असल्याचे म्हटले जात आहे. अनेक लोक याच्या ट्रेलरमधील काही दृश्यांची तुलना हॉलिवूडच्या गेम ऑफ थ्रोन्स मधील दृश्यांशी करीत आहेत. 'ग्लोबल टाईम्स'ने या चित्रपटाबद्दल एक लेखही छापला आहे, ज्याचे शीर्षक आहे- 'बॅटल ऑफ गलवान' चित्रपटावर वाद, चित्रपट कितीही नाट्यमय असला तरी, देशाच्या सीमेवर परिणाम करू शकत नाही. जेव्हा चीन आणि भारताच्या संबंधांमध्ये सुधारणा होत आहे, तेव्हा या चित्रपटाचे प्रदर्शन होणे चुकीचे आहे. हा चित्रपट केवळ भारतीय दृष्टिकोन मांडून चीनविरोधी भावना वाढवू शकतो, असेही लेखात म्हटले आहे.




# २०२५ हे वर्ष कोणाचे?

**कालचक्र... अव्याहत फिरणारे अन् कालौघात घडणाऱ्या घटनांतून बोध देणारे... याच कालचक्रानुसार भूतकाळाच्या अनुभवातून वर्तमानात जगायचे असते, ते भविष्य समृद्ध करण्यासाठी. असाच हा आपला वर्षभराचा लेखाजोखा भविष्यातील संपन्नतेची शिकवण देणारा...**

- नवीन पंतप्रधान कार्यालयाला 'सेवा तीर्थ' असे नाव देण्यात आले. हे नाव सेवा, कर्तव्य आणि जबाबदारी या तत्त्वांवर आधारित आहे. सोबतच सर्व राज्यांचे राजभवन आता 'लोक भवन' झाले आहेत. म्हणजे पंतप्रधानांपासून सत्ताचालक, प्रशासकीय प्रमुख हे 'राज' करणार नसून 'लोक सेवा' करणार, असा धडा देणारे हे वर्ष ठरले.
- नव्याने केलेल्या जीएसटी कपातीने बाजारात आणि नागरी जीवनात अनेक वस्तू तसेच सेवा सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याने मोठा दिलासा मिळाला.



- महाकुंभमेळ्याचे आयोजन जगभरात नावाजले. देश-दुनियेतील लाखो भाविकांचे पाय कुंभस्थानी वळत होते आणि आपल्या उपस्थितीचा भाविकांनी अक्षरश: विश्वविक्रम केला.
- पहलगाम हल्ल्याने दिलेल्या जखमा पाकिस्तानचे पाणी रोखून आणि 'ऑपरेशन सिंदूर'ने काही अंशी भरल्या. पाकिस्तान आणि अवघ्या जगाला भारताच्या प्रतिकारशक्तीचे दर्शन झाले.



- कला, शिक्षण आणि समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्यासाठी ११३ जणांना पद्मश्री देण्यात आला. त्यात महाराष्ट्रातील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, प्रसिद्ध निसर्ग अभ्यासक मारुती चितमपल्ली, प्रसिद्ध होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. विलास डांगरे, शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे-देशपांडे, पर्यावरण क्षेत्रातील कामगिरीसाठी चैत्राम पवार आणि इतर मान्यवरांना गौरवण्यात आले.
- निवडणुकीचा विचार करता दिल्ली आणि बिहार राज्यातील विधानसभा निवडणुका विशेष चर्चेत राहिल्या. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी रेखा गुप्ता विराजमान झाल्या.
- देशभरात वक्फ (सुधारणा) कायदा लागू झाला. या कायद्याचा उद्देश वक्फच्या संपत्तीचे व्यवस्थापन, पारदर्शकता आणि दुरुपयोग थांबवण्यासाठी नियम कडक करणे हा आहे.
- गेल्या अनेक दशकांपासून एखाद्या आजारासारखा बळावलेल्या नक्षलवादाचे कंबरडे असे काही मोडले की आता पुढील काळात तो कोसळणारच, हे निश्चित झाले.
- चित्रपटसृष्टीतील दोन महान दिग्गज आणि एकमेकांचे जीवलग मित्र असणारे



अभिनेता मनोजकुमार आणि धर्मेंद्र यांनी याच वर्षी जगाला अलविदा म्हटले. संघर्षाच्या काळापासून एकत्र असणाऱ्या या मित्रांनी मरणाच्या दारातही एकमेकांची साथ सोडली नाही.

- याशिवाय अभिनेत्री संध्या शांताराम, असरानी, सतीश शाह, पंकज धीर, मुकुल देव, देव मुखर्जी, अच्युत पोतदार, शेफाली झरीवाला या कलाकारांचे जाणे दु:खद ठरले.
- सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई निवृत्त होऊन या सर्वोच्च पदावर न्या. सूर्य कांत विराजमान झाले.
- सिनेसृष्टीत छत्रपती संभाजी राजे यांच्यावर आधारित 'छावा' चित्रपटाने प्रेक्षकांना आकर्षित केले तर वर्षाअखेर 'धुरंधर'च्या यशाने चित्रपटगृहांमध्ये पुन्हा गर्दी जमू लागल्याचे चित्र साकारले.



- नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर आठ दिवसांच्या मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले. परंतु, त्यांच्या परतीच्या वाहनातील तांत्रिक समस्यांमुळे मोहीम अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडली. अखेर १८ मार्च २०२५ रोजी, अंतराळवीर पृथ्वीवर सुरक्षितपणे परतले.
- भारतीय महिला क्रिकेट संघाने २०२५ चा महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकून ऐतिहासिक विजय मिळवला. या महिला शक्तीच्या जोरावरच भारताने इतिहासात पहिल्यांदाच महिला विश्वचषक जिंकला.



- शुभांशू शुक्ला यांच्या अंतराळ प्रवासाचे मोठे यश ठळकपणे समोर आले. यात ते भारतीय वायुसेनेचे गट कर्णधार आणि चाचणी वैमानिक म्हणून ओळखले गेले आणि इस्रोच्या गगनयान मोहिमेचा भाग म्हणून 'ॲक्सिओम मिशन-४' मध्ये सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला भेट देणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरले.



- अयोध्येतील राममंदिरात ध्वजारोहण समारंभ चर्चेत होता. विवाह पंचमीच्या शुभ मुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिरात ध्वजारोहण केले आणि संपूर्ण परिसर भक्तिभावात न्हाऊन निघाला होता. यावेळी मंदिर विलक्षण तेजाने उजळले होते तर भक्तांमध्ये उत्साह होता.





- देवव्रत रेखे यांनी २०० वर्षांनंतर वयाच्या १९ व्या 'दंडकर्म पारायण' पूर्ण करत विक्रम रचला. विशेष म्हणजे हे दोन हजार मंत्रोच्चार त्यांनी ५० दिवसांत पूर्ण केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# पुढच्या पावलाची ऊर्जा!

या विश्वामध्ये पृथ्वीसारखे सौंदर्य, सजीवता आणि वैविध्यता असलेला आणखी कोणी ग्रह, तारा असेल की नाही, माहीत नाही. पण पृथ्वीवरचा प्रत्येक सजीव हा भाग्यवानच म्हटला पाहिजे. कारण, अन्यत्र कोठेही कोणाच्याही वाटणीस आलेले नाही असे जीवन, म्हणजे जगणे अनुभवण्याचे भाग्य त्याला मिळाले आहे. तो कोणत्याही रूपाने जन्माला आलेला असला, तरी त्याच्या आयुष्यावर त्याचे नेहमीच प्रेम असते आणि आपल्या वाटणीला आलेले आयुष्य जपण्यासाठी तो सदैव धडपड करत असतो. सजीवांचे वास्तव्य असलेल्यांच्या या जगात माणसाचा जन्म लाभणे हे दैवदुर्लभ भाग्य मानले जाते. कारण या सृष्टीमध्ये असंख्य सजीवांना निसर्गाने जन्म दिलेला असला, तरी मनुष्यजीवावर मात्र त्याची विशेष माया आणि मेहेरबानीदेखील आहे. अन्यांच्या जगण्यावर कायमच असुरक्षिततेचे सावट दाटलेले असते आणि त्या सावटाखाली वावरतानाही, सुरक्षित राहण्यासाठी आणि आपल्या वाटणीला आलेल्या जन्माची पालखी वाहण्यासाठी पुढची पिढी तयार करण्यासाठी धडपडणे एवढाच त्या अन्य सजीवांच्या जगण्याचा उद्देश असतो. माणसाचे जगणे मात्र याहून बरेच वेगळे असते. केवळ जन्माला आल्यापासून मृत्यू येईपर्यंतचे आयुष्य म्हणजे जगणे नाही, तर जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यानच्या वाटचालीत जे काही आयुष्य वाट्याला आलेले असते, त्याचे सोने करण्यासाठी धडपडणे हे खरे जगणे असते हे माणसाएवढे अन्य कोणाही सजीवास माहीतदेखील नसते. म्हणून माणसाचा जन्म हा अन्य कोणत्याही सजीवाहून श्रेष्ठ मानला जातो, कारण तसे आयुष्य पृथ्वीवरच्या अन्य कोणा अन्य सजीवास लाभलेले नसते आणि पृथ्वीबाहेरच्या विश्वात सजीव आहेत किंवा नाही यांचाच अजून शोध सुरू असल्याने, अन्यत्र कोठे माणसाएवढा प्रगत सजीव सापडण्याची शक्यताही नसते. म्हणूनच, जन्माला आल्यानंतर सुरू होणारा प्रवास हा खरे तर अज्ञाताचा प्रवास आहे हे माहीत असूनही, त्या प्रवासाच्या वाटेवर आनंदाचे मळे फुलविण्याचा माणसाचा प्रयत्न सतत सुरू असतो. कधी कधी त्याचीही स्पर्धा सुरू होऊन आपला मळा अधिक सुशोभित करण्याच्या हट्टापायी अन्यांचे मळे उद्ध्वस्त करण्याची दुर्बुद्धी कोणा एखाद्यास सुचत असेलही, पण कोठेतरी, कोणाचे तरी आनंदाचे मळे फुलविणे हा त्यामागचाही हेतू दुर्लक्षित करता येत नाही. सुखाच्या आणि समाधानाच्या वाटचालीत अनेकदा वेडीवाकडी वळणे लागतात, चढउतार लागतात, कधी चालताना दमछाकही होते. या प्रवासाच्या एखाद्या टप्प्यावर अनेक रात्री अनुभवाव्या लागतात, पण ही रात्र संपली की उद्या पुन्हा नवा सूर्य उगवणार आहे आणि नवा दिवस सुरू होऊन त्याच्यासोबत मिळणारी नवी ऊर्जा घेऊन नव्या उमेदीने पुढचा प्रवास करणार आहोत, हेही प्रत्येकास ठावूक असते. सूर्य मावळला की अंधार पडणार आहे आणि रात्र संपली की अंधारही संपून उजेडाची तिरीप पाहायला मिळणार आहे, या विश्वासाने चालताना अंधारवाटेवरदेखील पावले अडखळत नाहीत आणि मागे हटत नाहीत. पुढे पडणाऱ्या प्रत्येक पावलासोबत कधी सहजपणे, कधी खडतरपणे, कधी एकाकीपणे, तर कधी कुणाच्या आधाराने, प्रवासाची ही अज्ञात वाट चालत राहावी लागते. वाटेवरच्या अडथळ्यांची, वळणांची किंवा चढउतारांची पर्वा न करता चालत राहणे हेच जगणे असते. त्या चालण्याच्या प्रत्येक पावलावर आनंद उधळावा आणि तो एकमेकांसोबत वाटून घ्यावा. यातूनच प्रवास सुखकर होईलच, पण आपल्यासोबत चालणारे, आपल्या आसपासचे अशाच प्रवासातले वाटसरूदेखील आनंदाने पुढची पावले टाकतील आणि जगण्यातील आनंदाच्या अनुभवाने सुखावतील.

खरे म्हणजे, या वाटचालीसोबत पाठीवर घेतलेला दिवसाचा भार आपण नेहमीच आनंदाने वाहत असतो. त्या वाटचालीला साथ देणारा सूर्य दररोजच उगवतो आणि मावळल्यानंतर होणाऱ्या रात्रीचा अंधार संपून नवा दिवस सुरू होणार याची आपल्याला खात्रीही असते. म्हणूनच, कोणताही एखादा मावळता दिवस किंवा कोणताही एखादा नव्याने उगवणारा दिवस निसर्गाच्या नजरेत सारखाच असतो. त्यावर वेगळेपणाचा साज आपण, माणसांनी चढविलेला असतो. कारण त्या वेगळेपणाचा साज चढवून सजविला गेलेला दिवस वाटचालीतील आनंदाला नवी उमेदही देत असतो. संस्कृतीच्या संस्कारांनी संपन्न झालेल्या समाजाच्या जगण्याच्या प्रत्येक दिवसाची सुरुवातच पृथ्वीच्या स्तुतिस्तोत्राने होते आणि मावळल्यानंतरच्या नव्या दिवसाच्या प्रतीक्षेचा अंधारलेला काळदेखील पृथ्वीची प्रार्थना करून सरतो, त्यांना अशा एखाद्या दिवसाच्या वेगळेपणाचे अप्रूप असतेच असे नाही. पण जेव्हा आनंद वाटून घ्यायचा हे ठरलेलेच असते, तेव्हा जगाच्या जल्लोषाकडे त्रयस्थपणे पाहात राहण्याहूनही, त्यांच्या आनंदाची काही फुले आपल्या आसपासही उधळली गेली तर त्यात गैर काहीच नाही. म्हणूनच, नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला, काही काळासाठी तरी जुन्याचा विसर पडतो. ते सहजपणे होत जाते. कारण, ज्याला जगभरातील मनुष्यमात्राने नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येचा साज चढविलेला असतो, त्या वर्षअखेरीचा दिवस हा केवळ जल्लोषाचा नसतो. सरलेल्या काळातील कडू गोड आठवणींतून समाधानाचे धागे वेचून ते एकत्र करण्याचा व नव्या वाटचालीच्या वस्त्रामध्ये त्या धाग्यांची नक्षी सजवून पुढची वाटचाल सजविण्याचा सण म्हणून अशा दिवसाकडे पाहावयास हवे. अनुभवांनी भरलेल्या प्रवासातले एक पाऊल पार पडले, याचा आनंद साजरा करावा आणि पुढच्या पावलाची उमेद गाठीशी बांधावी, हाच त्या दिवसावर दाटलेल्या वेगळेपणाच्या जाणिवांचा हेतू असावा. आपल्याला पुढेच चालावयाचे आहे, हे नक्की असल्याची खात्री झाली, की पुढचा प्रवास आनंदाचा कसा होईल याची गणिते आखता येतात. तसे केले तरच पुढच्या प्रवास सोपा होईल, ही खूणगाठ मनाशी पक्की असणे कधीही चांगलेच!

तसे पाहिले, तर आपणा भारतवासीयांसाठी सांस्कृतिकदृष्ट्या आजच्या दिवसाचे वेगळेपण जाणवावे असेही नाही. अशा आनंदाची उधळण करण्यासाठी आपल्या संस्कृतीने अनेक सण, सोहळ्यांची सजावट करून आपल्या परंपरेची पालखी अगोदरपासूनच सजविलेलीही आहे. ती पालखी खांद्यावर घेऊनच जो समाज भविष्याची वाटचाल आनंददायक होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो, सहकार्याच्या, बंधुभावाच्या आणि एकतेच्या भावनेने परस्परांस सोबत देत राहतो, त्या समाजासाठी डिसेंबरचा अखेरचा दिवस किंवा जानेवारीचा पहिला दिवस हे काही सण नाहीतच. तरीही पृथ्वीवरील व्यावहारिक जगाने या दोन दिवसांना काही वेगळेपण बहाल केले असल्याने, त्याकडे पाहणे हा उपचार असला, तरी व्यवहारदेखील ठरला आहे. सरत्या वर्षात प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावावी अशा अनेक घटना घडल्या आहेत. या घटनांच्या शिदोरीनिशी उद्यापासून होणारी नव्या वाटचालीची सुरुवातही, नवी उमेद, नव्या महत्त्वाकांक्षा आणि नव्या जाणिवांनिशी होणार आहे. येत्या पंचवीस वर्षांचा काळ हा आपल्या वाटचालीचा अमृतकाळ असणार आहे. या अमृतकाळाची समाधानी सुरुवात सरत्या वर्षाने करून दिली आहे. म्हणून सरत्या वर्षाला आभारपूर्वक निरोप द्यायलाच हवा! कारण प्रत्येक सरत्या वर्षावर उमटणाऱ्या पाऊलखुणा पुसून नव्या पाऊलखुणा उमटविण्याचा उत्साह हीच आपली उमेद असते. प्रकाशाचा पावलापुरता कवडसाही नवी उमेद देतो आणि उद्याच्या उजेडाच्या दिशेने नव्या उत्साहाने पुढची पावले पडू लागतात. उद्या सूर्योदय होणारच आहे आणि त्या लख्ख प्रकाशातच आपण पुढचा प्रवास करणार आहोत, याची खात्री सरत्या वर्षाने दिली आहे. आज मागे वळून पाहताना, जगाच्या पाठीवर प्राप्त झालेली प्रतिष्ठा, अंतराळ कवेत घेण्याच्या ईर्ष्येने भारलेली मने, क्रांतीच्या नव्या पर्वातील तरुणाईचा सहभाग, ज्ञान, विज्ञानाच्या क्षेत्रातील चमकदार कामगिरी, अशा अनेक बाबींनी आजपर्यंतच्या वाटचालीची वाट सजविली आहे. या वाटेवर काटेदेखील होते, पण ते दूर करून पुढचे पाऊल टाकण्याची हिंमत सरत्या वर्षाने दिली आहे. म्हणून, आज लौकिकार्थाने साजऱ्या होणाऱ्या सरत्या वर्षाच्या उत्साहात सहभागी होण्यातही काही गैर नाही. कारण, सरत्या काळाने दिलेल्या अनुभवांच्या शिदोरीसाठी त्याचे आभार तर मानायलाच हवेत .

---

## विशेष

# पहिला वन्यजीव सुरक्षित महामार्ग

**प्रा. सुखदेव बखळे**

मध्य प्रदेशमधील नौरादेही व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या महामार्गाचा सुमारे ११.९६ किलोमीटरचा भाग दोन आणि चार लेनमध्ये विकसित करण्यात आला आहे. सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या संवेदनशील वन्यजीव क्षेत्रात हे 'रेड टेबल-टॉप मार्किंग' बसवण्यात आले आहेत. एखादे वाहन या लाल ब्लॉकवरून जाते, तेव्हा चालकाला थोडासा धक्का बसतो. त्यामुळे तो त्याचा वेग कमी करतो. लाल रंग आधीच धोक्याचा सिग्नल मानला जातो, म्हणून हे तंत्रज्ञान चालकांच्या मानसशास्त्रावरदेखील परिणाम करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)च्या अधिकाऱ्यांच्या मते, वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या भागात हरिण, नीलगाय आणि इतर वन्यजीवांचे रस्ते अपघात पूर्वी सामान्य झाले होते. हा भाग धोकादायक क्षेत्र मानला जात होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानके लक्षात घेऊन हे नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यात आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फक्त 'रेड टेबल-टॉप मार्किंग'च नाही तर पाच मिलीमीटर जाडीच्या पांढऱ्या पेव्हर शोल्डर लाईन्सदेखील तयार करण्यात आल्या आहेत. एखादे वाहन रस्त्यावरून घसरले किंवा चालक झोपला तर त्यांना सतर्क करण्यासाठी त्वरित कंपनांचा वापर केला जातो. शिवाय प्राणी सुरक्षितपणे रस्ता ओलांडू शकतील, यासाठी २५ वन्यजीव अंडरपास बांधण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीपासून येथे एकही अपघात किंवा वन्यजीवांना दुखापत झाल्याचे वृत्त नाही. वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्प हा मध्य प्रदेशमधील सर्वांत मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ २,३३९ चौरस किलोमीटर आहे. त्यात १,४१४ चौरस किलोमीटरचे कोअर आणि ९२२ चौरस किलोमीटरचे बफर क्षेत्र समाविष्ट आहे.

हा परिसर भारतीय लांडगा, पँथर, जंगली कुत्रा, कोल्हा, राखाडी कोल्हा आणि ओटर यासारख्या अनेक दुर्मिळ वन्यजीव प्रजातींसाठी एक प्रमुख अधिवास आहे. २०१८ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात त्याचा समावेश करण्यात आला होता आणि वाघांची संख्या आता २६ वर पोहोचली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर पोस्ट केले की, विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलन आणि वन्यजीवांचे संरक्षण लक्षात घेऊन भारतात प्रथमच महामार्गांवर पाच मिलीमीटर लाल 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग'चा वापर करण्यात आला आहे. २०१८ मध्ये या जिल्ह्याचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात समावेश करण्यात आला. येथे चितळ, चिंकारा आणि नीलगाय यांचीही संख्या वाढत आहे. काळविटांनादेखील संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले आहे. त्यामुळे मांसाहारी प्राण्यांना नैसर्गिक अन्न चक्र मिळते. नौरादेही व्याघ्र प्रकल्प सागर, दमोह आणि नरसिंहपूर या तीन जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. हा प्रकल्प मध्य प्रदेशमधील सर्वांत मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. पेंच आणि कान्हा येथून चितळ आल्याने गेल्या तीन ते चार वर्षांमध्ये त्यांच्या संख्येत



झपाट्याने वाढ झाली आहे. संरक्षणामुळे चिंकारा आणि नीलगायींची संख्यादेखील सातत्याने वाढत आहे. काळविटांची वाढती संख्या येथील मांसाहारी प्राण्यांसाठी चांगला अन्नपुरवठा करते. दोन वेगवेगळ्या प्रसंगी १५३ आणि ३५ काळविटांना पकडून संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळला सांस्कृतिक राजधानी जबलपूरशी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ४५ चा एक महत्त्वाचा भाग आता देशभरात महामार्ग अभियांत्रिकी आणि वन्यजीव संवर्धनाचे एक मॉडेल बनला आहे.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प अंमलबजावणी युनिटने नरसिंहपूर आणि जबलपूरमधील सुमारे बारा किलोमीटरच्या अत्यंत संवेदनशील भागाचे संरक्षण करण्यासाठी अभूतपूर्व आणि नावीन्यपूर्ण तंत्रांचा वापर केला आहे. हा भाग वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्पाच्या (पूर्वी नौरादेही वन्यजीव अभयारण्य) सीमेवरून जातो. वन्यजीवांच्या वावरामुळे आणि डोंगराळ प्रदेशामुळे हा भाग पूर्वी एक प्रमुख ब्लॅक स्पॉट (अपघात-प्रवण क्षेत्र) मानला जात होता. महामार्ग चौकापासून बेलखेडापर्यंत असंख्य अपघात होत असत. त्यामुळे प्रवासी आणि वन्यजीव दोघांसाठीही सुरक्षित कॉरिडॉर सुनिश्चित करण्यासाठी १२२.२५ कोटी खर्चाच्या ११.९६ किलोमीटर (२-लेन ते ४-लेन रुंदीकरण) प्रकल्पात विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर पाच मिलीमीटर जाडीचे उंच लाल मार्किंग लावण्यात आले आहे. एखादे वाहन त्यातून जाते, तेव्हा हलकासा धक्का निर्माण करते. त्यामुळे चालक आपोआप वेग कमी करतो. रस्त्यावरून जाणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी सौंदर्य आणि सुरक्षिततेमुळे त्याला 'रेड कार्पेट' असे टोपणनाव दिले आहे. येथे वन्य प्राण्यांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी २५ अंडरपास बांधण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना महामार्गाच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला धोका न घेता जाता येते.

येथे वन्यजीवांना रस्ता ओलांडण्यापासून रोखण्यासाठी संपूर्ण संवेदनशील भागात 'चेन-लिंक' कुंपण बसवण्यात आले आहे. रात्रीच्या अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाच मिलीमीटर जाडीची पांढरी खांद्याची रेषा तयार करण्यात आली आहे. चालक झोपेमुळे किंवा दुर्लक्षामुळे मार्गावरून दूर जायला लागला, तर ही रेषा लगेचच तीव्र धक्का देऊन त्याला सावध करते. या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रवासी आणि वन्यजीवांसाठी सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे हे आहे. भविष्यात हा महत्त्वाचा मार्ग पुन्हा कधीही 'ब्लॅक स्पॉट' बनू नये, याची दखल घेण्यात आली आहे. देशासाठी हा महामार्ग सुरक्षेचे एक अनुकरणीय मॉडेल आहे. जंगली क्षेत्रातून जाणारा आणि डोंगर कापून बांधलेला हा रस्ता तीव्र वळणांचा आहे. यावर उपाय म्हणून 'स्पीड डिटेक्टर' बसवण्यात आले आहेत आणि रस्त्याला लाल रंग देण्यात आला आहे. त्याला 'टेबलटॉप रेड मार्किंग' म्हणतात. ते दुरून सुंदर दिसते पण लाल रंग पाहून चालक वेग कमी करतात. त्यामुळे या भागात अपघातांचा धोका कमी होतो. सध्या हा रस्ता त्याच्या सौंदर्यामुळे आणि चालकांसाठी सुरक्षिततेमुळे चर्चेत आहे. अलिकडेच झालेल्या एका अपघातात चित्त्याच्या पिल्लाचा मृत्यू झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. रस्त्याच्या कडेला कुंपण घालण्यात आले आहे. वेग मोजणारी उपकरणे बसवण्यात आली आहेत. हे सर्व मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने आहे.

रस्ते बांधणीसोबतच प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे. भोपाळ-जबलपूर महामार्गावर सुरू करण्यात आलेले हे 'रेड टेबल टॉप मार्किंग' भारतातील रस्ते सुरक्षा आणि वन्यजीव संवर्धनासाठी एक नवीन उदाहरण ठरू शकते. हा लाल रस्ता 'स्पीड ब्रेकर'पेक्षा वेगळा आहे. तो सामान्य स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिपसारखा नाही. तो थोडा उंचावलेला आहे आणि दुरून स्पष्टपणे दिसतो. असे असले, तरी अनेक लोकांना भीती वाटते, की वेगळ्या रंगाचा रस्ता 'एडीएएस' प्रणालीला गोंधळात टाकू शकतो; परंतु तज्ज्ञ म्हणतात, की आधुनिक 'एडीएएस' केवळ रंगावर अवलंबून नाही. ते रस्त्याच्या कडा, कॉन्ट्रास्ट, रिफ्लेक्टिव्हिटी आणि कॅमेरे, रडार आणि लिडारसारख्या सेन्सरमधून माहिती घेते. हा लाल रस्ता दुबईच्या शेख झायेद रस्त्याचे अनुकरण आहे. शेख झायेद रस्त्यावर विशिष्ट भागात स्पष्ट रंगीत खुणा आहेत. त्यामुळे अपघात कमी झाले आहेत. भारतातील या प्रयोगातून रस्ते आता केवळ वाहनांसाठीच नव्हे तर मानव, प्राणी आणि पर्यावरण लक्षात घेऊन बांधले जात आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मते, हा प्रकल्प पर्यावरण मित्रत्व, सार्वजनिक सुरक्षा आणि वन्यजीव संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे लाल रस्ता धोक्याचे नव्हे, तर बुद्धिमान डिझाईनचे प्रतीक ठरत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**गिरीश शेरेकर**

# युतीत बिघाडी, आघाडीत थोडा समन्वय

अमरावती महानगरपालिकेच्या रणधुमाळीतला महत्त्वाचा टप्पा मंगळवारी पूर्ण झाला. महायुती व महाविकास आघाडीत निवडणूक लढविण्याच्या वल्गना करणाऱ्या सर्वच पक्षांनी आपल्या सोयीनुसार जागावाटप करून एकमेकांना धक्के दिले. काही ठिकाणी उमेदवारांची आयात व निर्यात झाली. गेल्या दोन दिवसांपासून अत्यंत हायहोल्टेज ड्रामा अमरावतीत सुरू होता. सर्वांत जास्त गोंधळ महायुतीत पाहायला मिळाला. शेवटच्या क्षणापर्यंत भाजपा व शिवसेनेची चर्चा सुरू होती. अखेर दोन्ही पक्षांनी वेगवेगळे लढण्याचा निर्णय घेतला. युतीतला आणखी एक मित्रपक्ष युवा स्वाभिमानला भाजपाने सोबत घेतले. पण, त्यांना फक्त आठच जागा दिल्याने त्यांनी जास्तीचे उमेदवार मैदानात उतरविले आहेत. शिवसेनेने भाजपाने उमेदवारी नाकारलेल्या अनेकांना वेळेवर उमेदवार बनवले. काहींना युवा स्वाभिमानने दिल्या आहेत. दुसरीकडे काँग्रेसने नावापुरत्या काही जागा मित्रपक्ष उबाठाला सोडल्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वच जागांवर उमेदवार दिले आहे. युतीत बिघाडी पाहायला मिळाली तर आघाडीत काही प्रमाणात समन्वय दिसला.

महापालिका निवडणूक महायुतीतले व महाविकास आघाडीतले पक्ष एकत्र लढतात की वेगवेगळे याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सर्वांत जास्त घडामोड महायुतीत होती. शिवसेनेने भाजपाला ३५ जागांचा प्रस्ताव दिला होता. तो नाकारून भाजपाने फक्त ११ जागा देण्याची तयारी दर्शविली होती. त्यांनी तो प्रस्ताव नाकारून वेगळी भूमिका घेण्याची तयारी केली असतानाच त्यांना थांबविण्यात आले. स्थानिक व वरिष्ठस्तरावर चर्चा झाल्यानंतर अखेर शिवसेनेला १६ जागा देण्याचे जवळपास निश्चित झाले होते. पण, त्यांनी १६ प्रभागात प्रत्येकी एक उमेदवार शिवसेनेचा राहील ही अट घातली. भाजपाने ती अमान्य केली. जेथे आमचे उमेदवार विजयी झाले, तेथील एकही जागा आम्ही देणार नाही, अशी भूमिका भाजपाने घेतली. नेमके याच मुद्यावरून भाजपा व सेनेत ठिणगी पडली आणि युती मोडली. भाजपाचे निवडणूक निरीक्षक संजय कुटे यांनी शेवटपर्यंत युती कायम राहील असा प्रयत्न केला. पण, भाजपातल्या अनेकांना सेनेसोबत युती नकोच होती. कारण, गेल्या निवडणुकीत भाजपाने ७४ जागा लढल्या व ४५ जिंकल्या. युतीत शिवसेनेला व युवा स्वाभिमानला २४ जागा दिल्यावर भाजपाकडे फक्त ५० जागाच शिल्लक राहणार होत्या. इतक्या कमी जागेत भाजपाला गेल्या निवडणुकीतली कामगिरी कायम राखता आली नसती. त्यामुळे भाजापाने सेनेसोबतची युती मोडून फक्त युवा स्वाभिमानला ८ जागा देऊन त्यांच्यासोबत युती केली. आता ६७ जागा भाजपा लढणार आहे. युवा स्वाभिमानने सध्या तरी ४१ जागांवर उमेदवार उभे केले. भाजपाने सुद्धा स्वाभिमानला दिलेल्या ८ जागांवर आपले उमेदवार अपक्ष म्हणून उतरविले आहे. स्वाभिमानने जास्तीचे उमेदवार मागे घेतले नाही तर भाजपाने अपक्ष म्हणून उतरविले उमेदवार मैदानात कायम राहतील. त्यावरून असे लक्षात येते की, भाजपाची युवा स्वाभिमानसोबत युती राहील की नाही? असा प्रश्न आता चर्चेला आला आहे. तुलनेने महाविकास आघाडीत कुठेही कुरबुर झाली नाही. काँग्रेस व उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार व अन्य छोट्या पक्षांनी समन्वयाने मार्ग काढला. काँग्रेस ७४ जागा लढविणार आहे. अन्य ठिकाणी सहकारी पक्षांसाठी त्यांनी जागा सोडल्या तर काही ठिकाणी ते मैत्रीपूर्ण लढणार आहे.

या सर्व गदारोळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शांत होता. 'एकला चलो रे'च्या भूमिकेवर कायम राहत कुठेही गाजावाजा न करता जवळपास ८२ ठिकाणी त्यांनी उमेदवार दिले आहेत. सांगायचा मुद्दा इतकाच की, सर्व पक्षांनी आपले उमेदवार मैदानात उतरवले आहे. अर्जाची छाननी व अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यावर प्रत्येक प्रभागातले अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. प्रत्येक प्रभाग आपल्या पक्षासाठी अनुकूल राहावा यासाठी येत्या दोन दिवसांत सर्वच प्रमुख पक्षांकडून प्रयत्न होणार आहे. इतर सर्व पक्षांच्या तुलनेत भाजपासाठी ही निवडणूक आव्हानात्मक आहे. शिवसेना स्वतंत्र लढत असल्याने मतविभागणी होऊन भाजपाला फटका बसेल का? याचे उत्तर सध्या तरी कोणाकडे नाही. गेल्या निवडणुकीत शिवसेना स्वतंत्रच लढली होती आणि त्यांचे ७ उमेदवार विजयी झाले होते. यंदा तर शिवसेनाच दुभंगल्याने त्यांच्याही अडचणी आहे. युवा स्वाभिमान व भाजपाची युती कोणते वळण घेते यावर काही प्रभागतली समीकरणे अवलंबून आहेत. यंदा नव्याने तयार झालेला राष्ट्रवादी अजित पवार पक्ष संपूर्ण ताकदीने उतरला असल्याने, त्याचा फटका नेमका कोणाला बसेल यावर चर्चा होत आहे. एकंदरीतच निवडणुकीत चांगलीच चुरस पाहायला मिळणार आहे.

९४२०७२१२२५

---

## धर्म-संस्कृती

# नृसिंह पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

महर्षी व्यासांनी मूळ अठरा पुराणांची रचना केली. तशीच त्यांनी अठरा उपपुराणेही लिहिलीत. नृसिंह पुराण या अठरा उपपुराणातील एक उपपुराण आहे. पुराण आणि दशावताराची सांगड व्हावी म्हणून आतापर्यंत पाहिलेल्या भगवान विष्णूंच्या अवतारमालिकेतील पुढील अवतार म्हणजे भगवान नृसिंह. हा अवतार समजून घेण्यासाठी या उपपुराणाला मुद्दाम हात घातला. नृसिंह पुराणात साहजिकच भगवान विष्णूंच्या नृसिंह अवताराची चर्चा असणे क्रमप्राप्त आहे. नृसिंह पुराणात एकूण अडुसष्ठ अध्याय असून तीन हजार चारशे चौसष्ट श्लोक आहेत. नृसिंह अवतार हा अर्धमनुष्य अर्ध पशू असा अवतार आहे. या आधीचे तीन अवतार मनुष्येतर आहेत. त्यामुळे हा अवतार नरपशू असल्याने त्याचे विशेष महत्त्व आहे. नृसिंह पुराणात भगवान नृसिंह अवताराबद्दलचा कथाभाग अध्याय ४० च्या पुढे असला तरी अवताराचे माहात्म्य प्रारंभापासूनच आहे. प्रारंभीच भरद्वाज मुनी सुत महाशयांना नृसिंह पुराण सांगण्याची विनंती करतात.

**सांप्रतं नारसिंहाख्याम् त्वतः पौराणसंहिताम् ।**
**श्रोतुमिच्छाम्यहं सूत श्रोतुकामा इमे स्थिताः ॥**

त्यानुसार ते हे पुराण सांगतात.

सुत महामुनी भरद्वाज संवादात अनेक विषय आहेत.

ब्रह्मदेवाचे आयुष्य आणि कालगणना, दक्षप्रजापती यांचा जीवनवृत्तांत, मार्कंडेय महामुनींचे जीवनचरित्र, त्यांचा मृत्यूवरील विजय, महामृत्युंजय स्तोत्र, यम संवाद, यमगीता, यम आणि यमाची बहीण यमी यांचा संवाद, ''ॐ नमो नारायणाय'' या अष्टाक्षरी मंत्राचा महिमा, विश्वकर्मा द्वारा सूर्यस्तुती, विविध वंश वर्णन, शांतनू चरित्र, ध्रुव चरित्र, भगवंताचे दशावतार जसे मत्स्य, कच्छ, वराह, परशुराम असे दहाही अवतार यांचे संक्षेपात चरित्र या पुराणात आहे. त्यातील नृसिंह अवतारासोबतच भगवान रामचंद्राचे विस्तृत चरित्र यात आहे. भगवान श्रीकृष्ण चरित्रही अंशतः आहे.

नृसिंह अवताराचे विश्लेषण करताना अध्याय ४० ते अध्याय ४४ पर्यंत नृसिंह भगवंताची अवतार कथा सांगतात. यात राजा सहस्रानिक भृगु ऋषींना भगवान विष्णूंच्या अवतार कथा सांगण्याची विनंती करतात तेव्हा भृगु ऋषी मार्कंडेय महामुनींना कथा सांगण्याची सूचना करतात. त्यामुळे या पुराणात प्रारंभी राजा सहस्रानिक आणि भृगु ऋषी संवाद आहे. त्यानंतर दशावतार सांगताना सहस्रानिक आणि मार्कंडेय संवाद आहे. तो असा-

सनतकुमारांच्या शापाने जय आणि विजय दैत्यकुळात जन्म घेतात. त्यातील विजय हिरण्यकश्यपू रूपात जन्म घेतात. हिरण्यकश्यपूने ब्रह्मदेवाची सहस्र वर्ष निराहार उपासना आणि घोर तपश्चर्या केल्यामुळे त्याला ब्रह्मदेवांकडून वरदान प्राप्त होते की त्याचा मृत्यू ना शस्त्राने ना अस्त्राने, ना मानव ना पशू, ना दिवसा ना रात्री, ना आत ना बाहेर, ना आकाशात ना जमिनीवर होऊ नये म्हणून अशा अनेक अशक्य बाबी वरदान म्हणून त्याने ब्रह्मदेवाला मागितल्या आणि देवाने त्याला त्या दिल्या. त्या वराने हिरण्यकश्यपू नावाचा दैत्य उन्मत्त झाला. स्वतःलाच देव समजू लागला. प्रजेलाही त्याने देव पूजा नाही तर स्वतःचीच पूजा करण्याच्या सूचना दिल्यात. सर्वत्र अराजक माजू लागले. यामुळे भीतिपोटी देवराज इंद्राने देवगुरू बृहस्पतींना हिरण्यकश्यपूच्या वधाचा उपाय विचारल्यावर सर्व देवगण भगवान महादेवासह भगवान विष्णूंकडे गेले. तेथे गेल्यावर भगवान विष्णूंनी सर्वांना भयमुक्त करण्याचे वचन दिले आणि सांगितले की हिरण्यकश्यपूच्या पोटी प्रल्हाद नावाचा पुत्र जन्माला येईल. त्याच्या योगाने या दैत्याचा वध मी करेन. इकडे हिरण्यकश्यपूने पुन्हा तपश्चर्या करण्याचा निश्चय केला. त्याचे आप्तगण त्याला म्हणू लागले की आपण त्रिभुवनाचे स्वामी. आता अजून काय हव ? तपश्चर्या नको आता. पण त्याने ऐकले नाही. काही हितकारी लोकांना घेऊन तो तप करू लागला. त्यामुळे देवगण चिंताग्रस्त झाले. त्यांनी ब्रह्मदेवांजवळ जाऊन चिंता व्यक्त केली. ब्रह्मदेवही काळजीत पडले तेव्हा देवर्षी नारदांनी मी तपश्चर्येत बाधा निर्माण करतो असे सांगून नारदमुनींनी त्यांच्या सोबत पर्वतमुनींना घेतले. दोघांनीही पक्ष्याचे रूप घेतले. जिथे हिरण्यकश्यपू तपश्चर्या करीत होता त्या ठिकाणी झाडावर बसून ॐ नमो नारायणाचा जप मोठ्या आवाजात करू लागले. त्यामुळे हिरण्यकश्यपूची तपश्चर्या भंग होऊन तो क्रोधित झाला. तो आसन सोडून पक्ष्यांच्या मागे लागला. तपश्चर्या भंग झाल्याने देवांचे संकट टळले. आता तो दैत्य घरी परत आला. त्यांनतर त्याची पत्नी कयाधू गर्भवती झाली. गर्भात असताना त्याच्यावर देवर्षी नारदाच्या आश्रमात राहण्याचा योग आला. त्या आश्रमातील दैवी संस्काराने तो प्रल्हाद वैष्णव झाला.

ही बाब स्वतः प्रल्हादांनी त्यांचे गुरू शांड आणि अमर्क यांना सांगितली.

**विष्णुभक्त्या प्रमुच्याथ गतः स्वं भुवनं हरिः ।**
**नारदस्तां समानिय आश्रमं स्वं शुभव्रतः ॥**

हे नृसिंह पुराणात विदित आहे. आपला पुत्र विष्णूंची आराधना करतो हे पाहून दैत्यराज हिरण्यकश्यपूने त्याला समजावून सांगण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला पण प्रल्हादावर काहीच परिणाम होत नाही हे पाहून त्याला मारून टाकण्याचा त्याने आदेश दिला. अनेक क्रूर प्रयत्न करूनही त्याला मारण्यात यश येत नाही हे पाहून एक दिवस चिडून त्याने कुठे आहे तुझा विष्णू? या खांबात आहे का?

**त्वयोक्तं स हि सर्वत्र, कस्मात्स्तंभे न दृश्यते ।**
**यदि पश्यामि तं विष्णुमधुना स्तंभमध्यगाम् ॥**

विचारल्यावर स्वयं नारायण नृसिंह रूपात प्रकट झालेत. दैत्याला मिळालेल्या वरदानाच्या सर्व अटी अबाधित ठेवून भगवान नृसिंहांनी हिरण्यकश्यपूचा वध केला. कथा सर्वांना माहीत आहे. आजही ही कथा सांप्रत स्थितीत आपल्यासाठी लागू पडते. सध्याही अनेक हिरण्यकश्यपू भारत आणि भारतीय संस्कृतीवर आघात करीत आहेत. भारतीय समाज मात्र खांबासारखा स्तब्ध आहे. संघासारख्या अनेक संघटना प्रल्हाद बनून जागरण करीत आहेत. खांबासारख्या निष्क्रिय नरांमधून सिंह जागृत व्हावा आणि सारा समाज नृसिंह बनावा. हिरण्यकश्यपूचा वध करून इथे ईश्वराचे रामराज्य निर्माण व्हावे. हाच या पुराणाचा आतासाठी संदेश आहे. भगवान नृसिंह अनेकांचे कुलदैवत आहे. उग्ररूप धारण केलेल्या नृसिंह भगवंताची आराधना घोर संकटातून मुक्त करते. या शिवाय शत्रूमध्ये असलेला शत्रुभाव नष्ट करण्याचे सामर्थ्य नृसिंह मंत्रात आहे.

**ॐ उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम् ।**
**नृसिंहं भीषणं भद्रं मृत्यु मृत्युं नमाम्यहम् ॥**

९८२२२६२७३५

---

## वाचक पत्रे

### राज्यात मनपा निवडणुकीचा रंग

सध्या संपूर्ण राज्यभरात मनपा निवडणुकीचा रंग चढलाय. विविध राजकीय पक्ष व उमेदवार चांगलेच कामाला लागलेले दिसताहेत. आधी तिकीट मिळावे म्हणून देव पाण्यात ठेवणारे आणि आता १६ तारखेच्या निकालात आपलाच विजय व्हावा म्हणून देव पाण्यात ठेवणारे उमेदवार मतप्राप्तीसाठी आता पुढील पंधरा दिवस दारोदारी फिरताना दिसतील. मतांचं पारडं भरण्यासाठी ताई, माई, अक्कांना आपलंसं केलं जाईल, खऱ्या-खोट्या आश्वासनाची यादी वाचली जाईल, अनेक दिग्गजांच्या सभा होतील, कॉर्नर मीटिंग्ज होतील, जेवणावळी-अल्पोपाहारही होतील.

अर्थात या साऱ्या गोष्टी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेत व्हाव्यात हेच अपेक्षित आहे. एक काळ असाही होता जेव्हा मतदारांना विविध प्रलोभने दाखवून मत विकत घेण्याचे प्रयत्न व्हायचे. निवडणुकीच्या काळात ''मूठभर चिवडा, घोटभर दारू जो देईल त्यावर शिक्का मारू'' ही म्हण प्रचलित असायची. आज काळ बदलला, मतदार राजा सुज्ञ झाला. काय चांगले काय वाईट हे त्यालाही कळायला लागले. लोकशाहीची पवित्र मूल्ये जपण्यासाठी तो पुढे सरसावला. पण समाजात कुठे ना कुठे ही वाईट प्रवृत्ती डोके वर काढतेच, तेव्हा तिला दाबण्याचाही प्रयत्न एक सुज्ञ नागरिक म्हणून आपलीही तेवढीच जबाबदारी आहे. लोकशाहीच्या या उत्सवात मतदान पारदर्शक, प्रलोभनविरहित तसेच विक्रमी म्हणजे मोठ्या संख्येने व्हावे यासाठी आपण सर्वांनी आपापल्यापरीने नक्की प्रयत्न करूया आणि आपल्या देशातील लोकशाही अधिक बळकट करूया...

**अखिल देशपांडे**/अकोला

●● ●●

### नवीन वर्ष समृद्धीचे जावो

जुने वर्ष संपून नवीन वर्ष येते तेव्हा वेळेच्या दारावर अलगद टिकटिक आवाज होतो. ''मी आलो आहे'' असे जणू ते हळूच कानात सांगते. जुन्या वर्षाच्या पायऱ्या ओलांडून ते आपल्या जीवनात प्रवेश करते आणि मनात नकळत नवे विचार, नवी उमेद जागवते. कॅलेंडरवरची तारीख बदलते, पण त्या बदलासोबत मनाच्या कोपऱ्यात काहीतरी नव्याने उमलू लागते. जुन्या वर्षाच्या आठवणीत मन रमून जाते. सुख-दुःखाचे कडू-गोड प्रसंग पुन्हा एकदा डोळ्यासमोर तरळू लागतात. त्या सर्व आठवणी म्हणजे रंगीबेरंगी चित्रांसारख्या असतात. काही आनंदाच्या, काही दुःखाच्या, तर काही शिकवण देणाऱ्या. त्या आठवणी मनाच्या कप्प्यात नीट जपून ठेवून पुढे जाण्याचे धैर्य नवीन वर्ष देते. ते आपल्याला सांगते की भूतकाळ विसरायचा नाही, पण त्यात अडकून देखील राहायचे नाही.

तशी तर रोजच्या सारखी पहाट होते पण आज नवीन वर्षाची पहाट ही खास असते. वातावरणात एक वेगळाच ताजेपणा जाणवतो. हिवाळाच्या थंड वाऱ्यासोबत आशेची चाहूल लागते. मनात नकळत विचार येतात की, या वर्षी काहीतरी वेगळं करूया, काहीतरी चांगलं घडवूया. मग संकल्प जन्माला येतात, काही ठाम असतात तर काही हळवे असतात. ते संकल्प कधी पूर्ण होतात, कधी वाटेत हरवतात, पण प्रयत्न करण्याची प्रेरणा मात्र कायम देऊन जातात. शेवटी नवीन वर्ष आपल्याला एवढेच सांगते की, मी फक्त एक सुरुवात आहे.

### वंदेभारतमधील एलईडी दिवे धोकादायक

वंदेभारत एक्सप्रेसमधील प्रखर पांढऱ्या LED प्रकाशामुळे प्रकाशप्रदूषण, झोप न लागणे व दुसऱ्या दिवशी आरोग्य अस्वस्थता होते. विमानासारखे रात्री ८नंतर प्रकाश मंद/बंद करावे. कोणतेही स्टेशन येण्याअगोदर ५-१० मिनिटेच चालू ठेवावे ही विनंती. (Ref. JwJbda white room torture gM© H$amdo.)

**प्रशांत महिंद्रकर, सोलापूर.**

---

## आजचे संघगीत-८९

बुधवार, ३१ डिसेंबर २०२५

### आव्हान द्यावया आम्हा कुणाची छाती?

आव्हान द्यावया आम्हा कुणाची छाती ?
दश-दिशांत अमुच्या सामर्थ्याची ख्याती ॥धृ॥

कैलासी अजुनी जागा तांडव राग, सागरी धगधगे वडवाग्नीची आग
मंत्रात शांतिच्या इथे जागते क्रांती ॥१॥

नगराज हिमालय उन्नत अमुचा माथा, इतिहास गातसे पुरुषार्थाची गाथा
प्रसवते वीरता कण कण इथली माती ॥२॥

आसेतु हिमाचल एक आमुचा देश, ही एक संस्कृती एकच दे संदेश
भारतीय रुधिरें जडली अमुची नाती ॥३॥

सुमकोमल आणि कठिण वज्रही आम्ही, खलसंहारास्तव होऊ रुद्रहि आम्ही
खड्गापरि कणखर इथे तृणांची पाती ॥४॥

ही असे अनादी, अनंत अमुची माता, हो धन्य वेदही हिचीच महती गाता
जगजननीची या कीर्ति देवही गाती ॥५॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# गैरहजर कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई : डॉ. ओम्बासे

### मतदान केंद्र कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

### आयुक्त व उपायुक्तांनी केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

सोलापूर महापालिका निवडणुकी प्रक्रियेतील नियुक्त कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य नियमानुसार बजावावे गैरहजर कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.



सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ च्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व कायदेशीर पद्धतीने पार पाडण्यासाठी मतदान केंद्रांवर नियुक्त करावयाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या पूर्ण करण्यात आलेल्या असून संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश पाठविण्यात आलेले आहेत.नियुक्त कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावरील कामकाजाबाबत सखोल व प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठी दि. २९, ३० व ३१ डिसेंबर २०२५ तसेच ९, १० व ११ जानेवारी २०२६ रोजी हुतात्मा स्मृती मंदिर व शिवछत्रपती रंगभवन येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षण हे दररोज दोन सत्रांमध्ये घेण्यात येत असून प्रत्येक दिवशी सुमारे २५०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे तसेच उपायुक्त आशिष लोकरे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी मतदान प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व कायद्यानुसार पार पाडण्याचे महत्त्व सांगून, मतदान केंद्रावरील जबाबदाऱ्या, शिस्तबद्ध कामकाज व निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या.प्रशिक्षणामध्ये मतदान केंद्रावरील कर्तव्ये, मतदार ओळख प्रक्रिया, मतदान यंत्र () व ची हाताळणी, निवडणूक आचारसंहिता तसेच मतदान दिवशी घ्यावयाची दक्षता याबाबत सविस्तर माहिती देण्यात येत आहे.


प्रशिक्षणानंतर संबंधित ठिकाणी मतदान यंत्रांची प्रत्यक्ष हाताळणी व प्रात्यक्षिक देखील दाखविण्यात येत असून कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यावर भर देण्यात येत आहे.दरम्यान, प्रशिक्षणास गैरहजर राहणारे कर्मचारी, तसेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना कार्यभारातून कार्यमुक्त न करणाऱ्या संस्था, तसेच निवडणूक आदेश रद्द करण्याबाबत दबाव तंत्राचा वापर करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## गंधर्वपुरात गुरुतत्वसोबतच नवविधाभक्तीचा प्रदीप अधिक तेजोमय

### १००८ श्री गुरुचरित्र सरामृत परायणास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**गाणगापूर, दि. ३० डिसेंबर-**

गुरूतत्व प्रदीप या पारमार्थिक समूहाच्या वतीने आयोजित संकल्पित श्री संत दासगणू महाराज विरचित श्री गुरुचरित्र सरामृत परायणाचे नववे पुष्पाला श्री क्षेत्र गाणगापूर येथे सुरुवात झाली.



कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी महाराजांच्या अष्टतीर्थ शाही स्नानाने झाली. श्री महाराजांचे अष्टतीर्थाचे शाही स्नानाचे समयी पुष्पवृष्टी व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. श्री गुरुचरित्र सरामृत परायणाला शुक्रवारी (दि.२६) प्रारंभ झाला. नित्य दिनक्रमात सकाळी श्री स्वामी महाराजांना राजोपचार अभिषेक तदनंतर नित्य दिनपाठ या मध्ये करुणात्रिपदी, स्तवन मंजिरी, घोरकष्टउद्धारण स्तोत्र, नर्मदाष्टक आदींचा समावेश आहे. नंतर गुरुमाई सौ यांच्या ओघवत्या वाणीतून श्री गुरूचरित्र सरामृत ग्रंथांचे वाचन, श्री स्वामींना माध्यान्ह भिक्षा व नैवेद्य आरती आणि महाप्रसाद श्री स्वामींचा भिक्षारूपी महाप्रसाद निर्गुण मठ व संगमावर सर्व दत्त भक्तांना मध्यानी व सायंकाळी दोन्ही वेळा देण्यात येतो. दुपारी ४ वाजेपासून श्री मकरंद माहाराज यांचे रसाळ आणि ओजस्वि वाणीतून श्री गुरुचरित्र कथामृत सांगितले जाते. कथामृतानंतर सहस्त्र दीपदर्शन सोहळा, हरिपाठ, संगित नामजप हे कार्यक्रम आणि वेद मंत्रोच्चाराने दिवसाची सांगता होते. या व्यतिरीक्त मंगळवारी कुंकुमार्चन सेवा, सौभाग्य अलंकार सेवा, कुमारिका पूजन, शतब्राम्हण भोजन, पठात्मक शतचंडी, विविध सिद्ध ग्रंथांचे पारायण होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे श्री गुरुचरित्र सारामृत ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीचे मकरंद महाराज व गुरुमाई यांचे हस्ते प्रकाशन झाले. यानिमित्ताने हा ग्रंथ सातासमुद्रापार गेला ही स्वामींची कृपा या भव्यदिव्य कार्यक्रमासाठी विविध शहरातून हजारो भाविक भक्त जमले आहेत कार्यक्रमाची सांगता २ जानेवारी रोजी महाप्रसादाने होत आहे.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना मोजे अक्कलकोट (ग्रामीण), ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथोल लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अक्कलकोट (ग्रामीण), तालुका अक्कलकोट येथील गट नं.९२१/अ/१/१ मधील प्लॉट नं.२ यांसी क्षेत्र ११२९.८ चौरस फुट, आकारणी १०.५० ही प्लॉटची जागा सौ. ताहेरा अकबर शेख यांचे मालकी व कब्जेवहिवाटीचे असून, त्यांनी सदरची मिळकत विक्रीस काढली असता, आमच्या अशिलांनी देऊ केलेली किंमत ही बाजारभावाप्रमाणे जास्तीची असल्याने त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमस्वरुपी खुषखरेदी देण्याचे ठरवून तसा करारही आमच्या अशिलांसोबत केला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिली आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत कोणाचीही कसलीही तक्रार, हक्क अथवा हितसंबंध, खरेदी, साठेखत, गहाणखत, दान, बक्षीस, पोटगी, दावा, अपील, इजमेंटरी राईट, कर्ज, लिज अथवा अन्य कोणताही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून खालील पत्यावर १५ (पंधरा) दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कळवून कागदोपत्री पुराव्यानिशी आमचे अशिलाची खात्री पटवावी, वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास, कोणाचीही कसलीही तक्रार नाही, असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिली आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची सक्तरित्या नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. ३०/१२/२०२५

**सही/-**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट**
**श्री. सय्यद उमर एस. चिस्ती (जहागीरदार)**
**बी.ए. (ऑनर्स) एल.एल.बी. ॲडव्होकेट**
**मो.नं. ७०२०५११४५६**
**ऑफिस पत्ता:- मु.पो. बऱ्हाणपूर,**
**ता. अक्कलकोट, जि. सोलापूर-४१३२१६**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन - जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, शहर सोलापूर मनपा हद्दीतील लक्ष्मी पेठ येथील मिळकत, यांसी टी.पी. नं. ४, फायनल प्लॉट नं. १३३/२०२ असून, याचे एकूण क्षेत्रफळ ८४१.७५ चौ.मी. असून, यात बांधलेल्या जयप्रकाश हाईटस् या अपार्टमेंट ओनरशिप इमारतीमधील तळमजल्यावरील शॉप नं. ९, याचे कारपेट क्षेत्र २२.८६ चौ.मी. असून सुपरबिल्टअप क्षेत्र ३१.५५ चौ. मी. असून, यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे :- पूर्वेस - रॅम्प अप, पश्चिमेस - शॉप नं. ८, दक्षिणेस - १.५२ रुंदीचे पॅसेज, उत्तरेस - पार्कीग येणेप्रमाणे वर नमूद शॉप मिळकत, तसेच सदर अपार्टमेंटच्या घोषणापत्रातील नमूद सर्व सामाईक हक्क व सोयी सुविधांसह, तसेच त्यातील तदंगभूत वस्तूंसह व वहिवाटींच्या हक्कासह.

यात वर नमूद शॉप मिळकत श्रीमती मिनाक्षी, कु. ज्योती, कु. जोत्सना, कु. जागृति, कु. जास्वंदी, कु. जयदेवी, कु. जिज्ञासा आणि श्री. जयदिप जयप्रकाश जानकर, सर्वजण रा. सोलापूर यांच्या संयुक्त मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटस्ला त्यांचे नावाची मालक म्हणून तशी रितसर नोंद आहे. यात सदर मालकांनी प्रस्तुत मिळकत विकसित करून व तेथे अपार्टमेंट इमारतीचे बांधकाम करून त्याची विक्री करण्याचे संपुर्ण अधिकार त्यांचे कुलमुखत्यारधारक व विकसनकार मेसर्स विजय कन्स्ट्रक्शन चे भागीदार श्री. विजयकुमार मल्लिकार्जुन आकळवाडी, वगैरे २ यांना दि. २२/०६/२०२१ रोजीचा नोंदणीकृत विकसन करारनामा दस्त नं. २३६४ व कुलमुखत्यारपत्र दस्त नं. २३६५ नुसार लिहून दिलेले असून सदर विकसनकर्त्याने प्रस्तुत मिळकतीत वरीलप्रमाणे अपार्टमेंट इमारतीचे बांधकाम केले असून त्यापैकी वरील नमूद तळमजल्यावरील शॉप नं. ९ आमचे अशिलास कायम खुषखरेदी लिहून देण्याचे मान्य व कबूल केले असून त्यापोटी त्यांनी आमचे अशिलाकडून दि. १७/१२/२०२५ रोजी रितसर इसारा रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत मालकांनी वरील नमूद शॉप मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची संपुर्ण हमी व खात्री आमचे अशिलास दिलेली आहे. सबब आमचे अशिल लवकरच सदर शॉप मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

तरी सदर शॉप मिळकतीवर कोणाचा काही गहाण, दान, टाच, लिज, बोजा, बक्षीस, साठेखत अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास अथवा हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसाचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी आमचे खालील नमुद पत्त्यावर समक्ष भेटून आमची तशी खात्री करुन द्यावी, मुदतीत कोणाची काही तक्रार अगर हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल यापुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही व कसलीही हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : ३०/१२/२०२५

**सही/-**
**धनंजय पांडुरंग केकडे**
**बी.कॉम (ऑ), एलएल.बी., जी.डी. सी. ॲन्ड ए., ॲडव्होकेट**
**ऑफिस - गाळा नं. २०९, स्टेटस् सिंबॉल, दुसरा मजला ४३७ पश्चिम मंगळवार पेठ, चाटी गल्ली, जैन मंदिरसमोर, सोलापूर-२**

### IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited and amalgamated with IDFC Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031. TEL: +91 44 4564 4000 | FAX: +91 44 4564 4022.

IDFC FIRST Bank

**परिशिष्ट ४ नियम ८(१) ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)**

मी, अधोस्वाक्षरीकर्ता, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड** आणि **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली) चा अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार १. फिरोज अकबर तांबोळी २. आरिफा फिरोज तांबोळी यांना २४/०८/२०२४ रोजी एक मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये त्यांना २४/०८/२०२४ रोजीची रक्कम २,११,५०८.२०/- रुपये (दोन लाख अकरा हजार पाचशे आठ रुपये आणि वीस पैसे फक्त) ही मागणी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, या २७ डिसेंबर २०२५ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड** आणि **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली) च्या २,११,५०८.२०/- रुपये (दोन लाख अकरा हजार पाचशे आठ रुपये आणि वीस पैसे फक्त) आणि त्यावरील व्याजाच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

**अचल मालमत्तेचे वर्णन**

टाकळी गाव, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित, ग्रामपंचायत टाकळीच्या नोंदवहीमध्ये मालमत्ता क्रमांक ३१४१ म्हणून नोंदणीकृत, तळमजल्याचे क्षेत्रफळ = ११०४ चौरस फूट, एकूण बांधकाम क्षेत्र = ११०४ चौरस फूट असलेले संपूर्ण निवासी घर, एकूण जमीन १५३० चौरस फूट, महाराष्ट्र-४१३३०४, आणि त्याच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे:- पूर्व : श्रीकृष्ण जाधव, पश्चिम : सुरेश थिटे, उत्तर : पल्लवी यादव, दक्षिण : रस्ता.

दिनांक : 27/12/2025
स्थळ : Mharashatra
लोन अकौंट नं. : 113806561

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)

### श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

**विक्री सुचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ मधील नियम ८ (६) व ९ नुसार स्थावर मालमत्तेची निविदा मागवून विक्री करण्याची सुचना**

येथे सूचना देण्यात येते कि, या ठिकाणी नमूद करण्यात आलेली स्थावर मिळकत ज्याचा ताबा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ नुसार घेण्यात आलेला असून निविदा मागवून मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे. खाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री पुढील अटी आणि शर्तीनुसार करण्यासाठी इच्छुक निविदादाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | कर्ज खाते क्र. / थकीत कर्ज रक्कम | मागणी नोटीस दिनांक / ताबा घेतलेली दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :** **१) गोविंद ट्रेडिंग कंपनी प्रोप: संगीता महेश बाफना** **रा:** २६००, बाफना भवन, ऐनापूर मारुती रोड, बार्शी ४१३४११ **जामीनदार :** **२) तातेड प्रदीप पुरणमल** **रा:** अरिहंत नगर, कासारवाडी रोड, बार्शी ४१३४०१ **३) महेश भवरीलाल बाफना** **रा:** २६०१, बाफना भवन, ऐनापूर मारुती रोड, बार्शी ४१३४११ | **कर्ज खाते क्र. ००६००३२१७००००००२०** एकूण रक्कम रुपये **५६,८०,८५०/-** (रुपये छप्पन लाख ऐंशी हजार आठशे पन्नास फक्त) + दि. ०१/१२/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च | **०९/१२/२०२४** **०६/०३/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील स्थावर मिळकत याचा सि. स. नं. २६०१, याचे एकूण क्षेत्र २४८.१ चौ. मी. त्यापैकी न विभक्त २/३ हिस्सा १६५.४ चौ. मी. यांसी चतुर्सिमाः **पूर्वेस** - सि. स. नं. २५९९ व २६०० **पश्चिमेस** - सि. स. नं. २६०२ **उत्तरेस** - सि. स.नं. २०९४ **दक्षिणेस** - रस्ता |
| २ | **कर्जदार :** **१) युती ऑइल्स प्रो.प्रा:गोविंद महेश बाफना** रा: २५९९/२६००, बाफना भवन, ऐनापूर मारुती रोड, बार्शी ४१३४११ **जामीनदार :** **२) तातेड प्रदीप पुरणमल** रा: अरिहंत नगर, कासारवाडी रोड, बार्शी ४१३४०१ **३) महेश भवरीलाल बाफना** रा: २६०१, बाफना भवन, ऐनापूर मारुती रोड, बार्शी ४१३४११ | कर्ज खाते क्र. ००६००३२१७००००००१८ एकूण रक्कम रुपये **५५,१२,०३३/-** (रुपये पंचाव्वन लाख बारा हजार तेहतीस) + दि.०१/१२/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च | **०५/१२/२०२४** **०६/०३/२०२५** | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील स्थावर मिळकत याचा सि. स. नं. २६०१, याचे एकूण क्षेत्र २४८.१ चौ. मी. त्यापैकी न विभक्त २/३ हिस्सा १६५.४ चौ. मी. यांसी चतुर्सिमाः **पूर्वेस** - सि. स. नं. २५९९ व २६०० **पश्चिमेस** - सि. स. नं. २६०२ **उत्तरेस** - सि. स.नं. २०९४ **दक्षिणेस** - रस्ता |

**राखीव किंमत :-** रु. १,३६,००,०००/- (रु. एक कोटी छत्तीस लाख फक्त)
**बयाणा रक्कम :-** रु. १३,६०,०००/- (रु. तेरा लाख साठ हजार फक्त)
**निविदा स्वीकृतीची तारीख आणि वेळ :** दि. ०२/०२/२०२६- दुपारी ३:०० पर्यंत
**निविदा दाखल करण्याचे ठिकाण:** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
**अ) निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ :** दि. ०३/०२/२०२६ सायंकाळी ५:०० वाजता
**ब) निविदा उघडण्याचे ठिकाण:** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**इतर अटी आणि शर्ती :**

१) स्थावर मालमत्तेची विक्री **"जेथे आहे, तशी आहे"** या तत्वावर आणि जर काही बोजा असेल तर त्यासह करण्यात येईल. (बँकेकडील माहितीनुसार मालमत्तेवर बोजा नाही)
२) राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीस मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.
३) मालमत्तेची पाहणी दिनांक ३१/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० पर्यंत करता येईल.
४) इच्छुक प्रस्तावकाने त्याची निविदा कोऱ्या कागदावर मोहोरबंद पाकिटात त्यावर **"बाफना यांची मौजे बार्शी येथील मालमत्ता खरेदीसाठी निविदा"** असे पाकिटावर लिहून बयाणा रक्कम अनामत रक्कमेपोटी (ईएमडी) **रु. १३,६०,०००/-** जी राखीव किंमतीच्या अंदाजे १० टक्के आहे. **श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर** यांच्या नावे काढलेली डिमांड ड्राफ्टसह दिनांक ०२/०२/२०२६ - दुपारी ३:०० वाजेपर्यंत सादर करावी.
५) यशस्वी प्रस्तावकाच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या बँकेच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
६) यशस्वी प्रस्तावकाने विक्रीच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रक्कमेसह) विक्रीचा व्यवहार त्याचाशी झाल्यानंतर त्वरित आणि उर्वरित रक्कम १५ दिवसाच्या आत जमा करावयाची आहे. जर प्रस्तावकाने नमूद केल्यानुसार विक्रीची रक्कम जमा केली नाही तर त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त होईल.
७) व्यवहारासाठी लागणारा अन्य खर्च, स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी, इतर खर्च यशस्वी प्रस्तावकाने भरावयाचा आहे.
८) प्राधिकृत अधिकार्याने कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार राखून ठेवला आहे.
९) अधिक तपशीलासाठी मोबाईल क्र. ७०२०८३३०६० व कोणत्याही कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

**दिनांक : ३०/१२/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

### नळदुर्ग नगर परिषद कार्यालय

**जा.क्र./नपन/१७३४/यात्रा/२०२५-२०२६** **दिनांक : ३०/१२/२०२५**

**अल्प मुदतीचे जाहीर निविदा साल सन २०२५-२०२६**

सर्व पात्र उत्पादक / अधिकृत विक्रेत / अनुज्ञप्तीधारक यांचेकडून खालील तपशीलाप्रमाणे द्विलिफाफा पध्दतीने दुबार जरहीर निविदा मागविण्यात येत आहे.

सर्व व्यावसायिकांना कळविण्यात येते की, श्री क्षेत्र मैलारपूर खंडोबा यात्रा २०२५-२०२६ करिता खालीलप्रमाणे कामे करण्याकरिता परवानाधारक व्यावसायिकांकडून प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक व्यावसायिकांनी दिनांक ३१/१२/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत नगर परिषद कार्यालयात द्विलिफाफा पध्दतीने दुबार निविदा सादर करावे. निविदाबाबतचे सविस्तर जाहिर प्रसिध्दीकरणाचे अटी व शर्ती नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर डकविण्यात आलेले आहे. निविदाबाबतचे अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या यात्रा / भांडार विभागाशी संपर्क साधावा.

| अ. क्र. | साहित्याचा कामाचा तपशील | निविदा भरण्याची दिनांक व वेळ | निविदा उघडण्याची वेळ, दिनांक | टेंडर निविदा फॉम विक्री | टेंडरसोबत अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | तात्पुरते व्यवसाय परवाना फि व जागा भाडे वसुली (दुकाने) | ३१/१२/२०२५ सकाळी १०.०० ते ०२.०० पर्यंत | ३१/१२/२०२५ वेळ दुपारी ४.०० वाजता किंवा प्रशासकीय सोयीनुसार | ५००/- | १०,०००/- |
| २ | शोभेची दारु गोळा उडविणे व पुरवठा करणे | | | ३००/- | ५००/- |

**अटी व शर्ती :**

नियम व अटी नगर परिषद नळदुर्ग कार्यालय यात्रा / भांडार विभागात व नोटीस बोर्डावर डकविण्यात आली पाहण्यासाठी उपलब्ध असतील.

कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद नळदुर्ग यांनी राखून ठेवलेला आहे. नगर परिषद नळदुर्गतर्फे व करिता

**स्वाक्षरीत/-**
**भांडार / यात्रा विभागप्रमुख**
**नगर परिषद नळदुर्ग**

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद नळदुर्ग**

### ग्रामपंचायत वडशिंगे, तालुका माढा, जिल्हा सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत वडशिंगे तालुका माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष :- १५ वा वित्त आयोग**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत महिन्यांमध्ये | ठेकेदार | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वडशिंगे येथे गावांतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ३.०० लाख | | १००/- | ३ महिने | सु.बे.अ. | १५ वा वित्त आयोग |
| २ | मौजे वडशिंगे येथील जि.प. प्रा. शाळा स्मशानभूमी, दलित स्मशानभूमी, उंच पाणी टाकी यांना रंगरंगोटी व दुरुस्ती करणे | १,५०,०००/- | | १००/- | ३ महिने | सु.बे.अ | ग्रामनिधी |

**टीप -**
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि. ३१/१२/२०२५ सकाळी १०.०० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ०४/०१/२०२६ पर्यंत सकाळी सकाळी १०.०० ते ६.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय वडशिंगे
३) निविदा उघडण्याचा दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता
४) निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५) निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. वडशिंगे, ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रा.पं. वडशिंगे, ता. माढा, जि. सोलापूर**

### बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले व्यक्ती यांनी 13/10/2025 रोजी डिमांड नोटीस जारी केली ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, 23/12/2025 रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- धाराशिव** **कर्जदार -** **१. साई तीर्थ शुद्ध पाण्याचे भांडे आणि पुरवठादार** प्रोप्रा.: श्रीमती. अर्चना जीवन पवार (कर्जदार) रुईभर उस्मानाबाद ४१३५०१ **२. श्री. जीवन विठ्ठल पवार (जामीनदार)** रुईभर उस्मानाबाद ४१३५०१ **३. श्री. दत्तात्रय अरुण वाघमोडे (जामीनदार)** वडगाव, उच्च ऊर्जा सबस्टेशन, मेन रोड, उस्मानाबाद ४१३५०१ | सोलापूर औरंगाबाद महामार्ग, ता. धाराशिव येथील साई शारा इंटरनॅशनल स्कूल येथे असलेल्या वॉटर प्युरिफायर आणि वॉटर जारच्या प्लांट आणि मशिनरींचे हायपोथेकेशन. | **मागणी सूचना :** दि. १३/१०/२०२५. एकूण शिल्लक : रु. 33,86,418.33 /- + लागू न केलेले व्याज : रु. 71,501.67/- + एकूण: रु. 34,57,920.00 /- (रुपये चौतीस लाख सत्तावन हजार नऊशे वीस रुपये फक्त) **सांकेतिक ताबा तारीख:** २३/१२/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २३/१२/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

### बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले व्यक्ती यांनी 13/10/2025 रोजी डिमांड नोटीस जारी केली ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, 23/12/2025 रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - धाराशिव** **कर्जदार -** **१. श्री. बाळासाहेब सुधाकरराव शिंदे.** मु.पो. शिरूर अनंतपाळ, कळमगाव ता. लातूर, जि. लातूर. **२. सौ. सुषमा बाळासाहेब शिंदे** मु.पो. शिरूर अनंतपाळ, कळमगाव. ता. लातूर, जि. लातूर | श्री. बाळासाहेब सुधाकरराव शिंदे यांच्या नावे मालमत्ता गहाण. त्या सर्व जमिनीचे तुकडे कळमगाव घर क्रमांक २११/१, कळमगाव, ता. शिरूर अनंतपाळ आणि जिल्हा लातूर **चतु:सीमा खालीलप्रमाणे:** पूर्व:- शासकीय रस्ता पश्चिम:- सुधाकर विठ्ठलराव शिंदे यांचा भूखंड दक्षिण:- शासकीय रस्ता उत्तर:- भाऊसाहेब शिंदे यांचा भूखंड. | **मागणी सूचना :** दि. २८/०७/२०२५. एकूण शिल्लक : रु.**13,30,639 /-** + लागू न केलेले व्याज : रु.**66,382.00/-** + एकूण: रु. **13,97,021.00 /- (रुपये तेरा लाख सत्यानऊ हजार एकवीस रुपये फक्त)** **सांकेतिक ताबा तारीख:** २४/१२/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २४/१२/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# क्रीडा प्रशासनातील त्रुटी दूर करणार

## बिंद्रा समितीचा अहवाल क्रीडा मंत्र्यांना सादर

◆ **नवी दिल्ली, ३० डिसेंबर**

अभिनव बिंद्रा यांच्या अध्यक्षतेखालील क्रीडा मंत्रालयाने स्थापन केलेल्या कृती दलाने भारतातील क्रीडा प्रशासनातील त्रुटी अधोरेखित केल्या आहेत आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसह विशेष केडरला प्रशिक्षण देण्यासाठी एक स्वायत्त वैधानिक संस्था तयार करण्याची शिफारस केली आहे.

कृती दलाने आपला १७० पानांचा अहवाल क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांना सादर केला. त्यांनी मंगळवारी पत्रकारांना सांगितले की, भारताच्या क्रीडा परिसंस्थेला व्यावसायिक बनवण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून टास्क फोर्सच्या सर्व शिफारसी लागू केल्या जातील. २०३६ च्या ऑलिम्पिकपर्यंत भारताला टॉप टेन क्रीडा राष्ट्रांमध्ये स्थान देण्याच्या ध्येयाचा एक भाग म्हणून, क्रीडा मंत्रालयाने भारतीय क्रीडा प्राधिकरण, राष्ट्रीय क्रीडा महासंघ आणि राज्य संघटनांच्या विद्यमान प्रशासकीय रचनेचा आढावा घेण्यासाठी, कमतरता ओळखण्यासाठी आणि सुधारणांसाठी उपाययोजना सुचवण्यासाठी हे कृती दल स्थापन केले.



या कृती दलाने क्रीडा मंत्रालयाच्या अंतर्गत एक स्वायत्त संस्था, राष्ट्रीय क्रीडा शिक्षण आणि क्षमता बांधणी परिषद स्थापन करण्याची शिफारस केली, जी क्रीडा प्रशासन प्रशिक्षणाचे नियमन, मान्यता आणि प्रमाणन करण्यासाठी जबाबदार आहे. या वर्षी ऑगस्टमध्ये स्थापन झालेल्या नऊ सदस्यांच्या कृती दलामध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नेमबाज बिंद्रा, आदिल सुमारीवाला आणि टार्गेट ऑलिम्पिक पोडियम योजनेचे माजी सीईओ कमांडर राजेश राजगोपालन यांचा समावेश होता.

टास्क फोर्सने आपल्या अहवालात म्हटले आहे की, क्रीडा प्रशासकांसाठी व्यावसायिक केडरचा अभाव आहे आणि संस्थात्मक सातत्य कमकुवत आहे. शिवाय, प्रशिक्षणाच्या संधी संघटित आणि आधुनिक नाहीत, सतत व्यावसायिक विकासावर मर्यादित लक्ष केंद्रित केले आहे. निवृत्तीनंतर क्रीडा प्रशासनात प्रवेश करण्यासाठी खेळाडूंसाठी मार्ग मर्यादित आहेत, कारण बहुतेकांमध्ये आवश्यक कौशल्ये नसतात. शिवाय, क्रीडा प्रशासनात डिजिटल साधने आणि विश्लेषणाचा वापर देखील कमी आहे. टास्क फोर्सने आपल्या अहवालात, क्रीडा प्रशासकांची क्षमता बळकट करण्यासाठी नियोजन आणि सुधारणा साधन म्हणून पाच-टप्प्यांचा क्षमता परिपक्वता मॉडेल सादर करण्याची मागणी केली. याचा उद्देश भारतीय क्रीडा प्राधिकरण, राष्ट्रीय क्रीडा महासंघ आणि राज्य विभागांना कॅडर स्ट्रक्चर, अभ्यासक्रम स्वीकार, डिजिटल सक्षमीकरण आणि खेळाडू मार्गांमधील संस्थात्मक परिपक्वता मूल्यांकन करण्यास सक्षम करणे आहे. आम्ही खेळाडू, सरकारी अधिकारी, एसएआय अधिकारी, एनएसएफ प्रतिनिधी, राज्य संघटना, शिक्षणतज्ज्ञ आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमधील तज्ज्ञांशी सल्लामसलत केली, असे बिंद्रा अहवालात म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# पुढील महिन्यात अहमदाबादमध्ये राष्ट्रीय खेळाडू मंच

## आयओए करणार आयोजन

◆ **नवी दिल्ली, ३० डिसेंबर**

देशातील क्रीडा क्षेत्रात खेळाडू-नेतृत्वाखालील प्रशासन आणि जबाबदारी मजबूत करण्याच्या उद्देशाने भारतीय ऑलिम्पिक संघटना १० जानेवारी रोजी अहमदाबादमध्ये पहिल्या राष्ट्रीय खेळाडू मंचाचे आयोजन करणार आहे.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, हा मंच देशभरातील वर्तमान आणि माजी खेळाडू, खेळाडू प्रतिनिधी आणि प्रमुख भागधारकांना थेट आणि समाधान-केंद्रित सहभागासाठी एकत्र आणेल. हा मंच खेळाडूंचे हक्क आणि जबाबदाऱ्या, नैतिक आणि पारदर्शक प्रशासन, सुरक्षित खेळ आणि अखंडता, मानसिक आरोग्य आणि कल्याण, डोपिंग विरोधी शिक्षण, तक्रार निवारण आणि संरचित कारकीर्द संक्रमण मार्ग यासारख्या प्रमुख मुद्यांवर लक्ष केंद्रित करेल.

चर्चा खेळाडूंच्या अभिप्रायाचे कृतिशील सुधारणांमध्ये रूपांतर करण्याच्या उद्देशाने असेल. प्रसिद्धी पत्रकानुसार, खेळाडूंच्या मंचाने खेळाडू आयोगाची भूमिका मजबूत करणे आणि भारतीय खेळात खेळाडू-केंद्रित प्रशासनाच्या विकासात अर्थपूर्ण योगदान देणे अपेक्षित आहे.

आयओएने म्हटले आहे की, ॲथलिट्स फोरम केवळ सल्लामसलतीच्या पलीकडे जाऊन खेळाडूंनी त्यांच्या कारकीर्दीवर, कल्याणावर आणि भविष्यावर परिणाम करणाऱ्या धोरणनिर्मितीत सक्रिय आणि प्रभावी भूमिका बजावावी यासाठी दृढ वचनबद्धता दर्शवितो. ◂(वृत्तसंस्था)

### खेळाडू येणार एकत्र

आयओए अध्यक्ष पीटी उषा म्हणाल्या, भारतीय क्रीडा इतिहासात पहिल्यांदाच खेळाडूंना एका अद्वितीय राष्ट्रीय व्यासपीठाच्या माध्यमातून एकत्र आणले जात आहे, ज्यामुळे त्यांना प्रशासनावर थेट प्रभाव पाडता येतो. हे व्यासपीठ खेळाडूंच्या नेतृत्वाखालील सुधारणा, जबाबदारी आणि सहयोगी निर्णय घेण्याच्या दिशेने एक निर्णायक बदल दर्शविते. आयओएची वार्षिक सर्वसाधारण सभा ९ जानेवारी रोजी अहमदाबाद येथे होणार आहे. ■

# जखमी आर्चर टी-२० विश्वचषक इंग्लंड संघात

**लंडन** : ॲडिलेडमधील तिसऱ्या ॲशेस कसोटीत दुखापत झाली असली तरी, पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी इंग्लंडच्या १५ सदस्यीय संभाव्य संघात वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरचा मंगळवारी समावेश करण्यात आला. ॲडिलेड कसोटीदरम्यान आर्चरच्या डाव्या मांडीच्या स्नायूंना दुखापत झाली. त्यामुळे तो पुढील दोन कसोटी सामन्यांमधून बाहेर पडला. आणखी एक वेगवान गोलंदाज जोश टोंगेला हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखालील संघात समाविष्ट करण्यात आले आहे. तो अद्याप मर्यादित षटकांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळलेला नाही. तथापि, आर्चर २२ जानेवारीपासून श्रीलंकेविरुद्ध होणाऱ्या तीन एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांना मुकणार आहे. आर्चरला टी-२० विश्वचषकासाठी संभाव्य संघात समाविष्ट करण्यात आले आहे. ■

# पूर्ण वेतन न मिळाल्यास प्रो लीगवर बहिष्कार

## पाकिस्तानी हॉकी खेळाडूंची धमकी

◆ **लाहोर, ३० डिसेंबर**

पूर्ण वेतन मिळाले नसल्याने पाकिस्तान हॉकी संघातील काही वरिष्ठ खेळाडूंनी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या पुरुषांच्या एफआयएच प्रो लीगच्या दुसऱ्या टप्प्यावर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली आहे.

या खेळाडूंनी आरोप केला आहे की त्यांना या महिन्याच्या सुरुवातीला खेळल्या गेलेल्या सामन्यांसाठी त्यांचा पूर्ण दैनिक भत्ता देण्यात आला नाही.

राष्ट्रीय पुरुष संघातील किमान दोन सदस्यांनी पुष्टी केली की पाकिस्तान हॉकी फेडरेशन (पीएचएफ) ला स्पष्ट संदेश देण्यात आला आहे की जर आर्थिक समस्या सोडवल्या गेल्या नाहीत तर अनेक खेळाडू एफआयएच प्रो लीगसाठी उपलब्ध राहणार नाहीत. या महिन्याच्या सुरुवातीला अर्जेंटिनामध्ये झालेल्या प्रो लीग स्पर्धेदरम्यान आम्हाला ३०,००० रुपये दैनिक भत्ता देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते, असे एका खेळाडूने सांगितले. गेल्या आठवड्यात, आमच्या खात्यात दैनिक भत्ता जमा करण्यात आला होता, परंतु केवळ ११,००० रुपये जमा करण्यात आले. ही पूर्णपणे फसवणूक आहे.

जर तुम्ही विनिमय दरांकडे पाहिले तर ३०,००० रुपये म्हणजे अंदाजे ११० डॉलर्स, तर ११,००० रुपये म्हणजे फक्त ४० डॉलर्स, हा खूप मोठा फरक आहे, असे तो म्हणाला.पाकिस्तानने या महिन्याच्या सुरुवातीला अर्जेंटिनामध्ये झालेल्या एफआयएच प्रो लीगमध्ये चार सामने खेळले होते आणि सर्व सामने गमावले. पाकिस्तान संघ आता फेब्रुवारीमध्ये ऑस्ट्रेलियामध्ये चार सामने खेळेल. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### शेफाली, रेणुका आघाडीवर, दीप्ती पहिल्या स्थानी

**दुबई** : भारताची सलामीवीर फलंदाज शेफाली वर्मा आयसीसी महिला टी-२० खेळाडू क्रमवारीत सहाव्या स्थानावर पोहोचली आहे. तिने श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ३४ चेंडूत नाबाद ६९, तिसऱ्या सामन्यात ४२ चेंडूत ७९ आणि चौथ्या सामन्यात ४६ चेंडूत ७९ धावा केल्या. चौथ्या टी-२० सामन्यात ८० धावा करणारी उपकर्णधार स्मृती मंधाना तिसऱ्या स्थानावर कायम आहे, तर जेमिमा रॉड्रिग्ज एका स्थानाने घसरून दहाव्या स्थानावर आली आहे. अनुभवी अष्टपैलू दीप्ती शर्मा गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे, तर रेणुका सिंग ठाकूर पहिल्या दहामध्ये पोहोचली आहे. तिसऱ्या सामन्यात चार गडी बाद करणारी रेणुका आठ स्थानांनी वर चढून संयुक्त सहाव्या स्थानावर पोहोचली आहे. भारताची डावखुरी फिरकी गोलंदाज श्रीचरणी १७ स्थानांनी पुढे सरकून ५२ व्या स्थानावर पोहोचली आहे आणि वैष्णवी शर्मा ३९० स्थानांनी पुढे सरकून १२४ व्या स्थानावर पोहोचली आहे. श्रीलंकेसाठी आक्रमक सलामीवीर हसिनी परेरा ११४ स्थानांनी पुढे सरकून ७१ व्या स्थानावर पोहोचली आहे. ■



### एलिस पेरी, सदरलॅण्डची आगामी हंगामातून माघार

**नवी दिल्ली** : महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)चा आगामी हंगाम अगदी जवळ आला आहे, परंतु रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्सना आधीच धक्का बसला आहे. आरसीबीची अष्टपैलू एलिस पेरी आणि दिल्ली कॅपिटल्सची ॲनाबेल सदरलॅण्ड यांनी वैयक्तिक कारणांमुळे स्पर्धेतून माघार घेतली आहे. डब्ल्यूपीएलचा चौथा हंगाम ९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी दरम्यान नवी मुंबई आणि वडोदरा येथे दोन टप्प्यांत होणार आहे. भारतीय अष्टपैलू सायली सातघरे ऑस्ट्रेलियन पेरीची जागा घेईल, तर दिल्ली कॅपिटल्सने तिच्याच देशाची अष्टपैलू सदरलॅण्डच्या जागी ऑस्ट्रेलियन लेग-स्पिनर अलाना किंगची निवड केली आहे. सातघरेला ३० लाखांच्या बेस प्राईसवर आरसीबीमध्ये सामील केले आहे. दिल्ली कॅपिटल्सने सदरलॅण्डच्या जागी अलाना किंगला संघात समाविष्ट केले आहे. ऑस्ट्रेलियन लेग-स्पिनरने गेल्या हंगामात यूपी वॉरियर्सचे प्रतिनिधित्व केले होते आणि २७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २७ गडी बाद केले होते.

### बीपीएल सामने होणार आज

**ढाका** : माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या निधनानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) मंगळवारी होणारे बांगलादेश प्रीमियर लीग (बीपीएल)चे सामने पुढे ढकलले आहेत. दोन्ही सामने आता बुधवारी खेळवले जातील. बीपीएल सामने पुढे ढकलण्याचा निर्णय सिल्हेट आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सिल्हेट टायटन्स आणि चितगाव रॉयल्स यांच्यातील पहिल्या सामन्याच्या टॉसच्या दोन तास आधी घेण्यात आला. खालिदा झिया १९९१-१९९६ आणि २००१-२००६ या दरम्यान पंतप्रधान होत्या. त्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) च्या अध्यक्षा होत्या.

### मेहता प्रशालेच्या ध्रुव रोटे याची राष्ट्रीय व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**



सिरमोर (हिमाचल प्रदेश) येथे ४ ते ९ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या १४ वर्षाखालील शालेय राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी वि. मो. मेहता प्रशालेच्या ध्रुव गोपाल रोटे याची महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघात निवड झाली आहे. त्याच्या निवडीबद्दल संस्थेचे शालेय समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. ध्रुव याला क्रीडा शिक्षक बाळकृष्ण पाटील, मार्गदर्शक प्रशांत बिराजदार, विद्यार्थी अभिषेक राठोड यांचे मार्गदर्शन लाभले.

### करकंबच्या लोखंडे, सलगर यांची सायकलिंग स्पर्धेत कामगिरी

**करकंब, दि. ३० डिसेंबर-**

चेतना विकास मंडळ संचलित न्यू. इंग्लिश स्कूल करकंबची आकांक्षा औदुंबर लोखंडे राज्य सायकलिंग स्पर्धेसाठी निवड झाली. औरंगाबाद येथे झालेल्या विभागीय सायकलिंग स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक मिळवल्याने तिची निवड झाली. तसेच प्रज्ञा विठ्ठल सलगर हिने चतुर्थ क्रमांक मिळवला. या दोघींना मार्गदर्शक क्रीडा शिक्षक अविनाश देवकते व अशोक खपाले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे,सचिव अविनाश देवकते,स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापुरकर, मुख्याध्यापक श्रीकांत लऊळकर आदींनी अभिनंदन केले.

# कबड्डी स्पर्धेत जिल्हा परिषद नजिक चिंचोळीस विजेतेपद



**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

जिल्हा शालेय कबड्डी स्पर्धेत जि. प. मराठी शाळा नजिके चिंचोळीने विजेतेपद पटकाविले. मंगळवेढा येथे झालेल्या या स्पर्धेत लहान गट मुलीच्या संघाने ही कामगिरी केली. संघास शिक्षक अभिमन्यू पवार, अमसिद्ध पुजारी, एस. पी. कोळी, शशिकांत मोरे, सुवर्णा बोरगांवकर, अश्विनी कोथळीकर यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या संघाचे मुख्याध्यापक निजगुण बनगोंडे, अध्यक्ष राघवेंद्र बिराजदार, केंद्रप्रमुख काशिनाथ विजापुरे, विस्ताराधिकारी लक्ष्मण पुजारी, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी अभिनंदन केले.




# लोकमंगल परिवारास विजेतेपद; स्वप्नील धाईंजे सामनावीर व मालिकावीर

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सुधान प्रिमीयर लीग सिझन दोन राज्य क्रिकेट स्पर्धेत लोकमंगल परिवार संघाने एकही सामना न हरता संपूर्ण स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व राखत विजेतेपद पटकावले.

ही स्पर्धा कोपरगाव येथील समता इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सेमीफायनलमध्ये केबीपी संघाविरुद्ध लोकमंगल परिवार संघाने ६९ धावांचे लक्ष्य उभे करून १८ धावांनी महत्त्वपूर्ण विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली. अंतिम सामन्यात समता टीचिंग स्कॉड संघाविरुद्ध लोकमंगल परिवार संघाने केवळ ५.२ ओव्हरमध्ये ९७ धावा करत १० गडी राखून सामना जिंकला.

या संपूर्ण स्पर्धेतील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे स्वप्नील धाईंजे यांनी सलग पाच सामन्यांत 'मॅन ऑफ द मॅच' व मालिकावीर पुरस्कार पटकाविला. सामनावीर पुरस्कार संभाजी कोकाटे याने मिळविला.संघाचे लोकमंगल समूहाचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख यांनी कौतुक केले.

**विजेता संघ** : स्वप्नील धाईंजे, जितेश पवार, अनिकेत गायकवाड, व्यंकटेश कुलकर्णी, आकाश पवार, अक्षय पत्की, सुभाष सिडगिद्दी, संजय चव्हाण, सागर शिंदे, संभाजी कोकाटे, शुभम पिसाळ, नवनाथ गोसावी, अजित कुरे व स्वप्नील कुंकारी.




# राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलची १२ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

विरार (पालघर) येथे झालेल्या ११वी राष्ट्रीय योंगमोडो (कोरियन मार्शल आर्ट) स्पर्धेत येथील रुद्रशक्ती गुरुकुलने ३ सुवर्ण, ६ रौप्य व ३ कास्य अशी १२ पदकांची कमाई केली.

त्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे योंगमुडो महाराष्ट्राचे सचिव नागेश शेट्टीकर, इंडियाचे अध्यक्ष मास्टर रोहित नारकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी: १७ वर्षे: सुवर्ण-** योगिता सरवदे. १९ वर्षाखालील : सुवर्ण- ममता अलशेट्टी, पूजा शेट्टीकर. **१४ वर्षे : रौप्य-** वैभव माडे, अथर्व स्वामी, गौरी माळी, अदिती नह्ला, मानत्य रोहिटे, दुर्वा रोहिटे. **कांस्य-** स्वरा धोत्रे, जानवी म्हेत्रे, स्वप्नाली जामदार.

# स्वकुळ हिटर्स संघास विजेतेपद

## स्वकुळ साळी प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**



स्वकुळ साळी प्रिमियर लीग सिझन२ क्रिकेट स्पर्धेत स्वकुळ हिटर्स संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले. स्वकुळ वीर बॉईज संघ उपविजेता ठरला. स्वकुळ स्ट्रायकर्स संघाने तृतीय क्रमांक मिळवला.

श्री जिव्हेश्वर युवक-युवती मंडळ आयोजित व टायटल स्पॉन्सर श्री शैलेश एकबोटे यांच्या सहकार्याने ऋतुराज टर्फ, आकाशवाणी केंद्राजवळ ही स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ टायटल स्पॉन्सर शैलेशजी एकबोटे, संजय गणेश (धाराशिव), स्वकुळ साळी विणकर समाज ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष परमेश्वर गदगे, विद्यार्थी विकास मंचचे चंद्रशेखर टोणपे तसेच मंडळाचे अध्यक्ष उमेश गायकवाड यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृत ढगे यांनी केले. मंडळाचे सचिव निशांत पोरे यांनी आभार मानले.

**स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांचे मानकरी**

फलंदाज : प्रणव वांझरे, गोलंदाज : नितीन वांझरे, मालिकावीर : आदित्य एकबोटे

# महाराष्ट्राचे कुमार खो-खो संघ सुवर्णपदक कायम राखतील

## शिबिर समारोपप्रसंगी विद्यापीठ खोखोपटू अशोक मुळीक यांचा विश्वास

**सोलापूर, दि. ३० डिसेंबर -**

महाराष्ट्राचे कुमार व मुली खो-खो संघ नक्कीच सुवर्णपदक कायम राखतील, असा विश्वास माजी विद्यापीठ खोखो खेळाडू अशोक मुळीक यांनी व्यक्त केला

महाराष्ट्राच्या कुमार खो-खो संघाच्या प्रशिक्षण शिबिराचा समारोप जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर झाला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य अंबादास पांढरे, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशचे सचिव उमाकांत गायकवाड, विद्यापीठ सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, प्रशिक्षक मोहन रजपूत आदी उपस्थित होते. संघातील या खेळाडूंना श्री. मुळीक यांच्यातर्फे बॅग व रुक्माई स्पोर्ट्स क्लबचे प्रशिक्षक रवींद्र चव्हाण यांच्यातर्फे नॅपकिन देण्यात आले. क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण कोळी यांनी सूत्रसंचालन केले.



▶ प्रशिक्षक मोहन रजपूत यांचा सत्कार करताना प्राचार्य अंबादास पांढरे व माजी विद्यापीठ खेळाडू अशोक मुळीक.




▶ राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना होताना कुमार व मुली संघाचे रेल्वे स्टेशनवर टिपलेले छायाचित्र.

मुली संघाचे शिबिर धाराशिव येथे झाले असून दोन्ही संघ ३१ डिसेंबर, २०२५ ते ४ जानेवारी, २०२६ या कालावधीत बंगळुरू, कर्नाटक येथे होणाऱ्या ४४व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रेल्वेने रवाना झाले. रेल्वे स्टेशनवर महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव, माजी सरचिटणीस संदीप तावडे, कार्यालयीन सचिव डॉ. प्रशांत इनामदार, महेंद्र गाढवे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, खोखो असोसिएशनचे खजिनदार श्रीरंग बनसोडे आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्राचे संघ : कुमार गट :** राज जाधव-कर्णधार, जितेंद्र वसावे, हाराद्या वसावे, सोत्या वळवी,विशाल वसावे (धाराशिव), शंभूराजे चंदनशिव, अरमान शेख,सिद्धार्थ माने- देशमुख (सोलापूर), श्री दळवी, पार्थ देवकाते (सांगली), श्री वसावे, आदेश पाटील (पुणे), तरबेज खान (सातारा),आशिष गौतम (ठाणे), ओमकार चव्हाण (अहिल्यानगर). प्रशिक्षक : मोहन रजपूत (सोलापूर), सहा. प्रशिक्षक : सुजित माळी (लातूर), व्यवस्थापक : गणेश वारुळे (अहिल्यानगर).

**मुली गट** : सानिका चाफे-कर्णधार, श्रावणी तामखडे, विद्या तामखडे, सानिया सुतार(सांगली), धनश्री कंक, प्रणिती जगदाळे, दिक्षा काटेकर, श्रुती चोरमारे(ठाणे), मैथिली पवार, राही पाटील (धाराशिव), स्नेहा लामकाणे, प्राजक्ता बनसोडे (सोलापूर), निलम मोहंडकर (नाशिक), श्वेता नवले (पुणे),दिव्या पायले (रत्नागिरी). प्रशिक्षक : अभिजित पाटील (धाराशिव), सहा. प्रशिक्षक : ऐश्वर्या सावंत (रत्नागिरी), व्यवस्थापिका : उज्वला चेमटे (अहिल्यानगर).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### आळजापूर शाळेच्या माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी मच्छिंद्र रोडे

**जेऊर, दि.३० डिसेंबर-**
माजी विद्यार्थी शाळेबद्दल ऋण व्यक्त करत असताना शाळेच्या विकासात महत्त्वाचा हातभार लावत असतात या माजी विद्यार्थ्यांच्या सहयोगातून शाळेच्या गुणवत्ता विकासास अधिक चांगल्या प्रकारे चालना मिळू शकते तसेच माजी विद्यार्थी शाळा विकासासाठी मोलाचे योगदान देत असतात याच उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आळजापूर (ता. करमाळा) या शाळेत माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली या संघाच्या अध्यक्षपदी मच्छिंद्र रोडे यांची तर उपाध्यक्षपदी शरद रोडे साहेब यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच सचिन रोडे, सोमनाथ शेवाळे, विनोद नवले, प्रदीप भालेराव, अनुसया मोटे, ज्ञानदेव कुंभार, दत्तात्रय टेंबाळ, सुग्रीव भंडारे, रूपाली आखाडे, दादासाहेब वाकळे, प्रभाकर काळे, युवराज रोडे, सोमनाथ केवारे, दादासाहेब रोडे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या निवडीच्या वेळी माजी सरपंच युवराज गपाट शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत घोडके, पोलीस पाटील विश्वंभर रोडे, उपाध्यक्ष समाधान रणसिंग, दादासाहेब केवारे, लक्ष्मण रोडे, दिनेश रोडे, फुलचंद गपाट, सुरेश गपाट, अरुण रोडे, अशोक रोडे, आत्माराम मोरे, संदीप गपाट उपस्थित होते. यावेळी शाळा विकासासाठी मच्छिंद्र रोडे, शरद रोडे, सुरेश गपाट, विनोद नवले, दत्तात्रय टेंबाळे यांनी देणगी स्वरूपात मदत केली.

### बीबी दारफळ मतदारसंघात भाजपाचे इंद्रजीत पवारांचा संवाद

**सोलापूर, दि.३० डिसेंबर-**



बीबी दारफळ मतदार संघात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे इंद्रजित पवार यांनी प्रचार दौरा सुरु केला आहे. नागरिकांचा प्रतिसाद देत त्यांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवकांशी इंद्रजित पवार यांनी थेट संवाद साधत त्यांच्या दैनंदिन अडचणी, मूलभूत सुविधा, स्थानिक प्रश्न तसेच भविष्यातील विकासाबाबतच्या अपेक्षा समजून घेतल्या. संपूर्ण मतदार संघातील समस्या तात्पुरत्या नाही तर कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र नियोजन व प्रभावी पाठपुरावा करण्याचा आणि विकासाच्या बाबतीत हा भाग मागे राहणार नाही याचा निर्धार पवार यांनी व्यक्त केला.

### आमदार विजयकुमार देशमुख यांना मातृशोक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**



ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेचे प्रमुख मानकरी तथा आमदार विजयकुमार देशमुख यांच्या मातोश्री लीलावती सिद्रामप्पा देशमुख यांचे मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा दुपारी ४ वाजता काळजापूर मारुती येथील त्यांच्या निवासस्थानापासून निघाली. देगाव रोडवरील बायपास जवळ असलेल्या देशमुख मळा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंतयात्रेवेळी विविध स्तरातील मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे. माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या त्या आजी होत.

## निधन वृत्त...

### वसंतराव शिंदे

**अक्कलकोट, दि. ३० डिसेंबर-**



मराठा समाजातील जेष्ठ, स्वामी भक्त वसंतराव कोंडीबा शिंदे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. विविध सामाजिक-धार्मिक संघटनेच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हिंदू स्मशानभूमी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते उद्योगपती तथा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे आजीव सदस्य नितीन शिंदे यांचे वडील होत.

### निर्मला पतंगा

**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**



सुभाषनगर भागातील रहिवासी निर्मला दत्तात्रय पतंगे यांचे सोमवारी सकाळी निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्या ६७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### जगदेवी ढोले

**सांगोला, दि. ३० डिसेंबर -**



सांगोला शहरातील जगदेवी सोमनाथ ढोले (वय-८१) यांचे सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त मुख्याधापक सोमनाथ ढोले यांच्या त्या पत्नी होत्या.

# 'भालेवाडी'त कृषी व ग्रामीण पर्यटन शेतकरी समिती स्थापन

### सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**
कृषी व ग्रामीण पर्यटनाला नवसंजीवनी देण्याच्या दिशेने सोलापूर जिल्हा प्रशासनाने विकासाच्या दिशेने ठोस पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्पात कृषी पर्यटन, कृषी मॉल (Agri Mall), रेशीम शेती, धार्मिक पर्यटन, जल पर्यटन आणि विनयार्ड पर्यटन हे प्रमुख घटक समाविष्ट आहेत. याच प्रकल्पाचा एक भाग म्हणून भालेवाडी (ता. मंगळवेढा) येथे राज्यातील पहिली कृषी व ग्रामीण पर्यटन शेतकरी समिती आत्मा अंतर्गत अधिकृतरीत्या नोंदणी करण्यात आली.

भालेवाडी हे गाव दुध उत्पादन आणि तृणधान्य शेतीसाठी प्रसिद्ध गाव असून Milk Millet Village म्हणून वाटचाल करीत आहे. या दुध आणि तृणधान्य उत्पादनाचा आधार घेत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे, शेतकऱ्यांसाठी पूरक उत्पन्नाची निर्मिती करणे, पर्यटनाच्या नव्या संधी उपलब्ध करणे हा समिती स्थापनेमागील प्रमुख हेतू आहे. उपक्रमात स्थानिक शेतकरी, ग्राम स्थ, महिला बचत गट आणि युवकांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दुध व प्रक्रिया उद्योग, तृणधान्य उत्पादन व मिलेट-आधारित खाद्य अनुभव, हुरडा पार्टी, पारंपरिक व नैसर्गिक शेती पद्धती, ज्वारी पट्ट्याची वैशिष्ट्ये, ग्रामीण पाककृती, स्थानिक उत्पादन विक्री केंद्र या सर्वांच्या माध्यमातून भालेवाडी गाव राज्यातील आदर्श पर्यटन गाव म्हणून उदयास येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पुढील काळात कृषी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी पायाभूत सुविधांची उभारणी, प्रशिक्षित गाईड, स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था, डिजिटल प्रचार-प्रसार व ब्रँडिंग या उपक्रमामुळे भालेवाडी गाव सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण पर्यटन नकाशावर एक महत्त्वाचे केंद्र बनेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

> भालेवाडी ग्रामस्थांनी ग्रामीण पर्यटन विकासाच्या क्षेत्रात एक नवी ओळख निर्माण केली आहे. हा उपक्रम सोलापूर जिल्ह्यासाठी दिशादर्शक ठरेल. यामुळे केवळ स्थानिक रोजगाराच्या संधीच वाढणार नाहीत, तर गावाच्या अर्थव्यवस्थेलाही मोठी गती मिळेल. लवकरच भालेवाडी हे एक 'आदर्श पर्यटन गाव' म्हणून नावारूपास येईल.
> **संतोषकुमार देशमुख** उपजिल्हाधिकारी (महसूल)

# चक्क पोलीस हवालदाराकडून काढून घेतले साडे आठ लाख रुपये

### मंगळवेढ्यातील सायबर क्राईम



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० डिसेंबर-**
येथे आरटीओ ई चलनच्या नावावर एका पोलीस हवालदाराच्या बँक खात्यातून ८ लाख ४९ हजार रुपये काढून घेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात हॅकरविरुद्ध पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेमुळे मंगळवेढ्यात मोठी खळबळ उडाली आहे.

फिर्यादी नागेश निंबाळकर हे गेल्या दोन वर्षापासून मंगळवेढा पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार पदावर नोकरी करत असून त्यांच्या कुटुंबियाची उपजिवीका त्यावर चालते. वडिलाच्या शेती उत्पन्नातून येणारे पैसे हे फिर्यादीच्या स्टेट बँक ऑफ इंडिया सांगोला येथील सेव्हींग खात्यावर असतात. २२ डिसेंबर रोजी फिर्यादी हे मंगळवेढ्यात असताना व्हॉटसअपवर फिर्यादीच्या ओळखीचे विक्रांत भोसले (रा. धायटी) यांच्या व्हॉटसअपवर एक आरटीओ ईचलन ॲपवर पीडीएफ फाईल आली होती. फिर्यादीने आरटीओची चलन पावती आहे, असे समजून ती ओपन केली असता समोर माहिती भरण्यासाठी इंग्रजीमध्ये नेक्स्ट असे आले. त्यावेळी फिर्यादीने नेक्स्ट..नेक्स्ट असे करत गेले असता शेवटी पे यूपीआय ५० रुपये चार्ज आल्याने फिर्यादी हे बाहेर पडले. त्यानंतर एस.एम. एस. आले नाहीत. २३ डिसेंबर रोजी सकाळी ८.४१ वाजता फिर्यादीने मोबाईल चेक केला असता त्यावर मोबाईल रजीस्ट्रेशन एसबीआय अकाऊंट असा मेसेज आला, तद्नंतर काँग्रेच्युलेशन सक्सेसफुली असा मेसेज आला. व ओटीपी नंबरही आला. त्यानंतर ११.३० वाजता खात्यामधून पैसे कट झाल्याचे निदर्शनास आले. फिर्यादीने तात्काळ सायबर हेल्पलाईनवर कॉल करुन त्यांना माहिती दिली. अधिक तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे हे करीत आहेत. दरम्यान सायबर चोरट्यांनी चक्क पोलीस खात्यात काम करणाऱ्या पोलीस हवालदारालाच आर्थिक टोपी घातल्याने सर्वसामान्य नागरिकांचे काय? असा सवाल या घटनेनंतर केला जात आहे.

# बार्शी पोलीस ठाण्यातील बेवारस मोटारसायकलचा लिलाव

### वाहन मालकाने १५ दिवसांत हक्क शाबीत करावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० डिसेंबर-**
बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या आवारात गेल्या काही काळापासून पडून असलेल्या २९ बेवारस मोटरसायकलचा शासकीय नियम नुसार जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. याबाबत पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी उद्घोषणापत्र जारी केले असून, संबंधित वाहन मालकांना १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह दावा सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बार्शी शहर पोलीस ठाण्यात सध्या २९ मोटरसायकल बेवारस स्वरूपात आहेत. या वाहनांच्या मालकीबाबत चौकशी केली असता कोणतीही माहिती मिळाली नाही. त्यामुळे आरटीओ सोलापूरकडून या वाहनांचे मूल्यांकन (व्हॅल्युएशन) करुन घेण्यात आले आहे.

तसेच, तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी बार्शी यांच्या दि. २९ डिसेंबर २०२५ च्या संदर्भ क्रमांक जबाबी/कावि/५/२०२५ नुसार उद्घोषणापत्र जारी करण्यात आले आहे. वाहन मालकांनी आवश्यक कागदपत्रे (आरसी बुक, विमा, इ.) घेऊन १५ दिवसांच्या आत बार्शी शहर पोलीस ठाण्यात हजर राहून अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दावा न झाल्यास ही सर्व वाहने शासकीय नियम नुसार जाहीर लिलावात विकली जाणार असून, त्यातून मिळणारी रक्कम शासन जमा करण्यात येईल. बेवारस वाहनांची यादी पोलीस ठाण्याच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे. वाहन मालकांनी तातडीने तपासणी करावी. अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

बार्शी शहर पोलीस ठाणे: ०२१८४-२२३०३३ पोहेकॉ /२२८ कदम: मोबाईल क्रमांक ८६६९५०२२९६ पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी सांगितले की, ही कारवाई पोलीस ठाण्याच्या आवारात जागा मोकळी करण्यासाठी आणि बेवारस वाहने मालकांना परत मिळण्याची शक्यता वाढवण्यासाठी केली जात आहे. नागरिकांनी या उद्घोषणेची दखल घ्यावी.

# दत्तकला स्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.३० डिसेंबर-**



दत्तकला इंटरनॅशनल स्कूलमध्ये रामायण संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले.

उपस्थित प्रेक्षकांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच वातावरण भक्तिमय झाले होते. विद्यार्थ्यांनी रामायणातील विविध प्रसंगांचे सादरीकरण नाट्य, संवाद, संगीत व भावपूर्ण अभिनयाच्या माध्यमातून केले.

प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण, हनुमान व रावण यांची भूमिका साकारताना विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अभिनय कौशल्य दाखवले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, संस्थेच्या सचिव माया झोळ, संस्थेच्या पदाधिकारी सारिका झोळ, जयमाला बांदल, धनंजय अडसूळ, लालासाहेब जगताप, कौशल्यादेवी जगताप, प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर, शाळेच्या संचालिका नंदा ताटे व शाळेच्या प्राचार्या सिंधू यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सचिव माया झोळ व अन्य मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेच्या संचालिका नंदा ताटे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्या, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# इंगळे यांच्या विजयाने स्विमिंग ग्रुपचा अभिमान वाढला : किरनळ्ळी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० डिसेंबर-**
नगरपरिषद निवडणूकीत सलग पाचव्या टर्मच्ये निवडून आलेले भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक तथा श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या विजयाने स्विमींग ग्रुपचा अभिमान वाढला असल्याचे मनोगत येथील स्विमींग ग्रुपचे सदस्य तथा एच.पी.पेट्रोल पंपाचे मालक सचिन किरनळ्ळी यांनी व्यक्त केले.

नगरसेवक महेश मालक इंगळे यांच्या विजयाचे औचित्य साधून स्विमींग ग्रुप्च्या वतीने नगरसेवक महेश इंगळे व वाढदिवसानिमित्त सचिन किरनळ्ळी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सचिन किरनळ्ळी बोलत होते. यावेळी ग्रुपचे सदस्य प्रथमेश इंगळे, सचिन किरनळ्ळी, संतोष पराणे, बाबा सुरवसे, बाळासाहेब एकबोटे, सुनील पवार, मेजर अमोल माने, अंकुश केत, रमेश कणबुसे, राजू एकबोटे, सुरेश पाटील, दर्शन घाटगे, अरविंद पाटील, तन्मय इचगे, विद्याधर गुरव, रमेश शिंदे, महादेव आडवीतोटे, मल्लिनाथ माळी, संतोष जवळगे, रफिक पठाण, श्रीकांत झिपरे, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, मधुकर सदाफुले, ज्ञानेश्वर भोसले उपस्थित होते.

# इंजि. यासिन पठाण याच्या त्रासाला कंटाळून युवकाची आत्महत्या

### गुन्हा दाखल, आरोपी फरार

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३० डिसेंबर-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील इंजिनियर यासिन जमीर पठाण याच्या अमानुष व मानसिक छळाला कंटाळून एका युवकाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.


मृत युवकाचे नाव तोसिफ हुसेन शेख (वय ३७, रा. पिलीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तोसिफ शेख यांना पिलीव येथील इंजिनियर यासीन जमीर पठाण, तसेच सुरज लोखंडे व जुबेर या तिघांकडून सेंट्रींगच्या कामासंदर्भात वारंवार मानसिक त्रास व मारहाण करण्यात येत होती. सततच्या अपमान, धमक्या व अन्यायाला कंटाळून दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५:०० सुमारास तोसिफ शेख यांनी विषारी औषध प्राशन केले. त्यानंतर त्यांना तातडीने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान २१ डिसेंबर २०२५ रोजी त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मयत तोसिफ शेख यांचे बंधू अल्ताफ शेख यांनी पिलीव पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. पिलीव पोलिसांनी सदर प्रकरणी गंभीर दखल घेत इंजि. यासीन पठाण, सुरज लोखंडे व जुबेर यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता १०८(आत्महत्येस प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मात्र सदर तिन्ही आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या घटनेने परिसरात संतापाची लाट उसळली असून दोषींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून होत आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस.डी. जानकर हे करीत आहेत.

### शंकरलिंग महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला

**वळसंग, दि. ३० डिसेंबर-**
वळसंग येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेमध्ये फेब्रुवारी- मार्च २०२६ मध्ये प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता बारावी विद्यार्थ्यांकरिता व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्राचार्य विरेश थळंगे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन करून बोर्डाच्या परीक्षेकरिता शुभेच्छा दिले. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प लोकसेवा कनिष्ठ महाविद्यालय, मंद्रूपचे प्रा. नरेश पवार यांनी समाजशास्त्र विषयाचे मार्गदर्शन केले. दुसरे पुष्प देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळचे प्रा. शामराव बिराजदार यांनी इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन केले. तिसरे पुष्प रोजी मातोश्री गंगुबाई केकडे ज्युनिअर कॉलेज, सोलापूरचे प्रा. जीवन यादव यांनी भूगोल विषयाचे मार्गदर्शन केले.चौथे पुष्प हरीभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूरचे प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी हिंदी विषयाचे मार्गदर्शन केले. पाचवे पुष्प सी. बी.खेडगीज्, अक्कलकोटचे प्राध्यापिका कोन्हाळी यांनी इतिहास विषयाचे मार्गदर्शन केले. सहावे पुष्प डी.बी.एफ. दयानंद कॉलेज, सोलापूरचे प्रा. राज पवार यांनी मराठी विषयाचे मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानमाला यशस्वी करण्याकरिता प्रशालेचे पर्यवेक्षक शिवानंद घोडके, प्रा. संतोष शिंदे, प्रा. शरण्या मसुती व प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# 'तेरणेचा कर्मयोगी' माहितीपट व गौरवकांचा प्रकाशन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ३० डिसेंबर-**
येथील दयानंद सभागृहात कै. ॲड किशनराव सावरीकर यांच्या २५ व्या स्मृती दिनानिमित्त जीवनकार्याचा वेध घेणाऱ्या माहितीपट व 'तेरणेचा कर्मयोगी' गौरवकांचा उद्घाटन सोहळा, कार्यक्रमाचे अध्यक्ष सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाला.



याप्रसंगी बोलताना त्यांनी, सावरीकरांचे कार्यकर्तृत्व मोठे होते. राजकारण करण्यासाठी त्यांनी कार्य केले नाही तर काँग्रेसवर व विकासावर त्यांची निष्ठा होती. विकास हा त्यांच्या जीवन कार्याचा ध्यास होता. यासाठीच त्यांनी सावरी ते लातूर पर्यंत अनेक विकास कामे केली. असा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय माहितीपट आपल्या लातूर येथील लोकांनी बनवला याचे मला कौतुक वाटते. गौरवांक व माहितीपटामध्ये खूप मोठ्या माणसांनी सावरीकर साहेबांबद्दल प्रतिक्रिया दिल्या. ह्या गोष्टी नव्या पिढीला प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत अशा भावना व्यक्त केल्या. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना माजी कुलगुरू जनार्दन वाघमारे यांनी, सावरी सारख्या एका छोट्या गावातल्या व्यक्तीने अनेक विकास कामे केली. शिक्षण व गोरगरीब विद्यार्थ्यांबद्दल त्यांना तळमळ होती. शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूरचे ते विश्वस्त होते. त्यांनीच मला राजर्षी शाहू महाविद्यालयात प्राचार्य म्हणून बोलावले होते. जिल्ह्यातील व मराठवाड्यातील अनेक मंडळावर ते ज्येष्ठ पदाधिकारी होते. अनेकांना लाजवेल असे काम त्या काळात एका जि.प. सदस्याने करून दाखवले. ही गोष्ट खूप अभिमानाची होती. असे गौरव उद्गार काढले.

शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूरचे अध्यक्ष, गोपाळराव पाटील व जलसंपदा विभाग महाराष्ट्र राज्याचे माजी प्रधान सचिव व्यंकटराव गायकवाड, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी आपल्या मनोगतात त्यांचे व्यक्तिमत्व व विकास कामाचा आढावा घेतला.

माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूरचे सचिव अनिरुद्ध जाधव, गोदावरी खोरे विकास महामंडळ माजी संचालक दि.मा. मोरे, शिवछत्रपती शिक्षण संस्था उपाध्यक्ष पी. आर. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. स्व शिवाजीराव पाटील निलंगेकर, विलासराव देशमुख, शिवराज पाटील चाकूरकर, ॲड. मनोहर गोमारे, डॉ. प्रकाश शेरे अशा सामाजिक व विविध क्षेत्रातील दिवंगत मान्यवरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रस्ताविक माजी आयुक्त व महात्मा गांधी ग्राम विकास सेवा केंद्र सावरीचे उपाध्यक्ष, अजय सावरीकर यांनी केले.

किशोर गोरखे व माहितीपट आणि गौरवांकासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल सतीश हानेगावे यांचा सत्कार दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. आयोजकांच्या वतीने गौरवांकासाठी लेख लिहिलेल्या लेखकांचा सत्कार संजय सावरीकर यांच्या हस्ते करण्यात आला. आभार माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी मानले. सूत्रसंचालन सतीश हानेगावे यांनी केले.














## काँग्रेस प्रभागनिहाय उमेदवार

| | |
|---|---|
| प्रभाग ०१ | क) शुभांगी जावा |
| प्रभाग ०२ | क) सुरेखा पांढरे |
| प्रभाग ०३ | १) सिद्धाराम चाकोते<br>२) रोहित कारमपुरी<br>३) रमाबाई पांडगळे<br>४) महानंदा शिरसीकर |
| प्रभाग ०४ | अ) संघमित्रा चौधरी |
| प्रभाग ०८ | क) गोदावरी मोकाशी |
| प्रभाग ०९ | अ) दत्तू बंदपट्टे |
| प्रभाग १० | ब) प्रीती देवकते |
| प्रभाग ११ | क) कल्पना रव्वा<br>ड) धोंडप्पा तोरनगी |
| प्रभाग १२ | क) पूजा चव्हाण<br>ड) मौलाली इब्राहिम पटेल |
| प्रभाग १४ | १) बागवान खलिफा नसीम अहमद बशीर अहमद<br>२) शोएब महागामी<br>३) शहजादी बेगम म. सलीम बडेपीर<br>४) मणियार खुद्दुसिया एजाज |
| प्रभाग १५ | १) सपना म्यागेरी<br>२) कल्पना नरोटे<br>३) चेतन नरोटे<br>४) आरिफ शेख |
| प्रभाग १६ | अ) नरसिंह आसादे<br>ब) बिल्कीसबानू सलीम खान<br>क) सीमा मनोज यलगुलवार<br>ड) नरसिंग कोळी |
| प्रभाग १७ | अ) शुभांगी लिंगराज<br>ब) परशुराम सतारेवाले<br>ड) वाहिद बिजापूरे |
| प्रभाग १८ | ड) अयाज आळंद |
| प्रभाग १९ | अ) विजयालक्ष्मी काळपगार<br>ड) शिवशंकर अंजनाळकर |
| प्रभाग २० | अ) अनुराधा काटकर<br>ड) अझरोद्दीन शेख |
| प्रभाग २१ | अ) प्रतीक्षा निकाळजे<br>ब) रियाज हुंडेकरी<br>क) किरण टेकाळे |
| प्रभाग २२ | अ) संजय हेमगड्डी<br>ब) अर्चना जाधव<br>क) राजनंदा डोंगरे<br>ड) कुणाल गायकवाड |
| प्रभाग २३ | ब) दिपाली शहा |
| प्रभाग २४ | अ) शिवलिंग कांबळे बाटलीवाला<br>ड) राजू चव्हाण |
| प्रभाग २५ | अ) सरस्वती आठवले<br>ब) विजयकुमार हत्तूरे |
| प्रभाग २६ | ब) रविकुमार यलगुलवार<br>क) नितीन घुगे |

## 'माकपा'चे उमेदवार

| | |
|---|---|
| प्रभाग ९ | (ब) गीता अनिल वासम<br>(क) अरुणा नरसय्या आडम |
| प्रभाग १३ | (अ) सुषमा संतोष सरवदे<br>(ब) अनिता प्रवीण आडम<br>(क) श्रीनिवास कुरमय्या म्हेत्रे |

# 'उमेदवारी'च्या गोंधळात नाराजीनाट्य; राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख सुधीर खरटमल यांचा राजीनामा

### पक्षाकडून मनधरणी सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर आणखी एक मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. एकीकडे 'उमेदवारी'बाबत त्या त्या पक्षांमध्ये गोंधळ सुरु आहे. तर दुसरीकडे काही महिन्यांपूर्वीच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केलेले सुधीर खरटमल यांनी निवडणूक प्रमुख पदासह पक्षसदस्यत्वाचा राजीनामा दिला. दरम्यान राजीनामा मागे घेण्यासाठी पक्षाकडून खरटमल यांची मनधरणी सुरु आहे.



महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी अजित पवार गटाकडून सुधीर खरटमल यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र निवडणूक प्रक्रियेच्या दरम्यानच त्यांनी हे पद व पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्याने पक्षांतर्गत अस्वस्थता उघड झाली आहे. सुधीर खरटमल यांनी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांना पाठवलेल्या पत्रात, निवडणूक प्रमुख पदाचा तसेच पक्षाचा राजीनामा देत असल्याचे स्पष्ट केले आहे. या निवडणुकीसंदर्भातील सर्व बाबींमधून व कायदेशीर बाबींमधून कार्यमुक्त करण्याची विनंती त्यांनी केली आहे. या पत्राची माहितीस्तव प्रत राज्यातील व जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांना पाठवण्यात आली आहे.

तिकीट वाटपामध्ये झालेला गोंधळ, अंतर्गत समन्वयाचा अभाव आणि स्थानिक पातळीवरील नाराजी यामुळेच हा राजीनामा दिला असावा, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेष म्हणजे, महापालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर झालेला हा राजीनामा अजित पवार गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची निवडणूक रणनीती, संघटनात्मक बांधणी आणि अंतर्गत एकजूट यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी रात्री एबी फॉर्म पाठवले. पण सुधीर खरटमल यांना त्याची माहिती नव्हती. त्यामुळे हा गोंधळ उडाला होता. खरटमल महत्वाचे नेते असून त्यांच्या मार्गदर्शनाखालीच निवडणूक होईल. जुळे सोलापुरातील ताराई हॉटेलमध्ये रात्री खरटमल यांची मनधणी पक्षाकडून सुरु होती. जिल्हाध्यक्ष संतोष पवार, शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्याकडून खरटमल यांना वस्तुस्थिती पटविण्याचे काम सुरु होते. आम्ही गैरसमज दूर करू आणि सुधीर खरटमल राजीनामा मागे घेतील असे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील म्हणाले.

## शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार

| | |
|---|---|
| प्रभाग १ | अ - रमेश व्हटकर<br>ब - भारती विटकर |
| प्रभाग २ | अ - प्रशांत कावळे<br>ब - दिनेश चव्हाण |
| प्रभाग ४ | ब - केदार म्हमाणे<br>क - प्रिया बसवंती |
| प्रभाग ५ | क - अनुजा तोडकरी<br>ड - परमेश्वर सावंत |
| प्रभाग ८ | ब - मेघा बेळमकर<br>ड - शशिकांत बिराजदार |
| प्रभाग ९ | ड - सुरेश गायकवाड |
| प्रभाग १० | क - बिपीन वग्गु |
| प्रभाग ११ | अ - शुभम स्वामी<br>ब - सोनाली नवले |
| प्रभाग १२ | अ - प्रसाद माने<br>ब - अमिता जगदाळे |
| प्रभाग १३ | ड - वल्लभ चौगुले |
| प्रभाग १९ | ब - कुंदन गायकवाड<br>क - राणी गंधुरे |
| प्रभाग २१ | ड - भीमाशंकर म्हेत्रे |
| प्रभाग २३ | क - अलका राठोड<br>ड - लक्ष्मण जाधव |
| प्रभाग २४ | ब - चंदा काळे |

# भाजपचे सुरेश पाटील यांनी शिंदे सेनेकडून भरला अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० डिसेंबर-**

उमेदवारी भरण्यासाठी मंगळवारी शेवटचा दिवस होता, त्यामुळे इच्छुक उमेदवारांची चांगलीच तारांबळ उडाली. वेळेच्या पूर्वी आणि योग्य कागदपत्रे व एबी फॉर्म दाखल करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी नॉर्थकोट मैदान येथे होती. दोन्ही शिवसेने च्यावतीने उमेदवारी भरण्यासाठी इच्छुक उमेदवार उपस्थित होते. परंतु भाजपकडून ज्यांना शेवटपर्यंत कोणताही निरोप न मिळाल्याने व एबी फॉर्म मिळण्याची शासंकता कमी असल्याने त्यांनी देखील एकनाथ शिंदे गटाचा एबी फॉर्म घेऊन अर्ज भरल्याचे दिसून आले. दुसरीकडे उमेदवारी अर्ज भरून गेल्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्याचे दिसून आले.

भाजपचे माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी एकनाथ शिंदे गटाचा एबी फॉर्म घेऊन आपला उमेदवारी अर्ज प्रभाग क्रमांक तीन मधून दाखल केला. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मीनलदास यांनी एकनाथ शिंदे गटाचा एबी फॉर्म घेत प्रभाग क्रमांक २१ मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. नुकतेच प्रवेश केलेले भाजचे माजी सभागृह नेते श्रीनिवास करले आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पूजा खंदारे यांनी देखील आपला अर्ज एकनाथ शिंदे गटाच्या वतीने दाखल केला.



यावेळी भारतीय जनता पार्टीतील दिग्गजांनी एकनाथ शिंदे गटाच्या एबीफॉर्मवर आपला उमेदवारी अर्ज कुमुद अंकाराम, सुरज पाटील, माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या पत्नी, दक्षिणची आमदारकी लढवलेले प्रकाश राठोड यांचा समावेश होता. एकनाथ शिंदे गटाच्या वतीने प्रभाग सहामधून अश्विनी भोसले, प्रभाग सातमधून अमोल शिंदे, मनोरमा सपाटे, अनिकेत पिसे, आणि तृतीयपंथी उमेदवार नरसिंह बिल्ला उर्फ नंदिनी यांनी शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला.

**उमेदवारी अर्ज भरून जाताच राजीनाम्याचा ढीग**

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमधील इच्छुक उमेदवार मंगळवारी शेवटच्या दिवशी आपली उमेदवारी भरण्यासाठी नॉर्थकोट मैदान येथे आले होते. ती उमेदवारी भरून गेल्यानंतर सोशल मीडियावर आपल्या राजीनाम्याची पोस्ट केली. यामध्ये माजी नगरसेवक गणेश वानकर, युवा शहर प्रमुख विठ्ठल वानकर, जिल्हा समन्वयक दत्तात्रय वानकर, युवा सेना जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले यांचा समावेश होता.

## विरोधकांचे कन्फ्युजन झाले : आ. सचिन कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० डिसेंबर**

भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवारांचे ए आणि बी फार्म ऑलरेडी निवडणूक कार्यालयात जमा करण्यात आले आहेत.



त्याची पोच घेण्यासाठी आम्ही कार्यालयाकडे धावपळ करत होतो. विरोधकांचे कन्फ्युजन झाले आहे की त्यांना वाटले आम्ही एबी फॉर्म देण्यासाठी आलो आहोत, असे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले. आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे आदी नॉर्थकोट प्रशाला येथील विविध निवडणूक कार्यालयामध्ये एबी फार्म वितरित करीत होते. अर्ज सादर करण्याची वेळ संपल्याचे सांगत विरोधकांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला होता.

# पक्षीय दबावाखाली जोडपत्रे स्वीकारू नये

### 'माकपा'ची आयुक्तांकडे तक्रार

**सोलापूर,दि.३० डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि.३० डिसेंबर हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस होता. नियमानुसार उमेदवारी अर्जासोबत जोडपत्र क्रमांक १ व २ तसेच फॉर्म ए.फॉर्म बी दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे बंधनकारक आहे.मात्र, आमदार सचिन कलशेट्टी आणि शहराध्यक्ष तडवळकर हे संबंधित जोडपत्रांसह वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय क्रमांक २ व ४ येथे पोहोचले नाहीत. त्यावेळी आदर्श निवडणूक आचारसंहितेनुसार त्यांना रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कायदा सर्वांसाठी समान आहे. कोणत्याही राजकीय दबावाखाली येऊन जोडपत्र क्रमांक १ व २ स्वीकारू नयेत, अशी तक्रार प्रसार माध्यमांच्या वतीने सोलापूर महानगरपालिका आयुक्तांकडे करण्यात येत आहे. यात क्रारीची दखल न घेतल्यास माकपकडून थेट राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, उमेदवार सकाळी ७ वाजल्यापासून शिस्तबद्ध रांगा लावून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी थांबले होते. मात्र पावणे तीनच्या सुमारास आमदार त्यांच्या कार्यकर्त्यांसह, स्वीय सहाय्यक व शहराध्यक्ष हे निवडणूक अधिकारी यांच्याकडे पोहोचले.

हा प्रकार अत्यंत गंभीर, नियमबाह्य आणि निषेधार्ह असल्याचे सांगण्यात आले. अत्यंत शिस्तप्रिय व समयपालनाचा दावा करणाऱ्या पक्षाकडून अशा प्रकारचे वर्तन होणे दुर्दैवी आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया माकपकडून व्यक्त करण्यात आली आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भरधाव ट्रॅक्टरची दुचाकीला धडक; तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

शिराढोण पोलीस ठाणे हद्दीतील माळकरंजा येथे शाळेसमोर ढोकी-कळंब रोडवर झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मयत गणेश भागवत थोडसरे (वय ३२ वर्षे, रा. थोडसरवाडी, ता. व जि. धाराशिव) हे दि.७ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे ९ वाजता मोटारसायकल क्रमांक एमएच २५ डब्ल्यू ५१३३ वरून जात असताना माळकरंजा येथे शाळेसमोर ढोकी-कळंब रोडवर ट्रॅक्टर क्रमांक एमएच २५ एएल ६०६७ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून दुचाकीला धडक दिली.

या अपघातात गणेश थोडसरे हे गंभीर जखमी झाले असून उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मयताचे भाऊ सुरज भागवत थोडसरे (वय ३५, रा. थोडसरवाडी, ता. व जि. धाराशिव) यांनी दि.२९ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



## परंडा नूतन नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांचा सत्कार

**परंडा, दि.३० डिसेंबर -**

माजी आरोग्य मंत्री तथा परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे आमदार विकासरत्न डॉ. तानाजीराव सावंत यांचे विश्वासू शिवसेनेचे नेते व परंडा नगरपरिषदेचे निवडणूक पॅनल प्रमुख जाकीरभाई सौदागर यांची दुसऱ्यांदा जनतेतून नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच त्यांच्या विकासाभिमुख कार्याची दखल घेत वाजीदभाई दखनी मित्रमंडळाच्या वतीने दि.२९ डिसेंबर रोजी त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास माजी नगरसेवक वाजीद दखनी यांच्यासह मित्रमंडळाचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तेरणा महाविद्यालयात नॅक संदर्भात मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

तेरणा महाविद्यालयात दि.२९ डिसेंबर रोजी आयोजित नॅक मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करण्यात आले, तर विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. हरिदास फेरे यांनी उपस्थित प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना नॅक प्रक्रियेबाबत सखोल माहिती दिली, तसेच गुणवत्ता सुधारणा, दस्तऐवजीकरण व शैक्षणिक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. प्रदीप इंगळे यांनी नॅक प्रक्रियेची माहिती सविस्तर दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.डी.बी. मोरे यांनी अध्यक्षीय समारोप केला, सूत्रसंचालन प्रा. जयंत कांचनबटवे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. सुधाकर चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नागराळ येथील जि.प. शाळेची शालेय समितीचे गठन

**लोहारा, दि.३० डिसेंबर -**

लोहारा तालुक्यातील नागराळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शालेय व्यवस्थापन समिती पुनर्गठित करण्यात आली. यावेळी नागराळ येथील सर्व पालक उपस्थित होते. यात १३ पालक सदस्यांची निवड करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून अजित बलभीम बिराजदार व उपाध्यक्ष म्हणून सत्यभामा हणमंत गोरे यांची मतदानाद्वारे निवड करण्यात आली. दिगंबर गोरे, ज्ञानेश्वर गोरे, विष्णू गोरे, प्रशांत कोळी, बळी गोरे, जयश्री गोरे, मुक्ता घाडगे, नीता माटे, सारिका कुंभार, रितू गोरे, मयुरी गोरे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कांबळे एस.आर. यांनी पारदर्शक पद्धतीने समिती स्थापन करण्यात आली. यासाठी लोहारा बीटचे विस्ताराधिकारी तथा केंद्रप्रमुख चंदनशिवे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

# पवनचक्की कंपनीच्या वाहनांना आग; कोट्यवधींचे नुकसान



### वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी शिवारात घटना

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी शिवारात पवनचक्की उभारणीच्या ठिकाणी अज्ञात व्यक्तींनी कंपनीच्या वाहनांना आग लावल्याची खळबळजनक घटना घडली आहे. ही घटना सोमवार (दि. २९ डिसेंबर) रोजी रात्री दहा ते अकराच्या सुमारास घडली असून या आगीत कोट्यवधी रुपये किमतीची वाहने व साहित्य जळून खाक झाले आहे.

कडकनाथवाडी शिवारात पवनऊर्जा निर्मितीसाठी पवनचक्की उभारणीचे काम सुरू आहे. या प्रकल्पासाठी टाटा कंपनीने त्या ठिकाणी मोठा यार्ड उभारून कोट्यवधी रुपये किमतीचे अवजड साहित्य साठवून ठेवले होते. पवनचक्कीचे साहित्य उचलण्यासाठी वापरण्यात येणारी क्रेन तसेच अन्य वाहने यार्डमध्ये उभी होती.

अज्ञात व्यक्तींनी यार्डमध्ये घुसखोरी करून क्रेनसह अन्य अवजड वाहनांची तोडफोड करत त्यांना आग लावली.

आगीत वाहने पूर्णपणे जळून खाक झाली असून मोठ्या आर्थिक नुकसानीचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.

दरम्यान, बातमी लिहेपर्यंत संबंधित प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता.

या घटनेमागील नेमका हेतू काय, तसेच यात कोणाचा सहभाग आहे, याचा तपास वाशी पोलिसांकडून सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

## पोक्सो व खुनाच्या गुन्ह्यांत आरोपींना जन्मठेप व सश्रम कारावास

### पोलीस तपास व सरकारी पक्षाची प्रभावी कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या लैंगिक अत्याचार व खुनाच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने आरोपींना कडक शिक्षा सुनावली आहे. संबंधित प्रकरणांमध्ये पोलीस तपास व सरकारी पक्षाने प्रभावीपणे कामकाज केल्याने न्यायालयाने दोषसिद्धी नोंदवली.

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील येडशी येथील अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी धर्मराज मारुती कचरे याला भा.दं.सं. कलम ३७६ (इ) व पोक्सो कायद्यान्वये आजीवन सश्रम कारावास व दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. हा निकाल दि.११ जून रोजी जाहीर झाला.

आनंदनगर पोलीस ठाणे हद्दीतील सांजा येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात आरोपी हाकीम महेमुद काझी यास अपहरण व बलात्कारासह पोक्सो कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १० वर्षे सश्रम कारावास व २१ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. निकाल दि.३१ जानेवारी रोजी देण्यात आला.

बेंबळी पोलीस ठाणे हद्दीतील कामगाव येथील प्रकरणात आरोपी गोरोबा पांडुरंग वाघमारे यास अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराबद्दल



भा.दं.सं. व पोक्सो कायद्यान्वये आजीवन सश्रम कारावास व १५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. हा निकाल दि.२४ जुलै रोजी जाहीर झाला. तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीतील टाकळी येथील तरुणीवरील अत्याचार प्रकरणात आरोपी सुरज बाबु लातुरे (पठाण) यास भा.दं.सं. कलम ३७६ (२) सह इतर कलमान्वये सश्रम कारावास व १२,५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. निकाल दि.१२ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला.

दरम्यान, बेंबळी पोलीस ठाणे हद्दीतील सांगवी येथील महिलेच्या खुनाच्या प्रकरणात आरोपी विष्णु लक्ष्मण लोंढे यास भा.दं.सं. कलम ३०४ (भाग-२) सह इतर कलमान्वये १० वर्षे सश्रम कारावास व ४५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

ही सर्व कामगिरी पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी, तपासी अधिकारी व विशेष सरकारी वकील एस.एस. सूर्यवंशी व एस.बी. देशमुख यांनी प्रभावीपणे सरकारी पक्ष मांडल्यामुळे शक्य झाली.

## भरधाव कारची दुचाकीला समोरून धडक; तरुणाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील वरुडा गावाजवळ झालेल्या भीषण रस्ते अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.




मयत प्रशांत धर्मराजे वाघंब्रे (रा. आवाड शिरपुरा, ता. कळंब, जि. धाराशिव) हे दि.२२ डिसेंबर रोजी मोटारसायकल क्रमांक एमएच २४ आर ९७५९ वरून जात असताना वरुडा गावाच्या पुढे स्मशानभूमीजवळ कार क्रमांक एमएच १३ ईएफ ७८८६ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे तसेच चुकीच्या दिशेने चालवत दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली.

या अपघातात प्रशांत वाघंब्रे हे गंभीर जखमी झाले असून उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मयताच्या पत्नी आशा प्रशांत वाघंब्रे (रा. आवाड शिरपुरा, ता. कळंब) यांनी दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यातगुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## बेंबळी पोलिसांचा जुगार विरोधी मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

बेंबळी पोलीस ठाणे हद्दीत जुगारविरोधी कारवाईत यशस्वी ठरले. दि.२९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.४० वाजता बेंबळी पोलीसांनी मेडीकल शेजारील




काका नागटिळे यांच्या पत्र्याच्या शेडच्या पाठीमागे करजखेडा येथे छापा टाकला.

यावेळी आरोपी सचिन नागनाथ कांबळे, वय ३५ वर्षे, रा. करजखेडा ता. जि. धाराशिव यांच्याकडून नगरपालिकेच्या समोरील रोडलगत कल्याण मटका जुगाराचे साहित्य व एकुण १,५६० रुपये रोख रक्कम पोलीसांना हस्तगत झाली.

बेंबळी पोलीसांनी जुगार सामग्री व रक्कम जप्त करून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## नळदुर्ग शहराच्या विकासासाठी पदाचा उपयोग करणार : नगराध्यक्ष धरणे

### धमुरे प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३० डिसेंबर -**

स्व. चंद्रकांत अण्णा धमुरे प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेला सन्मान हा बहुमोल असून तो माझ्या कारकिर्दीतील प्रेमळ थाप आहे. या सत्कारातून मला माझ्या राजकीय कारकिर्दीसाठी दिशा व प्रेरणा मिळाली असून आगामी काळात नगराध्यक्षपदाचा उपयोग नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी करणार असल्याची ग्वाही नळदुर्ग नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी दिली.

ते अणदूर येथे स्व. चंद्रकांत अण्णा धमुरे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सन्मान सोहळ्यात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नागनाथ कुंभार होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत अणदूरकर व राज्य शिखर बँकेचे माजी



शाखाधिकारी सिद्धेश्वर मुळे उपस्थित होते. प्रारंभी प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकारांच्या हस्ते नगराध्यक्ष बसवराज धरणे यांचा शाल, फेटा व जंबो पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना धरणे म्हणाले की, दादा-मालकांचा राजकारणविरहित विकासाचा रथ, पत्रकार बांधवांचा विश्वास आणि जनतेची परिवर्तनशक्ती या त्रिवेणी संगमाचा उपयोग करून नळदुर्ग शहरातील विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार आहोत.

प्रतिष्ठानच्या सामाजिक क्षेत्रातील योगदान भूषणावह असून समाजहिताच्या उपक्रमांना पाठबळ देण्याची त्यांची भूमिका कौतुकास्पद आहे.

येत्या काळात नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्ष बसवराज धरणे यांची कसोटी लागणार असल्याचे मत अध्यक्षीय भाषणात डॉ. नागनाथ कुंभार यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष करबसाप्पा धमुरे यांनी केले. सूत्रसंचालन अमोल गुड्डु यांनी तर आभार प्रदर्शन लक्ष्मण नरे यांनी केले. या सन्मान सोहळ्यास पत्रकार, विविध पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तामलवाडीत इनोव्हा कार पकडली; १.१६ लाखांचा विमल-तंबाखूचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

सोलापूरकडून तुळजापूरकडे गोमांस वाहतूक होत असल्याची माहिती तामलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांना दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी मिळाली. त्यानुसार तामलवाडी पोलीस ठाण्याच्या पथकाने संशयित वाहनाचा पाठलाग करून रात्री १.०० वाजण्याच्या सुमारास मॉडर्न हायस्कूलसमोर इनॉव्हा कार (क्र. एमएच १३ एएक्स १७३८) ताब्यात घेतली.

पोलीसांनी कारची तपासणी केली असता, वाहनात दोन इसम आढळून आले. चौकशीत त्यांनी आपली नावे



इब्राहीम सलीम शेख (रा. बेगम पेठ, सोलापूर) आणि सोहेल अहमद कुरेशी (रा. सिद्धेश्वर पेठ, सोलापूर) अशी सांगितली.

वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये विमल, सुगंधी सुपारी व तंबाखूचे एकूण ४० पोते आढळून आले.

त्याची किंमत ५ लाख ९६ हजार रुपये असून, इनॉव्हा कारसह एकूण ९ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप टेकाळे, तसेच पोलीस अंमलदार उमेश माने, तुराब शेख, सुरज नरवडे, दिनकर तोगे, जुबेर काझी व मिथुन गायकवाड यांनी केली.

याप्रकरणी पुढील तपास तामलवाडी पोलीस करीत आहेत.

## नगर परिषद निकालानंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांकडे राजकीय पक्षांचे लक्ष

### ८ गट व १६ गणांतून होणार निवडणूक...

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**कळंब, दि.३० डिसेंबर -**

नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत १९८५ नंतर भाजपाला मोठे यश मिळाल्यानंतर आता भाजपने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या नियोजनाकडे लक्ष केंद्रित केले आहे. सर्कलनिहाय कार्यक्रमांचे आयोजन करून संवाद साधत भाजपने तयारीला सुरुवात केली आहे. तर युतीतील शिंदे शिवसेनेकडून नगराध्यक्ष पदासह चार सदस्य निवडून आल्याने इच्छुक कार्यकर्त्यांकडून अर्ज मागविण्यात येत असल्याचे चित्र आहे.

दुसरीकडे उबाठा शिवसेना व काँग्रेस यांनी एकत्र येत नऊ व एक जागा जिंकून उल्लेखनीय यश मिळविल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली असून दोन्ही पक्षांकडून आपापल्या पातळीवर चाचपणी सुरू आहे.

मात्र सध्या तरी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गटांचे पुढारी व नेतेमंडळी काहीसे सुस्त असल्याचे चित्र असून त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये कुजबुजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत कळंब तालुक्यातील ईटकुर, मंगरूळ, डिकसळ, शिराढोण, नायगाव, खामसवाडी, मोहा व येरमाळा या ८ गटांतून निवडणूक होणार आहे. तसेच पंचायत समिती सदस्य पदासाठी ईटकुर, मस्सा




(खं.), मंगरूळ, हासेगाव (केज), डिकसळ, लोहटा (पूर्व), शिराढोण, जवळा (खुर्द), नायगाव, रांजणी, खामसवाडी, देवळाली, मोहा, गौर, येरमाळा व चोराखळी असे १६ गण निश्चित करण्यात आले आहेत.

या निवडणुकीत कळंब तालुक्यातील ८६,०९० पुरुष व ७६,९२१ महिला असे एकूण १,६३,०११ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

त्यामुळे येणारी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक राजकीय पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाची व प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे चित्र आहे.




## भूम येथे आज आरटीओचे वाढीव शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० डिसेंबर -**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी वाढीव शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

डिसेंबर २०२५ महिन्यातील हे शिबीर ३१ डिसेंबर २०२५ रोजी भूम येथे नियोजित ठिकाणी पार पडणार आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, संबंधित सेवांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह शिबीरात उपस्थित राहावे.

# ‘ज्ञानदीप मेट्रो ब्रेन अबॅकस’ची राज्यस्तरीय परीक्षेत उत्तुंग भरारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ३० डिसेंबर :** चाकूर शहरातील ज्ञानदीप मेट्रो ब्रेन अबॅकस अकॅडमी सतत वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे कार्य करीत आहे.तसेच विद्यार्थ्यांची विविध परीक्षेची तयारी करून

### संचालक परमेश्वर ढगे यांचा ‘टॉप परफॉर्मन्स ऑफ द इयर’ने केला गौरव

घेऊन सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्नशील असते.त्याच अनुषंगाने लातूर येथे दि.२५ डिसेंबर रोजी मेट्रो ब्रेन एज्यूकेअर प्रा. लि.ने आयोजित केलेल्या नवव्या राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेमध्ये ज्ञानदीप अकॅडमीच्या २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.या परीक्षेत संपूर्ण भारत देशातून सुमारे १७५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

अबॅकस मधील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्ञानदीप अकॅडमीचे संचालक परमेश्वर ढगे यांना सलग चौथ्यांदा टॉप परफॉर्मन्स ऑफ द इयर २०२५ चा सन्मान देऊन गौरवण्यात आले. हा सन्मान चाकूर तालुक्यासाठी मोठा अभिमान असून



अकॅडमीच्या आराध्या बंडू आबंदे या विद्यार्थ्यींनीने-७ गटातून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला, सिध्दी विरभद्र गाडेकर या विद्यार्थ्यींनीने -६ गटातून राज्यात द्वितीय, संस्कृती सचिन जाधव ही विद्यार्थ्यींनी -५ गटातून राज्यात द्वितीय,स्वरूपा ज्ञानोबा मतलाकुटे ही विद्यार्थ्यींनी -३ गटातून राज्यात द्वितीय, आराध्या नारायण लोया ही विद्यार्थ्यींनी -४ गटातून राज्यात तृतीय अशा ५ विद्यार्थ्यांनी भारत देशातून प्रथम, द्वितीय, तृतीय येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. तसेच २० विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ 'चिव्हर अवॉर्ड' हा गौरव मिळवून यश संपादित केले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे व ज्ञानदीप अकॅडमीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक सुप्रसिद्ध सिने अभिनेते निखिल बने हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मेट्रो ब्रेन एज्यूकेअर प्रा लि.चे संचालक संतोष लोहारे हे होते. त्याचबरोबर मेट्रो ब्रेन कंपनीच्या संचालिका सीमा लोहारे यांचीही उपस्थिती होती.

सिने अभिनेते निखिल बने यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, अबॅकसमुळे विद्यार्थी सहा मिनिटापेक्षा कमी वेळेत शंभर पेक्षा जास्त गणिते सोडवितात मुलांच्या गणीत सोडवण्याच्या वेगाचे आणि अचुक तेचे त्यांनी कौतुक केले. तसेच अबॅकस क्लासचे विद्यार्थी म्हणजे उज्ज्वल भारताचे भविष्य आहे असा आवर्जून उल्लेख केला.तसेच अबॅकसच्या विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

# अंबिका कॉलनी परिसरात धाडसी चोरी; मुद्देमाल लंपास

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ३० डिसेंबर :** अहमदपूर शहरातील अंबिका कॉलनी परिसरात दिवसाढवळ्या घरफोडीची एक मोठी घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी एका बंद घराचे कुलूप तोडून लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

याप्रकरणी गोपाळ मधुसूदन बजाज (वय ४०, रा. अंबिका कॉलनी) यांनी अहमदपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी बजाज हे व्यवसायाने खत दुकानदार असून, दि २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास त्यांचे घर बंद असताना चोरट्यांनी ही संधी साधली. अज्ञात चोरट्याने घराच्या कपाटाचे लॉक तोडून आत ठेवलेले चांदी व सोन्याचे दागिने असा लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले, पोलीस निरीक्षक विनोद मैत्रेवार, पोलीस उपनिरीक्षक आनंद श्रीमंगल आणि पोलीस उपनिरीक्षक रवि बुरकूले यांच्यासह डिबी पथकाचे तानाजी आरदवाड, पोकॉ. बबन चपडे बिट, अमलदार पवार विनोद यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली.

तपासाला गती देण्यासाठी घटनास्थळी तातडीने फॉरेन्सिक टीम आणि फिंगरप्रिंट (ठसे) तज्ञांना पाचारण करण्यात आले होते. त्यांनी घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे आणि ठसे संकलित केले आहेत. अहमदपूर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार हे करत असून भरवस्तीत आणि दिवसा झालेल्या या मोठ्या चोरीमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

**आरोपींच्या मुसक्या लवकरच आवळू : पोनि. मेत्रेवार**

या घरफोडीच्या तपासाबाबत माहिती देताना पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार म्हणाले की, आम्ही परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत असून तपासासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. फॉरेन्सिक टीमने दिलेले पुरावे तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतील. आरोपींचा माग काढण्यासाठी सर्व तांत्रिक बाबींचा वापर केला जात असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल. नागरिकांनीही घर बंद करून जाताना शेजाऱ्यांना किंवा पोलिसांना कल्पना द्यावी आणि मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात.

# सिंदखेड तरुणाची आत्महत्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३० डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील सिंदखेड येथील तरुण विष्णू वसंत जंगलबोणे वय २५ वर्षे यांनी सोमवार दिनांक २९ डिसेंबर



रोजी अनसरवाडा येथे मामाच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

निलंगा तालुक्यातील सिंदखेड येथील एका २५ वर्षीय तरुणाचे वडील व्यसनाधीन असल्यामुळे या मयत तरुणावर घर चालत होते. तो लागेल ते मोल मजुरीचे काम करून उपजीविका भागवत होता. त्याला एक बहीण असून त्यांचे लग्न झालेलं आहे. मयत तरुण हा आपल्या आई वडिलांसोबत सिंदखेड येथे राहत होता.

सोमवारी दि. २९ डिसेंबर रोजी सकाळी अनसरवाडा येथील शेत शिवरातील मयत तरुणाचे मामा दत्तात्रय वाघमारे हे आपल्या शेतात सकाळी गेले असता आपला भाच्चाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ निलंगा पोलीसांना सदरील घटनेची माहिती दिली. महेताब जेवळे बिट अंमलदार व पोलीस अंमलदार भीमाशंकर भोसले यानी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन घटनास्थळीचा पंचनामा करून प्रेत निलंगा येथे शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय पाठविले. शवविच्छेदन करून प्रेत अंत्यविधीसाठी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

# नगराध्यक्ष हलगरकरांनी स्वीकारला पदभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३० डिसेंबर :** निलंगा नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत थेट जनतेतून मोठ्या मताधिक्याच्या फरकाने विजयी झालेले संजयराज प्रमोद हलगरकर यांनी मंगळवार दिनांक ३० डिसेंबर रोजी मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

पदभार स्वीकारण्यापूर्वी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सर्व भाजप नगरसेवक यांनी भाजपा संपर्क कार्यालयातून माजी खासदार श्रीमती रूपाताई पाटील निलंगेकर यांचा आशीर्वाद घेऊन व माजी आमदार कै. दिलीपभाऊ पाटील निलंगेकर यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर वाजत गाजत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, माजी मुख्यमंत्री कर्मयोगी कै. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून नगर परिषदेत प्रवेश केला.



पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लोमटे यांच्याकडून संजयराज प्रमोद हलगरकर यांनी नगराध्यक्षाचा पदभार स्वीकारला. निलंगा पालिकेच्या वतीने नवीन नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

पदभार स्वीकारताना औराद शहाजनी बाजार समितीचे सभापती नरसिंग बिरादार, निलंगा बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, दगडू सोळुंके, संजय दोरवे, शेषेराव ममाळे, भाजपचे तालुका अध्यक्ष कुमोद लोभे व शहराध्यक्ष रवी फुलारी, विनोद आर्य, सुधीर पाटील, सुमीत इन्नानी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते पालिकेचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नगराध्यक्ष संजयराज हलगर यांनी नगराध्यक्षाचा पदभार स्वीकारल्यानंतर निलंगा शहरातील संगन बसव विरक्त मठाला भेट देऊन मताधिपतीचा आशीर्वाद घेतला. यावेळी संगन बसव मठाच्या परिसरात सुरू असलेल्या विविध विकास कामाची त्यांनी पाहणी केली. यावेळी मठाच्या वतीने संगन बसव महास्वामी यांनी नूतन नगराध्यक्षांचा सत्कार केला. यावेळी प्रकाश पटणे, शिवप्पा भुरके, राजप्पा सोरडे, भाजप शहराध्यक्ष रवी फुलारी, गुंडप्पा मंठाळे महेश षटकार रतन रेड्डी, इंजिनिअर श्रीमती ममाने मॅडम, पी.के. पाटील, फकीर मिस्त्री उपस्थित होते.

पदभार स्वीकारल्यानंतर दैनिक सोलापूर तरुणभारत शी बोलताना नूतन नगराध्यक्ष संजयराज हलगरकर म्हणाले, भाजपचे नेते माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर व भाजपचे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांना विश्र्वासात घेऊन शहरातील जनतेच्या व पालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने निलंगा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहे. शहरातील प्रलंबित असलेले विकास विकास कामे तातडीने मार्गे लावून नागरिकांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास आपण प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# संत तुकाराम लॉ कॉलेजच्या वतीने नीता मोरेंचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** साने गुरुजी यांच्या जयंतीचे औचित्य



साधून संत तुकाराम लॉ कॉलेज उदगीर व राजीव गांधी नर्सिंग कॉलेज उदगीरच्या वतीने नीता मोरे यांचा सत्कार कॉलेजचे प्राचार्य राजकुमार नावंदर, उदगीर न्यायालयाचे न्यायाधीश भालचंद्र झेंडे, त्यांच्या सुविद्य पत्नी सोनाली झेंडे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दीपक बलसूरकर, महेशसिंह बयास यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

नीता मोरे यांचा हळवा कोपरा हा कथासंग्रह महाराष्ट्र शासनाने पूरक वाचन साहित्य म्हणून निवडला आहे. तसेच एस सी ई आर टी पुणे मार्फत नुकत्याच संपन्न झालेल्या शिक्षकांच्या कथाकथन स्पर्धेत तालुक्यात सर्वप्रथम क्रमांक व विभागात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून राज्यस्तरावर निवड झाली आहे. पुढील स्पर्धे साठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी महाविद्यालयाचा सर्व स्टाफ, ॲड. महेश मळगे, ॲड. सागर बिरादार, ॲड. देवानंद नामवाड, जोशी, कानूरे, दंडिमे उपस्थित होते.

# डॉ. नारायण जाधव-डॉ.सौ. शितल जाधव यांना शिखर संमेलनाचे निमंत्रण



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** नवी दिल्ली येथे विश्व स्वास्थ्य संघटना व आयुष मंत्रालय, भारत सरकार द्वारा आयोजित. दुसऱ्या विश्व स्वास्थ्य संघटन पारंपारिक चिकित्सा पद्धतीच्या शिखर संमेलनात भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली अंतर्गत, मेडिकल असेसमेंट अंड रेटींग बोर्डाचे माजी अध्यक्ष तथा बोर्ड ऑफ इथिक्स अंड रजिस्ट्रेशन चे सदस्य, डॉ नारायण जाधव यांना व उदगीर येथील धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालय च्या द्रव्यगुण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. सौ. शितल जाधव-घोरबांड यांना या सम्मेलनात उपस्थित राहाण्यासाठी आंमत्रित करण्यात आले होते.

ह्या सम्मेलनाचे आयोजन विश्व स्वास्थ्य संघटना व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवस भारत मंडपम, दिल्ली येथे करण्यात आले होते. याचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याच्या समारोप प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी व विश्व स्वास्थ्य संघटनेचे महानिर्देशक डॉ. टेड्रास अधनान उपस्थित होते. या सम्मेलनात. यामध्ये विविध ११० देशांतील पारंपारिक चिकित्सा पद्धतीच्या विशेषतज्ञांनी भाग घेतला होता. या तीन दिवसा मध्ये विविध विषयांवर विचार मंथन करण्यात आले. १०० हून अधिक देशांमधील प्रतिनिधींनी या भव्य आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता दिल्लीला भेट दिली. हा जागतिक स्तरावरील समिट आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

# निलंगा पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३० डिसेंबर :** निलंगा शहरात एका अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने टेम्पोतून नेवून तिच्यावर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी निलंगा पोलिस ठाण्यात आरोपी विरुध्द पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

निलंगा शहरातील एका वस्तीच्या परिसरात अल्पवयीन मुलगी बहिणीचे कपडे आणण्यासाठी जात होती. दरम्यान टेम्पो घेवून आलेल्या आरोपीने सदर मुलीला जबरदस्तीने गाडीत घेतले. मुलीच्या घरी नेवून सोडले. घरात कोणीही नसल्याने पाणी देण्याचा बहाणा करुन अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली, अशी फिर्याद पीडित अल्पवयीन मुलीने दिल्यावरून आरोपी योगेश खोमणे (वय २२) याच्या विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल धुमे करीत आहेत.

# विद्यार्थ्यांनी कामातून आपली ओळख निर्माण करावी : भार्गवी चिरमुले

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** विद्यार्थ्यांनी दिसण्यातून नव्हे तर कामातून आपली ओळख निर्माण करावी. सामाजिक माध्यमांमुळे आज शहर-ग्रामीण अशी भिंत पूर्णपणे कोसळली असून संवादाच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत, असे प्रतिपादन वार्षिक स्नेहसंमेलन ‘उदयोत्सव २०२५-२६’ च्या उद्घाटन समारंभात प्रमुख उद्घाटक म्हणून अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर हे होते. यावेळी व्यासपीठावर म. ए. सोसायटीचे उपाध्यक्ष ड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष माधवराव नौबदे, तसेच सदस्य डॉ. श्रीकांत मध्वरे, आडेप्पा अंजुरे, शिवराज वल्लापुरे, भीमाशंकर मुद्दा, भरत पस्तापुरे, दिलीप चौधरी, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. शिवशंकर हल्लाळे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी डॉ. सुरेश लांडगे,




विद्यार्थी प्रतिनिधी ऋषिकेश गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती.

पुढे बोलताना भार्गवी चिरमुले म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी केवळ भाषण ऐकण्यापेक्षा प्रश्न विचारावेत, संवाद साधावा आणि करिअरविषयीच्या शंका मोकळेपणाने मांडाव्यात, असे आवाहन करत आलेला पाहुणा ‘बाहेरचा’ न वाटता आपलाच वाटावा यासाठी संवाद महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. करिअर निवडताना कोणतेही काम लहान किंवा कमी लेखू नये, जे काम कराल ते सर्वोत्तम दर्जाचे व मनापासून करा, असा संदेश देताना त्यांनी आपल्या आजोबांनी दिलेला सल्ला तसेच स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रसंग सांगत जे काही कराल, त्यात सर्वोत्तम पाचांमध्ये तुमचे नाव असले पाहिजे, हा विचार आयुष्यात मार्गदर्शक ठरल्याचे स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोप करताना बसवराज पाटील नागराळकर म्हणाले विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन महत्त्वाचे आहे विद्यार्थ्यांनी भूतकाळात रममान होण्यापेक्षा वर्तमानात जगावे.आई-वडिलांना स्वाभिमान वाटावा, असे काम प्रत्येक युवकाने करावे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे उत्कृष्ठ ग्रंथालय वाचक, युवकमहोत्सवात सहभागी विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली कुलकर्णी आणि आसावरी आपसिंगेकर यांनी तर आभार आसिया पठाण या विद्यार्थिनीने मानले. विद्यार्थी कल्याण मंडळ उद्घाटन कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, माजी प्राध्यापक-कर्मचारी यांची विशेष उपस्थिती होती.

# फुले महाविद्यालयात प्रा. डॉ. बळीराम पवार यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**किनगाव, ३० डिसेंबर :** अहमदपूर तालुक्यातील किनगांव येथील महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालयातील प्रा डॉ बळीराम पवार हे वृक्षमित्र, विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित आंतरराष्ट्रीय किर्तीचे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. डॉ. बळीराम पवार यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन सक्षम सोसायटी राजस्थान च्या वतीने नुकताच आंतरराष्ट्रीय



जीवन गौरव पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले.

याबद्दल त्यांचा महाविद्यालयात श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राम बोडके आणि प्राचार्य डॉ बबनराव बोडके यांच्या हस्ते शाल, पुष्पहार, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. विठ्ठल चव्हाण, डॉ. अनंत सोमुसे, डॉ. प्रभाकर स्वामी, प्रा विष्णू पवार, प्रा. बालाजी आचार्य, प्रा संजय जगताप, डॉ. भारत भदाडे, डॉ. विरनाथ हुमनाबादे, डॉ. सदाशिव वरवटे, प्रा. विक्रम गायकवाड, प्रा. चंद्रमणी बनसोडे, प्रा सुनिल शिंदे, प्रा कृष्णा केंद्रे, डॉ. चेतन मुंढे, प्रा. सुमेध जोगदंड, डॉ. दर्शना कानवटे डॉ. मिरा शिंदे कार्यालयीन अधिक्षक गोपाळ इंद्राळे, अनिल भदाडे, कृष्णा धरणे आदी उपस्थित होते.

# ‘महाराष्ट्र उदयगिरी’त राष्ट्रीय गणित दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३० डिसेंबर :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात मराठी विज्ञान परिषद व अंधश्रद्धा निर्मूलन समिती उदगीरच्या वतीने राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अय्यर यांची १३८ वी जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. आणि राष्ट्रीय पातळीवर गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत ३६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला स्पर्धेत प्रथम लखनऊ विद्यापीठाची सुरभी त्रिपाठी, द्वितीय आरसी पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपूरची नेहा पवार, तृतीय नरसिंह माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय मुखेड ची तेजस दमकुंडवार यांनी. पारितोषिक प्राप्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस. एन. हल्लाळे, प्रा. डॉ.संजय शिंदे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. आर .बी. अल्लापुरे, सचिव डॉ. बी.डी करंडे, प्रा प्रशांत वाघमारे यांची उपस्थिती होती.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महात्मा बसवेश्वर पुतळ्याच्या विटंबनेचा लोहाऱ्यात निषेध

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.३० डिसेंबर -

नांदेड जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील शिराढोण गावात म हात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याची समाजकंटकांनी विटंबना केल्याच्या घटनेच्या निषेधार्थ लोहारा येथे सर्वपक्षीय वतीने तहसीलदारांना निवेदन दिले गेले.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यात महामानवांबद्दल अपशब्द वापरणे किंवा त्यांच्या पुतळ्यांवर हल्ले करणे या घटनांचा वेग वाढत आहे. समाजात तेढ निर्माण करणाऱ्या अशा प्रवृत्तींवर प्रशासनाने वेळेत कठोर पावले उचलून गुन्हेगारांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी सरपंच नागण्णा वकील, शामसुंदर तोडकरी, जालिंदर कोकणे, गुंडू घुजबळ, दिपक मुळे, हरी लोखंडे, इस्माईल मुल्ला, संगमेश्वर माशाळकर, अँड. सयाजी शिंदे, केशव सरवदे, प्रकाश होंडराव, बसवराज पाटील, भगवान मक्तेदार, संतोष फावडे, बाळू माशाळकर, वैष्णव लोखंडे, असिफ शेख यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.



# उमरग्यात अटल स्मृती संमेलन संपन्न; स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आदरांजली

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.३० डिसेंबर -

भारतीय जनता पार्टी उमरगा-लोहारा तर्फे भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त उमरगा शहरातील आदर्श महाविद्यालयात 'अटल स्मृती संमेलन' कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास नागरिक व कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



संपन्न कार्यक्रमाची सुरुवात स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. यावेळी अटलींजींच्या देशासाठी केलेल्या अतुलनीय योगदानाचे, संसदीय परंपरेतील योगदानाचे, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे तसेच कवि-लेखक म्हणून असलेल्या सृजनशील ओळखीचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांमध्ये भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, युवा नेते शरण भैय्या बसवराज पाटील, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, प्रमुख वक्ते डॉ. दिलीप गरुड, भाजपा जिल्हा सरचिटणीस अँड. नितीन भोसले, प्रदिप शिंदे, एससी मोर्चा जिल्हाध्यक्ष दिलीप भालेराव, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश आष्टे, माजी जिल्हा उपाध्यक्ष कैलास शिंदे यांचा समावेश होता. याशिवाय उमरगा व लोहारा तालुका व शहरातील अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, युवा नेते शरण भैय्या पाटील, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे व प्रमुख वक्ते डॉ. दिलीप गरुड यांनी स्व. अटल बिहारी वाजपेयी हे ध्येयवादी नेते व संसदपटू पंतप्रधान होते असे सांगितले. त्यांनी अटलींजींच्या विचारांवर चालणे हिच खरी आदरांजली असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमरगा भाजपा ग्रामिण मंडळ अध्यक्ष सिध्देश्वर माने यांनी केले, तर आभार तालुका सरचिटणीस विठ्ठल चिकुंद्रे यांनी मानले. कार्यक्रमात उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी अटलींजींच्या विचारांना आत्मसात करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## नववर्षाच्या पूर्वसंध्येला एलसीबीची धडक कारवाई; आरोपीकडून गावठी कट्टा जप्त

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.३० डिसेंबर -

धाराशिव जिल्ह्यात नववर्षाच्या पूर्वसंध्येच्या पार्श्वभूमीवर अवैध धंदे व अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस दिले होते.

त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांचे पथक गस्त करीत तुळजापूर येथे आले असता, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की धाराशिव जिल्हा अभिलेखावरील पाहिजे आरोपी गणेश उर्फ गणेशा जंपाण्या भोसले, रा. कारला ता. तुळजापूर, हा त्याच्या राहत्या घरी असून त्याच्याकडे गावठी कट्टा आहे व तो चोरीच्या उद्देशाने बाहेर जाण्याच्या तयारीत आहे.



सदर माहिती खात्रीलायक असल्याने दि.३० डिसेंबर रोजी सकाळी ११.४५ वाजता पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी आरोपी हा त्याच्या घराच्या पाठीमागे चिंचेच्या झाडाखाली बसलेला दिसून आला. पोलीस पथकाला पाहताच त्याने गावठी कट्टा तेथेच फेकून घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांनी पंचनामा करून घटनास्थळावरून गावठी कट्टा जप्त केला असून आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे नळदुर्ग येथे गुन्हा क्रमांक ४८९/२५ अन्वये भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३ व २५ अंतर्गत सरकारतर्फे फिर्यादी दाखल करून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पुढील तपास सुरू असून जप्त करण्यात आलेला गावठी कट्टा पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे नळदुर्ग यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या म र्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार यांच्यासह पोलीस कर्मचारी शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, शोभा बांगर व रत्नदीप डोंगरे यांनी केली.

## व्ही.पी. शैक्षणिक संकुलातील वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीत इंडक्शन प्रोग्राम यशस्वी



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.३० डिसेंबर -

व्ही.पी. शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित इंडक्शन (परिचय) प्रोग्राम उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व मार्गदर्शक करण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

प्रभारी प्राचार्य डॉ. पूजा आचार्य यांनी महाविद्यालयाचे नियम, शिस्त व शैक्षणिक वातावरणाची माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ. सचिन टिके यांनी फिजिओथेरपीच्या दैनंदिन जीवनातील महत्त्व, वाढती गरज व भविष्यातील करिअरच्या संधीबाबत मार्गदर्शन केले. व्यवस्थापक अमर कवडे यांनी कॅम्पसची रचना व विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सुविधा सांगितल्या. डॉ. गणेश गोरे यांनी परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमाची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा देवरे व रिया शिंदे यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. महिमा चाकवते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नळदुर्ग न.प.च्या उपाध्यक्षपदी दत्तात्रय दासकर यांची नियुक्ती करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.३० डिसेंबर -

नळदुर्ग नगरपालिकेवर भाजप-शिवसेना महायुतीची सत्ता स्थापन झाली असून लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी पदभार स्वीकारत कामकाजाला सुरुवात केली आहे. येत्या काही दिवसांत नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदाची निवड होणार असून या पदावर अभ्यासू व्यक्तिमत्त्व व नगरपालिका प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेले भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष दत्तात्रय दासकर यांची नियुक्ती करावी, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

आमदार राणा जगजितसिंह पाटील व भाजपचे युवा नेते सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नळदुर्ग नगरपालिकेवर भाजपने बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली आहे. नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच भाजपचे कमळ फुलल्याने शहरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. खंबीर नेतृत्व, संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत यामुळेच भाजपला हे यश मिळाल्याचे बोलले जात आहे.

नळदुर्ग नगरपालिकेतील एकूण २० जागांपैकी ११ नगरसेवक भाजप-शिवसेना महायुतीचे निवडून आले असून त्यामध्ये भाजपचे १० तर शिवसेनेचा १ नगरसेवक आहे. बसवराज धरणे हे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत.

दरम्यान, उपाध्यक्षपदासाठी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक दत्तात्रय दासकर यांची नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी शहरवासीयांसह नवनिर्वाचित नगरसेवकांकडून होत आहे. दासकर यांना नगरपालिका प्रशासनाचा मोठा अनुभव असून त्यांनी यापूर्वी नगराध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. शहर अतिक्रमणमुक्त करणे, विकासकामांना गती देणे व नगरपालिकेचा कारभार अधिक सुरळीत चालवण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा उपयोग व्हावा, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## आर्थिक व्यवहारातून झालेल्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.३० डिसेंबर -

आंबी पोलीस ठाणे हद्दीतील डोंजा येथे एका विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. मयत ताई सुखदेव काळे (वय ३१ वर्षे, रा. कार्ला ता. परंडा जि. धाराशिव) यांनी दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास ते दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ४ वाजेच्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.




या प्रकरणी खंडेराय शांतीकुमार लांडगे (रा. जाकेपिंपरी, ता. परंडा) व महेश अशोक सूर्यवंशी (रा. बंगाळवाडी, ता. परंडा) यांनी मयत ताई काळे यांना आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून वारंवार मानसिक त्रास दिल्याने त्या त्रासाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी काळु बाशा शिंदे (वय ३२ वर्षे, रा. कार्ला, ता. परंडा) यांनी दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आंबी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास आंबी पोलीस करीत आहेत.

## पोदार लर्न स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.३० डिसेंबर -

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल व पोडार जम्बो किड्स येथे वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ मोठ्या उत्साहात साजरे झाले. सलग दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृती, कला व संगीताचे विविध प्रकार सादर केले.

पहिल्या दिवशी पोदार जम्बो किड्स व लोटस पोदार लर्न स्कूल येथील इयत्ता १, २, ५ व ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी 'द लिजेंड ऑफ इनक्रेडिबल इंडिया' या विषयावर आपली कला सादर केली. विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी क्षेत्रातील कलाकार व थोर पुरुषांना मानवंदना देणाऱ्या गीतावर नृत्य केले. दुसऱ्या दिवशी इयत्ता ३, ४, ६, ८ व ९ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी 'द सागाज ऑफ इनक्रेडिबल इंडिया' या विषयावर नाटक व नृत्याद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले.

पहिल्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा नगरीचे नुतन नगराध्यक्ष किरण रविंद्र गायकवाड, तसेच प्रमुख उपस्थितीत गिरीषर रेड्डी, अनिल साळवे, संदीप दहिफळे उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून गिरीश सूर्यवंशी, समर्थेंद्र पाणीग्रही, वाल्मीक सोमासे, सुरज पोस्ते उपस्थित होते.

स्नेहसंमेलनाची सुरुवात विद्येची देवी माता सरस्वती यांच्या पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. संगीताच्या तालावर वेशभूषेच्या आकर्षक रंगसंगतीत विद्यार्थ्यांनी नृत्य व नाटक सादर केले. ऐतिहासिक नाटक 'श्रीमान योगी' देखील सादर केले गेले, ज्याचे प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक केले.

शालेय कामगिरी व विद्यार्थ्यांचे यश सादर करत प्राचार्य बी.पी. सिंग यांनी माहिती दिली. विद्यार्थी परिषदेचे प्रतिनिधीही कार्यक्रमात सहभागी होते. विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रातील यश मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केले, तर आभार सहशिक्षक रोहित पायमल यांनी व्यक्त केले. कार्यक्रम प्राचार्य बी.पी. सिंग व उपप्राचार्य अतुल फावडे यांच्या नेतृत्वाखाली व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने उत्साहात संपन्न झाला.

## खंडोबा यात्रेत अवैध धंदे रोखण्याची शिवसेनेची मागणी



तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.३० डिसेंबर -

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपूर येथे भरणाऱ्या खंडोबा यात्रेमध्ये कोणतेही अवैध धंदे सुरू होऊ देऊ नयेत, अशी ठाम मागणी नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने करण्यात आली असून याबाबतचे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपूर येथील प्रसिद्ध श्री खंडोबा देवाची वार्षिक यात्रा दि.२ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत भरत आहे. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर गेल्या अनेक वर्षांपासून नळदुर्ग शहर शिवसेनेच्या वतीने अवैध धंदे बंद ठेवावेत, यासाठी प्रशासनाकडे निवेदन दिले जात आहे. पूर्वी यात्रेदरम्यान टायगर गेम, तीन पत्ता, सुरट, देशी दारू यांसारखे अवैध धंदे सुरू होत असल्याने भांडण-तंटे होऊन यात्रेच्या वातावरणावर परिणाम होत होता.

मात्र, शिवसेनेच्या निवेदनाची दखल घेऊन पोलिस प्रशासनाने मागील वर्षी अवैध धंदे सुरू होऊ दिले नाहीत. त्यामुळे यात्रा शांततेत व सुरळीत पार पडली. तथापि, यावर्षी शहरातील काही टपोरे व रोडरोमिओ पोलिस कर्मचाऱ्यांशी संगनमत करून पुन्हा अवैध धंदे सुरू करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळत आहे.



यामुळे संबंधित पोलिस कर्मचारी तसेच अवैध धंदे सुरू करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी ठाम मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, उपतालुका प्रमुख सरदारसिंग ठाकूर, उपशहर प्रमुख शाम कनकधर, ज्येष्ठ शिवसैनिक दिलीप जोशी, रणजित डुकरे, सोमनाथ म्हेत्रे व नेताजी महाबोले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## धाराशिव येथे ५ जानेवारीला लोकशाही दिन

धाराशिव, दि.३० डिसेंबर -

जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी तत्काळ निराकरण करण्यासाठी सोमवार, ५ जानेवारी रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे लोकशाही दिन आयोजित केले आहे.

या उपक्रमांतर्गत नागरिकांना आपल्या तक्रारी थेट प्रशासकीय अधिकाऱ्यांना सादर करण्याची संधी मिळेल.

जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख अधिकारी उपस्थित राहणार असून नागरिकांनी तक्रारी लेखी स्वरूपात व आवश्यक कागदपत्रांसह सादर करण्याचे आवाहन करण्यात आहे.

# परंडा तालुक्यात पूरग्रस्त एकल महिलांना शेळ्यांचे वाटप

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.३० डिसेंबर -

परंडा तालुक्यातील पाथरुड येथे 'जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय' (छहच) आणि 'शाश्वत विकास न्यास' यांच्या माध्यमातून पूरग्रस्त २१ एकल म हिलांना शेळ्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत देऊळगाव, कात्राबाद, खासापुरी, ढगपिंपरी, रुई, परांडा आणि वालवड येथील महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यात आले.

कार्यक्रमासाठी महिलांची निवड पारदर्शक पद्धतीने करण्यात आली, ज्यात स्थानिक 'रुद्रा संस्था' (अंबी), 'आधार सामाजिक संस्था' आणि 'एकल महिला संघटन' यांचे सहकार्य लाभले.

NPM² चे राष्ट्रीय समन्वयक युवराज श्रीहरी गटकळ यांनी तीन महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करून प्रक्रिया यशस्वी केली.



कार्यक्रमात महिलांशी संवाद साधत मार्गदर्शनही करण्यात आले. ईला कांबळी (विश्वस्त, शाश्वत विकास न्यास) यांनी मुलांचे शिक्षण, स्कॉलरशिप आणि रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले, तर सुरेखा जगदाळे (अध्यक्षा, लोकप्रतिष्ठाण व रुद्रा संस्था) यांनी महिला बचत गट, सामूहिक व्यवसाय आणि मार्केटच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

युवराज गटकळ यांनी महिलांना संघटित होऊन आर्थिक व सामाजिक म ुद्द्यांवर काम करण्याचा विश्वास दिला. एन.ए.पी.एम. चे राज्य समन्वयक इब्राहिम खान यांनी मेधा पाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना कायम म हिलांच्या पाठीशी उभी राहील, असे आश्वासन दिले.

यावेळी बाबा पवार, नितीन बोराडे, प्रशांत तिकटे आणि बापू टेकाळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

एकल महिलांनी ही मदत आनंदाने स्वीकारली असून, शेळी स्वरूपातील मदतीमुळे त्यांच्या आत्मविश्वास आणि आर्थिक स्थैर्य वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचे प्रतिभा गपाट (एकल महिला संघटन) यांनी सांगितले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक प्रशिक्षण कार्यक्रमास प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** कलापंढरी संस्था लातूर व क्राय संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या बाल लैंगिक त्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामकृष्ण सम्मुखराव हे होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत माजी प्राचार्य माधव गादेकर ,केंद्रप्रमुख गौतम टाकळीकर, कला पंढरीचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी, मुख्य प्रशिक्षक म्हणून बाल न्याय मंडळाच्या सदस्या एड. छाया मलवाडे यांची उपस्थिती होती. यावेळी आपल्या मार्गदर्शनात प्राचार्य गादेकर यांनी निकोप समाजव्यवस्थेच्या निर्मितीसाठी लैंगिक अत्याचार रोखणे आवश्यक असल्याचे सांगितले. आजचे बालक म्हणजे उद्याचा भारत घडवणारी भावी पिढी असतात. त्यांचे जीवन जेवढे सुरक्षित आणि प्रगतशिल राहील तेवढा दशा शाश्र्वत विकासाकडे वाटचाल करेल. परंतु बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटना लक्षात घेता, बालकांचे जीवन आव्हानात्मक झाले आहे. हे अत्याचार अग्रक्रमाने रोखले जाणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



# लातूर मनपावर भाजपचा झेंडा फडकणार : आ. निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत लातूरमध्ये ट्रिपल इंजिन सरकार येणार आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील काळात केलेल्या कामाच्या बळावर आम्ही मतदारांना सामोरे जाणार असून मनपावर भाजपाचा झेंडा फडकणार आहे, असा विश्र्वास माजीमंत्री आ.

संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केला.

मनपा निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. ३०)अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता.लातूरमध्ये महायुती म्हणून लढण्यासंदर्भात



चर्चा सुरू होत्या. त्या अनुषंगाने माध्यमांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकासकामे होत आहेत. त्यामुळे जनता भाजपाच्या पाठीशी आहे. महायुती संदर्भात विचारणा केली असता आ. निलंगेकर म्हणाले की, तिन्ही पक्षांमध्ये महायुती म्हणून लढण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तिघांनीही शेवटपर्यंत एकत्रित लढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. राष्ट्रवादीच्या नेत्यांचीही हीच भूमिका होती.स्वतंत्र लढू असे आम्ही कधीही म्हटले नाही. युतीसाठी बैठका घेतल्या, चर्चा केली. जागा वाटपाचीही चर्चा झाली. राष्ट्रवादीच्या नेत्यांकडूनही नकार आला नाही परंतु राष्ट्रवादी मधील काँग्रेसच्या बी टीमने महायुतीत मिठाचा खडा टाकला. काँग्रेस स्वतःच्या बाजूने न खेळता विरोधकांच्या बाजूने खेळते.तोच प्रकार यावेळी घडल्याचे आ. निलंगेकर म्हणाले.

युतीसाठी शिवसेनेसोबतही सकारात्मक चर्चा झाली.अनेक प्रभागात भाजप व शिवसेनेमध्ये मैत्रीपूर्ण लढती होणार आहेत. रिपाई भाजपच्या सोबतच आहे,असे ते म्हणाले.

आ.निलंगेकर यांनी सांगितले की, उमेदवारांची यादी पक्षश्रेष्ठींनी फायनल केले आहे. आम्ही विकासाचे मुद्दे घेऊन जनतेपर्यंत जाणार आहोत.आम्ही आजपर्यंत काय कामे केली आणि पुढे काय करणार हे जनतेला पटवून सांगणार आहोत.ही लढाई निलंगेकर विरुद्ध देशमुख अशी नाही तर जनतेच्या हितासाठी, लातूरच्या हितासाठी आम्ही लढणार आहोत.या निवडणुकीत भाजपला ५० हून अधिक जागा मिळतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.



## उपसरपंच ज्ञानोबा कांबळेंचा भाजपात प्रवेश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर तालुक्यातील मौजे भाडगाव येथील उपसरपंच ज्ञानोबा निवृत्ती कांबळे यांनी लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामांना प्रेरित होऊन अनेक जण भारतीय जनता पार्टी प्रवेश करत आहेत. लातूर तालुक्यातील मौजे भाडगाव येथील उपसरपंच ज्ञानोबा निवृत्ती कांबळे यांच्यासह अनेकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. यावेळी भाजपा मंडळ अध्यक्ष प्रताप पाटील, साहेबराव मुळे, पांडूरंग बालवाड, हणमंत गव्हाणे, आत्माराम जाधव यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

## संस्काराच्या शिदोरीवर प्रत्येकजण जीवनात यशस्वी : डॉ. किनीकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** महाविद्यालयीन जीवनात मिळालेल्या संस्काराच्या शिदोरीमुळेच आजघडीला आपल्यापैकी प्रत्येकजण जीवनात यशस्वी होऊ शकले आहेत, असे प्रतिपादन सह्याद्री हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. हनुमंत किनीकर यांनी केले.

लातूरच्या मांजरा चॅरिटेबल ट्रस्टद्वारा संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय पाटील हे होते. यावेळी स्टार्ट क्लासेसचे संचालक राहुल सोनवणे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्रा.डॉ. पांडुरंग शितोळे, प्रा. दादासाहेब लोंढे, प्रा. हरिश्चन्द्र मोगरगे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. किनीकर यांनी सुशीलादेवी महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षणासोबतच आपल्याला जीवनाच्या सर्वच क्षेत्रात उपयोगी अतुलनीय अशी संस्काराची शिदोरी मिळाल्याचे सांगितले. या शिदोरीच्या बळावरच आज प्रत्येकजण समाजात प्रतिष्ठित नागरिक म्हणून जीवन व्यतीत करत आहेत. याठिकाणी आपल्या सर्वांना केवळ पुस्तकी शिक्षणच मिळाले आहे असे नसून जीवनात कोणत्या प्रसंगाचा सामना कशा पद्धतीने केला पाहिजे याचे धडेही मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लोंढे यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या सोहळ्याच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. स्नेहमेळाव्यास २०० हुन अधिक माजी विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी प्रा. मोगरगे यांनी आभार मानले.

## नववर्षानिमित्त मद्यविक्री कालावधीत शिथिलता

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** नववर्षानिमित्त राज्यातील एफएल-२, एफएल-३, सीएल-३, एफएलबीआर-२ व एफएल-४ व नमुना ई अनुज्ञप्त्यांच्या आस्थापना निर्धारित वेळेपेक्षा अधिक कालावधीसाठी उघड्या ठेवण्यास राज्य शासनाने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम १३९ (१) (सी) व कलम १४३(२) (एच१) अन्वये मंजुरी दिली आहे.

त्यानुसार लातूर जिल्ह्यातील किरकोळ अबकारी मद्यविक्री अनुज्ञप्त्या रात्री उशिरापर्यंत उघड्या ठेवण्यास मंजुरी देण्यात येत असल्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

## 'रामनाथ'चे प्राचार्य पी.सी.पाटील सेवानिवृत्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी श्री रामनाथ मा. व उच्च माध्यमिक विद्यालय आलमला येथील प्राचार्य पी.सी. पाटील हे आपल्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले, त्यामुळे शाळेमध्ये त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. जी.एम. धाराशिवे यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष ॲड. उमाशंकर पाटील हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून आलमला केंद्राचे केंद्रप्रमुख भागवत जगताप, विस्तार अधिकारी हमीद शेख उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये वि.का सोसायटीचे चेअरमन विश्वनाथ बिराजदार, सुरेंद्र पो.पाटील, विश्वेश्वरय्या पॉलिटेक्निकचे प्राचार्य श्री प्रशांत धाराशिवे, सरपंच विकास वाघमारे, हे उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रजनन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर सर्वच मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. सत्कारानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रभाकर कापसे यांनी केले, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. अंबिका खिचडेंनी विचार मांडले. शिक्षक प्रतिनिधी म्हणून विद्यालयातील सहशिक्षक डॉ. शरण धाराशिवे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर सत्कारमूर्ती संस्थेचे उपाध्यक्ष शिवाजीराव



सेवानिवृत्त प्राचार्या सौ. अनिता पाटील यांचा संस्थेच्या व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी भागवत जगताप यांनीही पी.सी.पाटील सरांच्या कार्यावर प्रकाश टाकून त्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर ॲड. उमाशंकर पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. याप्रसंगी रामनाथ शिक्षण अंबुलगे, कोषाध्यक्ष चनबसप्पा निलंगेकर, संचालक मन्मथप्पा धाराशिवे, विरनाथ हुरदळे, शिवसांब हुरदळे, पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला भगिनी, विद्यार्थी पालक, माजी विद्यार्थी, पाटील परिवारातील सदस्य, शाळेतील शिक्षक विद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केशवराजमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साहात



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात भारताचे पहिले कृषिमंत्री, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक राम जोशी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती मीरा चामवाड, विज्ञान मंडळ प्रमुख श्रीमती प्रतिभा मोरे, कार्यक्रम प्रमुख विलास कुलकर्णी व विद्यार्थी सुदर्शन अमनावार यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर चि. सुदर्शन अमनावार या विद्यार्थ्याने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन श्रीमती प्रतिभा मोरे यांनी केले.

## युवा माहेश्वरी समाजाकडून ५०० गरम शालींचे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** समाजातील गरजू घटकांच्या दुःखावर मायेची फुंकर घालण्याचे कार्य युवा माहेश्वरी समाज लातूरने पुन्हा एकदा करून दाखवले आहे. कडाक्याच्या थंडीने सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, उपचारासाठी रुग्णालयात दाखल असलेल्या गरीब रुग्णांच्या वेदना ओळखून युवा माहेश्वरी समाजाच्या युवकांनी माणुसकीचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

या सामाजिक उपक्रमावेळी युवा माहेश्वरी समाज संघटनेचे अध्यक्ष निकुंज भूतडा, सचिव ड. योगेश मालपाणी, तसेच देव भूतडा, देवेंद्र काबरा, ओंकार चरखा, कृष्णा सोनी, रितेश रांदड, केशव बियाणी, शिवम भूतडा, श्याम यादव, जोशी आदी पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून रुग्णांना प्रत्यक्ष पांघरून घालून त्यांना मानसिक आधार देत माणुसकीचा संदेश दिला.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवणे, हीच खरी समाजसेवा आहे, अशी भावना यावेळी उपस्थित युवकांनी व्यक्त केली. युवा माहेश्वरी समाजाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, अनेक सामाजिक संघटनांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.






## शिक्षण ही जीवनातील यशाची गुरुकिल्ली : डॉ. चिंते

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** शिक्षण ही जीवनातील यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी गावात शाळा नसल्याने शिक्षणाची दारे ठोठावावी लागायची. पण आता शाळा तुमची दारे ठोठावत आहे. विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर लाभ घेऊन यशाची शिखरे गाठावी, असे आवाहन नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य तथा प्रसिध्द सर्जन डॉ. डी. एन. चिंते यांनी केले.

येथील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाचे 'कलाविष्कार २०२५-२६' वार्षिक स्नेहसंमेलन मंगळवारी दगडोजीराव देशमुख सभागृहात पार पडले. त्यावेळी उद्धाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी पंचायत समितीचे नोडल प्रमुख संतोष सूर्यवंशी व संजय क्षीरसागर, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, बाळासाहेब पाटील, तुळजाभवानी



शैक्षणिक संकुलाच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, राणी केंद्रे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, राजमाता जिजामाता व तुळजाभवानी शैक्षणिक संकुलातील शिक्षक समर्पणाच्या भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करतात. घरातून निघताना ते घड्याळ पाहतात, पण शाळेतून निघताना घड्याळ पाहत नाहीत. या संकुलात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात येते. नियमित तासिकांसह जादा तासिकांचेही नियोजन करण्यात येते. येथील विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकत आहेत, असे सांगून लातुरात 'एआय'ची पहिली कार्यशाळा या संकुलात होईल, असा विश्वास त्यांनी दिला.

इंडियन टॅलेंट ऑलंपियाडमध्ये बेस्ट प्रिन्सिपल अवॉर्ड मिळाल्याबद्दल यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांनी पीपीटीच्या माध्यमातून संकुलाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा चढता आलेख उपस्थितांसमोर मांडला. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-१' स्पर्धेत तुळजाभवानी विद्यालयाने तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. येथील विद्यार्थी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर असून विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल कायम शंभर टक्के आल्याचे त्यांनी सांगितले.

संमेलनात विद्यार्थ्यांनी समूह नृत्याबरोबर वैयक्तिक सादरीकरण गायन, नृत्य, वक्तृत्व, वादविवाद, कथा-कथन, एकपात्री अभिनय सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. सूत्रसंचालन अलोक पाचेगावकर यांनी केले.